CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक ३६५ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



धर्माची एक विशेषता आहे. तो स्वचालक आहे. त्याच्यासाठी बाहेरून प्रेरणा प्राप्त करण्याची गरज नसते. विकसित हृदय व प्रबुद्ध मन यामुळे धर्म स्वतः चलनशील होतो. त्यातून जो आनंद मिळतो तीच त्याची ऊर्जा असते.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## विनम्र अभिवादन



भूदान चळवळीचे प्रणेते भौमर्षी विनोबा भावे यांची आज पुण्यतिथी



थोर स्वतंत्र्य सेनानी बिरसा मुंडा यांची आज जयंती

# मतदारांचा 'हायड्रोजन बॉम्ब'

### रालोआचा दणदणीत विजय
### ९० टक्क्यांच्या 'स्ट्राईक रेट'सह भाजपा सर्वांत मोठा पक्ष

## बिहारात महाआघाडी भूईसपाट

### जदयूने पटकावल्या ८५ जागा
### चिराग पासवान पुन्हा ठरले मोदींचे हनुमान



दिल्लीतील भाजपा मुख्यालयात पंतप्रधान मोदींचे कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले

◆ **पाटणा, १४ नोव्हेंबर**

बिहारमधील नागरिकांनी मतदानाच्या रूपात टाकलेल्या हायड्रोजन बॉम्बमुळे राजद आणि काँग्रेसचा समावेश असलेली महाआघाडी शुक्रवारी भूईसपाट झाली. बिहारमध्ये काट्याची टक्कर होईल, असा राजकीय तज्ज्ञांचा अंदाज पार धुळीस मिळाला. रालोआ आघाडीने २०० च्या आसपास जागा जिंकल्या. महाआघाडीचा खेळ ३५ जागांवरच खल्लास झाला. जवळपास ९० टक्क्यांच्या 'स्ट्राईक रेट'सह भाजपा सर्वांत मोठा पक्ष ठरला, तर त्या पाठोपाठ जदयूने ८५ जागा पटकावल्या. लोजपाचे युवा नेते चिराग पासवान पुन्हा मोदींचे हनुमान ठरले आहेत. त्यांच्या पक्षाने जवळपास १९ जागांवर विजय मिळवला.

बिहार विधानसभा निवडणुकीत महाआघाडी इतकी निराशाजनक कामगिरी करेल, असे कुणालाही स्वप्नात वाटले नव्हते. मात्र, अंतर्गत कलह आणि परस्परांचे पाय खेचण्याच्या राजकारणामुळे महाआघाडीची वाताहत झाली. राजदला २५ जागांवर समाधान मानावे लागले. बिहारमध्ये ५५ जागा लढवणाऱ्या काँग्रेसला जेमतेम सहा जागा जिंकता आल्या. महत्त्वाचे म्हणजे, राहुल गांधी यांनी काढलेली मतदार यात्रा, त्यानंतर मतचोरीचे केलेल्या आरोपांचा बिहारमधील मतदारांवर कुठलाही परिणाम झाला नसल्याचे निकालानंतर स्पष्ट झाले. ज्या तलावात त्यांनी उतरून मासेमारी केली, त्या बेगुसराय विधानसभा मतदारसंघात काँग्रेसच्या उमेदवाराला ३१ हजार मतांनी पराभव स्वीकारावा लागला. भाजपाचे उमेदवार कुंदन कुमार यांनी त्यांचा पराभव केला.

निवडणुकीपूर्वी राजदचे तेजस्वी यादव मुख्यमंत्रिपदाचे सर्वाधिक पसंतीचे उमेदवार असल्याचे सांगितले जात होते. मात्र, राघोपूर मतदारसंघात ते सुरुवातीच्या काही फेऱ्यांमध्ये मागे पडले होते. ◂(वृत्तसंस्था)

### महिलांनी बदलले समीकरण

यंदा महिला मतदारांची टक्केवारी पुरुषांच्या तुलनेत जवळपास १० टक्के जास्त होती. बिहारमधील महिलांचा रालोआला पाठिंबा आहे आणि त्यांची भूमिका या निवडणुकीत महत्त्वपूर्ण ठरली. त्यांनी निवडणुकीचे समीकरण बदलले, अशी माहिती तज्ज्ञांनी दिली.



### पक्षनिहाय कामगिरी

| | |
|---|---|
| भाजप | ८८ |
| जदयू | ८२ |
| लोजपा (राम विलास) | १८ |
| हम | ५ |
| रालोम | ४ |
| राजद | २४ |
| काँग्रेस | ६ |
| एआयएमआयएम | ५ |
| सीपीआयएमएल(एल) | २ |
| आयएलपी | |
| सीपीआयएम | १ |

उशिरा रात्री मतमोजणी सुरू असताना आघाडीवर असलेल्या जागा : भाजप १, जदयू, २, राजद, १, लोजपा १, आयएलपी १ आणि बसपा १

## पश्चिम बंगालमधील जंगलराज उखडून फेकणार : पंतप्रधान

**नवी दिल्ली, दि.१४ नोव्हेंबर-**

बिहारनंतर आता पश्चिम बंगालमधील जंगलराज उखडून फेकणार, अशी शपथ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी बिहारमध्ये रालोआला मिळालेल्या प्रचंड बहुमताचे कौतुक करताना घेतली. गंगा नदी ज्याप्रमाणे बिहारमधून बंगालमध्ये जाते, त्याचप्रमाणे भाजपाचा बंगालमधील विजयाचा मार्गही मोकळा झाला आहे, असे त्यांनी रालोआला मिळालेला विजय येथील भाजपा मुख्यालयात साजरा करताना सांगितले.

काँग्रेस आता मुस्लिमलीगी माओवादी काँग्रेस (एमएमसी) बनली आहे आणि लवकरच या पक्षात मोठी फूट पडेल. बिहारमधील विजयाने एम-वाय अर्थात् 'महिला आणि युवा' हे नवीन सूत्र दिले आहे. लोकांनी जंगलराजच्या लोकांचे जातीय एम- वाय अर्थात् मुस्लिम-यादव हे सूत्र उद्ध्वस्त केले. बिहार ही अशी भूमी आहे, जिने भारताला लोकशाहीची जननी असल्याचा अभिमान दिला आणि त्याच भूमीने लोकशाहीवर हल्ला करणाऱ्या लोकांना धूळीस मिळवले, असे मोदी म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, बिहारमध्ये रालोआला मिळालेले प्रचंड बहुमत म्हणजे विकास, महिला सुरक्षा, सुशासन आणि गरिबांच्या कल्याणासाठी केलेल्या कामावर जनतेने उमटवलेली मोहर आहे. पंतप्रधान मोदी व मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी बिहारला जंगलराजमधून बाहेर काढले.

**प्रमुख विजयी उमेदवार :** उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी (भाजप) तेजस्वी यादव (राजद) गायिका मैथिली ठाकूर (भाजप) बाहुबली अनंत सिह (जदयू) उपमुख्यमंत्री विजय सिन्हा (भाजप) जिवेश कुमार मिश्रा (भाजप) मंगल पांडे (भाजप)

**प्रमुख पराभूत उमेदवार :** तेजप्रताप यादव, गायक खेसारीलाल यादव, पत्रकार मनिष कश्यप, शिवदीप लांडे, शाहनवाज आलम, राजेश कुमार, सबा जफर

## पतीने घेतला गळफास, पत्नी मृतावस्थेत बेडवर

### सांगोला तालुक्यातील कोळा येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१४ नोव्हेंबर -**

अज्ञात कारणाने पतीने गळफास घेतलेला तर पत्नी मृत अवस्थेत बेडवर पडली होती. ही घटना गुरुवार दि.१३ नोव्हेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास कोळा, ता.सांगोला, जि.सोलापूर येथे घडली. सदर घटनेमध्ये समाधान बबन चव्हाण (वय-३०), अश्विनी समाधान चव्हाण (वय-२५) दोघे रा.लोटेवाडी, ता.सांगोला हे पती-पत्नी मयत झाले आहेत.

याबाबत दादा आबा मोहिते, रा.जुनोनी, ता.सांगोला, जि.सोलापुर याने माझे आजोबा राजाराम मोहिते हे कोळा येथील प्रमोद देशमुख यांचे शेत वस्तीवर कामास आहेत. तेथे माझे दाजी समाधान चव्हाण हे आले होते. त्याठिकाणी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास बहीण अश्विनी चव्हाण हीस त्यांचे जवळ सोडले. तिने तू मला एक तासाने फोन करून घेवुन जाण्यासाठी ये असे सांगितले. मी सायंकाळी साडेपाच वाजण्याचे सुमारास दाजी यांना फोन वरती बहिणीला न्यायला कधी येवु असे विचारल्यावर बहिणीने तु मला रात्री साडेनऊ वाजता न्यायला ये असे सांगितल. मी रात्री साडेनऊ वाजण्याचे सुमारास दाजी यांचे फोनवर फोन केला असता त्यांचा फोन बंद आल्याने देशमुख वस्तीवर येऊन तेथील घराजवळ त्यांना हाका मारल्या. तरी त्यांनी दार उघडले नाही. दाराला आतुन कडी होती. त्यामुळे मी सदरचे दार जोरात ढकलुन देवुन उघडले. आत जावुन पाहीले असता माझे दाजी समाधान चव्हाण यांनी खोलीतील पत्राचे लोखंडी अँगलला गळफास घेतलेला दिसला व माझी बहीण अश्विनी चव्हाण ही खोलीतील बेडवर मयत अवस्थेत पडलेली होती. दोघांना सांगोला पोलिस हे येथील सरकारी दवाखान्यात घेवुन आले. त्यावेळी तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासुन ते दोघेजण उपचारापुर्वीच मयत झाले असल्याचे सांगीतले, अशी खबर सांगोला पोलीस ठाणे येथे दिली आहे. पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहेत.

## सिटी बसच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

शहरातील अक्कलकोट रोडवरील एमआयडीसी परिसरातील विजयनगर रस्त्यावर सिटी बसच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळी पावणे सातच्या सुमारास घडली.

देविदास लिंगय्या दासरी वय ४० राहणार विनायक नगर एमआयडीसी सोलापूर असे मृत दुचाकीस्वाराचे नाव आहे.

**अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील घटना**



शुक्रवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास देविदास दासरी हे त्यांच्या दुचाकीवरून एमआयडीसी ते विजयनगर असे जात होते. त्यावेळी विनायक नगर येथील देशी दारू दुकानाच्या पुढे मनपा बस क्रमांक एमएच १३ बी ९६ ८० या सिटी बस चालकाने बस निष्काळजीपणे चालवून दुचाकीस जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकी वरील देविदास दासरी हे डोक्यास मार लागून गंभीर जखमी होऊन बेशुद्ध झाले त्यामुळे त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. असता डॉक्टर पूजा लवटे यांनी बासरी यांना मृत घोषित केले. याबाबत सिव्हिल पोलीस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## महापालिकांसाठी ओबीसी व सर्वसाधारण महिला प्रवर्गांकरिता सोमवारी पुनःश्च आरक्षण सोडत

### निवडणूक आयोगाने जारी केले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

राज्यातील सोलापूरसह आठ महापालिकांसाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला आणि सर्वसाधारण महिला या प्रवर्गांकरिता पुनश्च आरक्षण निश्चिती व सोडत कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. सोलापूर महापालिका क्षेत्रातील या प्रवर्गांसाठीची आरक्षण सोडत सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे सकाळी



१०:३० वाजता पार पडणार आहे.

राज्य निवडणूक आयोगामार्फत आज दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी तसे आदेश जारी करण्यात आले आहेत. या आदेशानुसार नवी मुंबई, उल्हासनगर, पनवेल, मालेगाव, जळगाव, सोलापूर, इचलकरंजी आणि जालना या महापालिकांसाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला या प्रवर्गांकरिता पुनश्च आरक्षण निश्चिती व सोडत कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील या प्रवर्गांसाठीची आरक्षण सोडत सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे सकाळी १०:३० वाजता पार पडणार आहे, महापालिका प्रशासनाकडून सूचित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास संबंधित जनप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, इच्छुक नागरिक तसेच माध्यम प्रतिनिधींनी उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.





## विमुक्त जाती भटक्या जमाती शहर काँग्रेस विभागाच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

प्रभाग क्रमांक २२ मधील सेटलमेंट येथील कै.भगवानराव गायकवाड यांच्या अंबाबाई मंदिरात विमुक्त जाती भटक्या जमाती शहर काँग्रेस विभागाच्या वतीने मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले.

हे शिबिर शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय व दादाई बहुउद्देशीय समाज सेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केले होते. शिबिराचे उद्घाटन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे माजी नगरसेवक लक्ष्मण जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नेत्र तंत्रज्ञ महेश पवार, व्हिजेएनटी शहराध्यक्ष युवराज जाधव, डी ब्लॉक अध्यक्ष देविदास गायकवाड, दादाई संस्थेचे नारायण जाधव, माजी सरपंच सुनील जाधव, निशांत गायकवाड, रमेश जाधव, अनिल जाधव, संजय गायकवाड, अनिल गायकवाड, पप्पू गारे , परशुराम गायकवाड, ज्ञानेश्वर जाधव, गणेश जाधव, प्रवीण जाधव, निशांत हौसनूर, कुणाल गायकवाड, बजरंग गायकवाड, समीर विजापूरे , सुभाष वाघमारे, कमरोनिसा बागवान, चंदा काळे, मुमताज तांबोळी, सुनीता बेरा, विवेक जाधव, निलेश गायकवाड, सागर गायकवाड, लक्ष्मण जाधव आदी उपस्थित होते. यावेळी ११५ नागरिकांचे तपासणी करण्यात आली. त्यापैकी २३ ज्येष्ठ नागरिकांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे. २० नागरिकांना अल्प दरात चष्मे देखील देण्यात आले.

# श्री स्वामी समर्थ पालखी परिक्रमा उद्यापासून

## १५ जुलै २०२६ ला अक्कलकोट नगरीत विसावणार; यंदाचे २८ वे वर्ष

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ नोव्हेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २८ वर्षापासून न्यासाकडून श्री स्वामी समर्थ पालखी परिक्रमा काढण्यात येत आहे, यंदाचे २९ वे वर्ष असून, रविवार दि. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. श्रीक्षेत्र अक्कलकोट येथून प्रस्थान होणार असून, ८ महिने पालखी पादुका महाराष्ट्रसह कर्नाटक, गोवा राज्यासह दिनांक १५ जुलै २०२६ रोजी तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत विसावणार असल्याचे माहिती न्यासाचे पालखी परीक्रामाचे मुख्य संयोजक संतोष भोसले यांनी दिली आहे. सदराची पालखी पश्चिम महाराष्ट्र, कोकण, बृहन मुंबई, उत्तर महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा, विदर्भ या विभागातून जाणार आहे. तसेच कर्नाटक व गोवा ह्या लगतच्या राज्यात ही परिक्रमा जात असते.

या परिक्रमेचा शुभारंभ श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, देवस्थानचे मुख्य पुरोहित प.पू. वे.शा.स.मोहनराव गोविंदराव पुजारी आणि श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे पुजारी प.पू अण्णू महाराज पुजारी, धनंजय पुजारी यांच्या हस्ते श्रींच्या पादुकाचे पूजन करण्यात येणार आहे.



न्यासाच्या वतीने अनंतकोटी ब्रम्हांड नायक अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी-पादुकांचे दर्शन व सेवा संबंध महाराष्ट्रासह अन्य राज्यातील गावोगावी असलेल्या स्वामी भक्तांना दर्शन करता यावे यासाठी श्री स्वामींच्या पालखी परीक्रमेचे आयोजन केले आहे. श्री समर्थ स्वामींच्या साधू-संतत्वाची ख्याती आणि त्यांच्या भक्तीचा सुगंध गेली दिडशे वर्षापासून सबंध भारतभर पसरत आहे. श्री स्वामींच्या मूळस्थान श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे श्री स्वामींच्या इच्छानेच श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट), स्थापन झाले असून येथे दैनंदिन दोन्ही वेळेस हजारोंच्या संख्येने स्वामी भक्त महाप्रसादाचा लाभ घेतात. अन्नछत्रतर्फे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडाविषयक, आपदग्रस्तांना मदत व शहरातील २६० दिव्यांग, निराधार लोकांना समर्थ महाप्रसाद सेवा, तालुक्यातील सुमारे ८६ कुस्तीगीरांना न्यासाच्या वतीने दर महा पैलवानकीचा पौष्टिक खुराक दिला जातो. आरोग्य विषयक इतर विविध कार्यक्रम राबविले जातात, तसेच शासनाच्या विविध उपक्रमांना हे न्यास वेळोवेळी सर्वोतोपरी सहकार्य करीत असते. मंडळाच्या मालकीच्या जागेत यात्री निवास, यात्री भुवन, अतिथी निवास या निवासी इमारती कार्यारत असून महाप्रसाद गृह, ध्यान धारणा मंदिर, मंगल कार्यालय आदी मोठा प्रकल्प उभा राहणार आहे. न्यासाच्या परिसरात सध्या स्वामी भक्तांच्या सेवेत तात्पुरत्या महाप्रसाद गृह बरोबरच श्री शमी विघ्नेश गणेश मंदिर, नियोजित महाप्रसाद गृह इमारत, कपिला गाय, उभी स्वामी मूर्ती, कारंजा, शिवस्मारक, इनडोर-औटडोर जिम, प्रशस्त वाहन तळ, श्री स्वामी समर्थ वाटिका व बालोध्यान, शिवचरित्र प्रदर्शन हॉल, अग्निशामक, रुग्णवाहिका, राज्य परिवाहन महामंडळाच्या चालक व वाहकांना करिता अध्यावत राहण्याची सोय, सौर उर्जा प्रकल्प याबरोबरच विविध दिन उत्सव, पोर्णिमा, चतुर्थी, एकादशी आदी कार्यक्रम न्यास साजरा करते. नियोजित महाप्रसागृह भव्य व सुसज्ज अशा ५ मजली इमारत बांधकामाचा मोठा प्रकल्प उभा रहत आहे. १० नोव्हेंबर २०२४ पासून सदर इमारत बांधकामास प्रारंभ झाला आहे. हे सर्व श्री स्वामींच्या कृपा आशीर्वादाने होते आहे.

### राज्यातील ३८ जिल्ह्यातील ७८० गावात जाणार पालखी

गेल्या २८ वर्षापासून न्यासाकडून श्री स्वामी समर्थ पालखी परिक्रमा काढण्यात येत आहे, याकाळात सुमारे २४३ दिवसामध्ये सुमारे १५ हजाराहून अधिक कि.मी. चा प्रवास सुमारे ७८० गावे महाराष्ट्रातील ३८ जिल्हे व ७५ तालुक्यातून कर्नाटक राज्यातील बेळगाव येथे मुक्काम तर गोवा राज्यातील २ जिल्ह्यात मुक्काम पालखीचा असतो. याबरोबरच बृहन मुंबई, ठाणे, वसई विरार, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, पुणे या महानगरा बरोबरच सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, पुणे, रायगड, ठाणे, नाशिक धुळे, नंदुरबार, जळगाव, औरंगाबाद, जालना, बुलाढाणा, अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा, यवतमाळ, वाशीम, नांदेड, अ.नगर, उस्मानाबाद, बिड, लातूर या जिल्ह्यातून परिक्रमा होत असून विशेष म्हणजे कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, केरळ राज्यासह गडचिरोली शहर व परदेशातून मागणी होत आहे. पालखी परिक्रमेच्या अधिक माहितीसाठी मुख्य संयोजक संतोष भोसले ९८२२८१०९६६ यांना संपर्क करण्याचे आवाहन न्यासाचे वतीने केले आहेत.

## महत्त्वाचे...

### अक्कलकोट व दूधनीत नगरसेवकासाठी प्रत्येकी १५ अर्ज

**अक्कलकोट, दि. १४ नोव्हेंबर-**

**नगराध्यक्षासाठी अक्कलकोटमध्ये एक तर मैंदर्गीत एकही अर्ज नाही**

दूधनी नगरपालिकेत नगरसेवकपदासाठी पाचव्या दिवशी शिवसेना शिंदे गटाकडून पंधरा जणांनी उमेदवार अर्ज दाखल केले असून अक्कलकोट येथेही नगरसेवक पदासाठी पंधरा अर्ज दाखल झाले. त्यामुळे अक्कलकोट व दुधनीत एकूण ३० अर्ज दाखल झाले. काँग्रेसकडून अक्कलकोटच्या नगराध्यक्षपदासाठी एक अर्ज तर मैंदर्गीत आत्तापर्यंत एकही अर्ज दाखल झाला नाही. अक्कलकोट नगर पालिका नगरध्यक्ष पदासाठी साठी काँग्रेस कडून अशपाक बालोरगी यांनी उमेदवार अर्ज दाखल केले आहेत. नगरसेवकपदा साठी मोरे कल्लाप्पा लिंबाजी हे ४ अ मध्ये,पाटील सिद्धाराम रामेश्वर १० ब मध्ये,समाने रामचंद्र नागनाथ ८ ब मध्ये,यादव प्रियांका राजेश १२ क मध्ये,आरती उत्तम गायकवाड ११ अ मध्ये ( २ फॉर्म ), शिंदे अमृता खंडेराया ७ ब मध्ये लांडगे सौरभ संजय ५ ब मध्ये,धनशेट्टी लक्ष्मीकांत काशिनाथ २ ब मध्ये, धनशेट्टी सोनाली लक्ष्मीकांत २ ब मध्ये,प्रियांका सचिन मडीखांबे ११अ मध्ये ( २ रा ), देविदास कवटगी १० ब मध्ये, कवटगी भाग्यश्री देविदास १० अ मध्ये,अविनाश रेवाप्पा मडीखांबे ४ अ मध्ये, बळोरगी मुस्तफा अश्पाक ३ अ मध्ये, हरवाळकर नागेश सातप्पा ४अ मध्ये असे पंधरा जणांनी नगरसेवक पदासाठी उमेदवार अर्ज दाखल केले आहेत. दूधनी नगरपालिका निवडणुकीत शिवसेना कडून लोद्देनवरू काशिनाथ सातलिंगप्पा ७ अ मध्ये,सिन्नूर संगमेश्वर यशवंत २ ब मध्ये,सिन्नूर चंद्रशा यशवंत २ ब मध्ये,गद्दी ललिता शामराव ९ अ मध्ये,पोतिस पाटीत अजनाबाई शिवानंद ८ ब मध्ये,पाटील महांतेश मुरागेप्पा १० ब मध्ये,कोतली जगदेवी बसवराज १० अ मध्ये,कोतती कावेरी संगप्पा १० अ मध्ये,धल्लू सुषमा श्रीकांत ५ अ मध्ये,धल्लू राजश्री सिद्धाराम ५ अ मध्ये,पाटील संगीता महातेश ७ ब मध्ये,पाटील नीलम्मा हणमंत ७ ब मध्ये पाटील सुवर्णा मल्लिनाथ ८ अ मध्ये, बसवनकेरी बसवराज नागप्पा ७अ मध्ये, बसवनकेरी श्रीदेवी बसवराज १३अ मध्ये असे एकूण १५ जणांनी दुधनी नगर पालिका नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केल्या आहेत.

### नगरपरिषद,पंचायत निवडणुकांसाठी ऑफलाईनही अर्ज भरण्याची सवलत

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ नोव्हेंबर -**

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी इच्छूक उमेदवारांना ऑनलाईनबरोबरच ऑफलाईन पद्धतीनेसुद्धा नामनिर्देशनपत्र सादर करण्याची सवलत देण्यात आली आहे. त्याचबरोबर सुट्टीच्या दिवशी शनिवारी ( आणि रविवारी देखील नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याचे आदेश सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत.

राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाने ऑनलाईन पद्धतीने नामनिर्देशपत्र भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे; परंतु विविध राजकीय पक्ष आणि इच्छूक उमेदवारांनी ऑफलाईन पद्धतीने नामनिर्देशनपत्रे सादर करण्याची सवलत देण्यात यावी, अशी मागणी केली होती. त्याबाबत क्षेत्रीय स्तरावर आढावा घेऊन ऑफलाईन पद्धतीनेसुद्धा नामनिर्देशनपत्र भरण्याची सवलत देण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे. नामनिर्देशनपत्रे शनिवारी (ता. १५) आणि रविवारी (ता. १६) या दोन्ही सुट्टीच्या दिवशीही दुपारी ३ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. नामनिर्देशनपत्र व शपथपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबरला दुपारी ३ वाजेपर्यंत आहे.

### बार्शी न. प. निवडणुकीत आज दोन अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ नोव्हेंबर -**

बार्शी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी आज दिवसभरात दोन अर्ज दाखल झाले असून आतापर्यंत तिघांचे अर्ज दाखल आहेत. आज शनिवारी अर्ज दाखल करण्यात येणार असून सोमवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे.

## कुर्डूवाडीत तरुणांचे एकच मिशन; मलिदा गँग करणार हद्दपार

**नविन समिकरण उदयास**

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.१४ नोव्हेंबर-**

सन २०१७ मध्ये शिवसेनेची (उबाठा)बहुमताने सत्ता आली. पाच वर्षात शहरात तीनशे कोटीचा विकास झाल्याचा दावा सत्ताधाऱ्यांकडून सतत होत आहे. मात्र विकासापेक्षा टक्केवारीचाच गोंधळ व भ्रष्टाचाराचीच चर्चा झाली. पुन्हा सत्ताधारी नगरसेवकासह प्रस्थापितांना संधी न देण्यसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शप), शिवसेना (शिंदे गट) पक्षाची युती झाल्याचे सोशल मिडीयातून व्हायरल होत आहे. या अगोदरच बहुतांशी तरूणांनी एकच मिशन मलिदा गँग न.पा.तुन हद्दपार झाली पाहीजे अशी मोहीमच उघडल्याची चर्चा आहे. या सर्वपक्षीय तरूण कार्यकर्त्यांमुळे नव्या समिकरणाचा फटका राष्ट्रवादी काँग्रेसला (अप) पक्षास बसण्याची शक्यता आहे. तर शिवसेना (उबाठा), भाजपा व राष्ट्रवादी (अप) पक्ष स्वतंत्रच लढणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

तीनशे कोटीचा विकास म्हणजे मोठा विनोदच मानला जातोय. नगराध्यक्ष समिर मुलाणी यांच्या पाच वर्षाच्या काळात तीनशे कोटीचा विकास झाल्याचा दावा सत्ताधारी करतात. या कार्यकाळात त्रास सर्वसामान्य नागरीकांना झाला. उपनगराध्यक्ष उर्मिला बागल व नगरसेवक आयुब मुलाणी यांच्या वार्डातील अंदाजे तीन लाख रूपयाचे बांधलेल्या शौचालयाची खुपच चर्चा व टीकाटीपन्नी झाली होती. निकृष्ठ दर्जाचे रस्ते, गटारी, पाईपलाईन यामुळे त्रासाला सामोरे जावे लागले होते. शहरातील तरूण वर्गांनी यावर आवाज उठवण्याचा वारंवार प्रयत्न केला मात्र सत्ताधारी नगरसेवकांनी विशेषता प्रस्थापीतांनी कोणालाही जुमानले नाही. आठ वर्ष जनता सत्ताधा-यांच्या त्रासाला कंटाळली होती. सत्ताधारी नगरसेवक व प्रस्थापीतांनी विकास कामे अतीशय निकृष्ठ दर्जाची करून मोठी माया जमवली व सर्वांनी मलीदा खाल्ला आहे. या सर्व मलीदा गँगला एकदाच धडा शिकवायचा असेल तर विद्यमान एकही नगरसेवक पुन्हा निवडुन आला नाही पाहीजे यासाठी सर्वच पक्षातील तरूण कार्यकर्ते एकवटले आहेत. यासाठी करमाळ्याचे आ.नारायण पाटील व शिवसेना एकनाथ शिंदे पक्ष यांच्यातील मतभेद मीटले असल्याचीही चर्चा आहे. हे जर सत्य असेल तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार सुरेखा गोरे यांच्यासह सर्व पार्टी अडचणी येण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षापेक्षा विद्यमान नगरसेवकच टार्गेटवर असल्याचे बोलले जात आहे.



कुर्डूवाडी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना (धनुष्यबाण) व राष्ट्रवादी (शप) (तुतारी) एकत्र आणण्यासाठी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व आमदार नारायण पाटील यांनी प्रयत्न केले. राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, शहराध्यक्ष दत्ताजी गवळी, शिवसेना जिल्हा उपप्रमुख तात्यासाहेब गोडगे, शहर प्रमुख संभाजी सातव, तालुकाप्रमुख आनंद टोणपे, माजी नगरसेवक लतीफ भाई मुलानी, राष्ट्रवादीकिसान सेल जिल्हाध्यक्ष शंकर बागल, गोविंद पवार, सागर शर्मा, सज्जन दुरापे यावेळी उपस्थीत होते.

## शुक्रवारपर्यंत नगरपालिका अध्यक्ष पदासाठी १९ तर सदस्यासाठी ४५४ अर्ज दाखल

**आज व उद्याही उमेदवारी अर्ज स्वीकारणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

राज्यातील २४६ नगर पालिका व ४२ नगरपंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून, या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल केले जात आहेत. सोलापुरात ११ नगरपालिका आणि १ नगरपरिषदेसाठी ही निवडणूक घेण्यात येत असून, या निवडणुकीसाठी आजतागायत अध्यक्षपदासाठी १९ तर सदस्यपदासाठी ४५४ अर्ज दाखल झाले आहेत. तर ऑफलाईनद्वारे अध्यक्षासाठी २ तर सदस्य पदासाठी ५४ अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान, शनिवार, दि. १५ रोजी व रविवारी दि.१६ रोजी (सुटीदिवशी) उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत.


राज्यात एकीकडे राजकिय पक्षांकडून उमेदवार जाहीर करून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या हालचाली सुरु आहेत तर दुसरीकडे उमेदवारी अर्ज दाखल करून घेणे, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, निवडणूक प्रक्रिया व प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया राबविणे यासाठी प्रशासनाकडून युध्दपातळीवर तयारी केली जात आहे.

आज शुक्रवार, दि. १४ रोजी जिल्ह्यातून अध्यक्षपदासाठी ५ आणि सदस्यासाठी २११ जणांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तर ऑफलाईनद्वारे अध्यक्षपदासाठी १ आणि ३३ अर्ज सदस्यपदासाठी दाखले. आजतागायत अध्यक्षपदासाठी १९ तर सदस्यपदासाठी ४५४ अर्ज दाखल झाले आहेत. तर ऑफलाईनद्वारे अध्यक्षासाठी २ तर सदस्य पदासाठी ५४ अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान, या निवडणुकीत ता. १० नोव्हेंबर ते ता. १७ नोव्हेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असल्याचे जाहिर करण्यात आले आहे. तर ता. १८ नोव्हेंबर रोजी छाननी, ता. २१ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज माघारी घेता येणार असल्याचे जाहिर करण्यात आले.

### वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जखमी

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

बार्शी ते सौंदणे रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जखमी झाले. दशरथ बापू पवार (वय-२२, रा.पुनवा शांती नगर, ख्वाजा नवाज गरीब गल्ली, मुंबई), सिकंदर सुनील काळे (वय-१६, रा.पारधी कॅम्प, ता.बार्शी) अशी जखमींची नावे आहेत. १२ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास दशरथ पवार, सिकंदर काळे हे दोघे दुचाकीवरुन बार्शी ते सौंदणे असे जात होते. त्यावेळी सौंदणे गावाजवळ अज्ञात वाहनाने दुचाकीस धडक दिल्याने त्यात दोघेही जखमी झाले. त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## राष्ट्रवादी काँग्रेसच्या बार्शी तालुका कार्याध्यक्षपदी किशोर मांजरे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१४ नोव्हेंबर-**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या बार्शी तालुका कार्याध्यक्षपदी किशोर मांजरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मान्यतेने जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी हे नियुक्तीपत्र दिले. आगामी काळात पक्ष वाढीसाठी भरीव काम करावे, संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सक्रिय योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. बार्शी तालुक्यातील मौजे देवगाव येथील मांजरे यांचा शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच विविध वंचित घटकातील जनतेला हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी नेहमीच पुढाकार असतो. आगामी काळात उपळाई (ठों.) गणातून पंचायत समिती निवडणुकीसाठी मांजरे यांची उमेदवारी निश्चित होण्याचे संकेत आहेत. सोलापूर जिल्ह्यात पक्ष बळकटीकरणाच्या दृष्टीने ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात असून, नवनियुक्त मांजरे यांचे तालुक्यातून अभिनंदन होत आहे.

## शोकाकुल वातावरणात माजी आमदार पाटील यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार

**अनेक मान्यवरांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१४ नोव्हेंबर-**

अक्कलकोटचे माजी आमदार ,भाजपचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय सिद्रामप्पा पाटील यांच्या पार्थिवावर कुमठे या त्यांच्या मूळ गावी अत्यंत शोकाकुल वातावरणात शुक्रवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी उपस्थित जनसागराने आपल्या लाडक्या नेत्याला साश्रूपूर्ण नयनांनी अखेरचा निरोप दिला.

अक्कलकोटचे माजी आमदार भाजपचे ज्येष्ठ नेते पोलादी पुरुष अशी ओळख असणारे लोकनेते सिद्रामप्पा पाटील यांचं अल्पशा आजाराने गुरुवारी सायंकाळी सोलापुरातील खाजगी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक राजकीय आणि सहकार क्षेत्रात शोककळा पसरली. अक्कलकोट तालुक्यात आप्पांच्या निधनानं तीव्र शोक व्यक्त करण्यात आला दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे नेतेगण ,पदाधिकारी, सामाजिक संस्था, संघटना आदींकडून सिद्रामप्पा पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. अंत्यदर्शनासाठी त्यांचं पार्थिव मूळगाव कुमठे येथे नेण्यात आले. यावेळी अंत्यदर्शनासाठी जनसागर उसळला होता. तालुक्यासह राज्यातील विविध भागातून लोक अंत्यदर्शनासाठी दाखल झाले होते. सामाजिक, राजकीय क्षेत्रासह शासन, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी व विविध स्तरातील मान्यवरांनी सिद्रामप्पा पाटील यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतले. निशब्द आणि स्तब्ध अशी इथली शोकाकुल अवस्था होती. स्वर्गीय आप्पानी सर्वांना सोबत घेऊन आपली राजकीय वाटचाल राखली. अनेक कार्यकर्ते घडवले. अंत्यसंस्कारावेळी माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, शिवानंद शिवाचार्य महास्वामी, मैंदर्गीचे नीलकंठ शिवाचार्य महास्वामी, करजगीचे शिवानंद शिवाचार्य महास्वामी यांच्यासह कर्नाटकचे कृषी व पणन मंत्री शिवानंद पाटील, इंडीचे आमदार यशवंत गौडा पाटील, आमदार सुभाष देशमुख आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, धर्मराज काडादी, राजशेखर शिवदारे, माजी आमदार शिवशरण पाटील बिराजदार, विश्वनाथ चाकोते सुरेश हसापुरे, महादेव बहिरगोंडा, रामचंद्र अरवत, महादेव कोगनुरे, कुमार करजगी, बाबुराव पाटील, हनुमंत कुलकर्णी, मल्लिकार्जुन काटगाव, डॉ.अशोक हिप्परगी, प्रकाश हिप्परगी, मल्लिकार्जुन पाटील, विवेकानंद उंबरजे, दयानंद उंबरजे, काशिनाथ कोडते, अण्णाराव बाराचारे, आनंद तानवडे, शशिकांत बिराजदार, कर्नाटकचे पंचपा कलबुर्गी, डॉ.चनगोंडा हवीनाळे, महेबुब मुल्ला, अमर पाटील, अप्पू परमशेट्टी, अतुल मेळकुंदे, शंकर म्हेत्रे, सिद्धार्थ गायकवाड, सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, महेश हिंडोळे, आप्पाराव कोरे, परमानंद अलगोंडा, बसलिंगप्पा खेडगी, अशोक देवकते, वकील बागवान, रमेश बाके, केदारनाथ उंबरजे, कुंभारीचे शिरीष पाटील, उदयशंकर पाटील, सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, सिद्धार्थ गायकवाड याबाजी यांच्यासह विविध गावचे सरपंच, सोसायटीचे चेअरमन, प्रतिष्ठित नेते मंडळी, विविध पक्षांचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येन उपस्थित होते.



### सिद्रामप्पा पाटील यांनी भूषविलेली पदे

सरपंच - ग्रुप ग्रामपंचायत मौजे कोर्सेगांव कुमठे ता. अक्कलकोट जि.सोलापूर कालावधी सन १९६२ पासून १९७७ पर्यंत, पंचायत समिती सभापती- सन १९९२ पासून १९९७ पर्यंत, जिल्हा परिषद सदस्य- सन १९७२ पासून २००२ पर्यंत जिल्हा परिषद उपाध्यक्ष-कालावधी २४/०४/१९८९ पासून ३०/०६/१९९० पर्यंत, सभापती (शिक्षण व आरोग्य खाते)- १९९७ ते १९९८, शैक्षणिक संस्था- संस्थापक अध्यक्ष श्री मल्लिकार्जुन शिक्षण संस्था. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक कालावधी- सन १९७८ पासून २०१४ पर्यंत बँकेचे उपाध्यक्ष, सहकारी साखर कारखाना- श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि. अक्कलकोट मार्केट कमिटी सभापती म्हणून १९८२ ते १९८७ व सध्या २०२३ पासून सभापती म्हणून काल पर्यंत कार्यरत होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/






(१) बिहारातील बंपर विजयानंतर आनंद साजरा करताना अमृतसर येथील भाजप कार्यकर्ते (२) टायगर अभी जिंदा है, अशी घोषणाबाजी करीत संयुक्त जनता दलाच्या कार्यकर्त्यांनी नितीशकुमार यांच्या पोस्टरला लाडू भरवत आनंद साजरा केला (३) विजयानंतर आई रीना पासवान यांनी लोक जनशक्ती पार्टी (राम विलास)चे प्रमुख आणि पुत्र चिराग यांचे गुलाल लावून अभिनंदन केले (४) जम्मू-काश्मीरमधील नागरोटा विधानसभा पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या भाजप उमेदवार देवयानी राणा

# हायड्रोजन बॉम्ब फुसका

## मतचोरीच्या आरोपांना मतदारांनी नाकारले, महाआघाडीला जोरदार झटका

◆ **पाटणा, १४ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीवेळी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी हायड्रोजन बॉम्बचा उल्लेख करीत मतचोरीचे आरोप केला आणि निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत जनतेची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्या आरोपांकडे



मतदारांनी दुर्लक्ष करीत रालोआला प्रचंड मतदान केले. पर्यायाने राहुल यांचा हायड्रोजन बॉम्ब फुसकाच ठरला.

बिहार निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांनी जोर लावत मोठ्या प्रमाणात प्रचार केला. अशातच महाआघाडीतील 'राहुल फॅक्टर' बिहारमधील निवडणूक निकालांवर प्रभाव टाकू शकतो अशी अटकळ होती. त्याला कारण म्हणजे, राहुल गांधी यांनी गेल्या काही महिन्यांपासून वारंवार मतचोरीचा मुद्दा उपस्थित केला. नागरिकांना आपल्या बाजूने घेण्यासाठी मताधिकार यात्रादेखील काढली. त्यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर 'हायड्रोजन बॉम्ब' टाकत असल्याचे दावे केले. मात्र निकालात जनतेने राहुल यांनी केलेल्या सर्व दाव्यांकडे दुर्लक्ष करीत रालोआकडे पुन्हा सत्ता सोपविण्याचा निर्णय घेतला. (वृत्तसंस्था)




बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होण्यास प्रारंभ झाल्यावर काँग्रेसच्या दिल्ली येथील कार्यालय परिसरात शुकशुकाट होता

### राहुल यांच्या नेतृत्वात काँग्रेसचा ९५ निवडणुकांमध्ये पराभव

भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी राहुल गांधींवर टीका करताना म्हटले की, पराभवात राहुल निर्विवाद नंबर वन ठरले आहे. राहुल यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षाचा आतापर्यंत ९५ निवडणुकीत पराभव झाला आहे. जवाहरलाल नेहरूंच्या वाढदिवसानिमित्त हे घडणे हा योगायोग नाही, तर काँग्रेसवरील जनतेचा विश्वास उडाल्याचा स्पष्ट संदेश आहे.

जंगल राज नाही, धर्मांधता नाही, गुंडगिरी नाही, तुष्टीकरण नाही, घराणेशाही नाही, घोटाळे नाहीत, भ्रष्टाचार नाही, अहंकार नाही आणि जातीयवाद नाही, तर बिहारच्या जनतेने केवळ सुशासन, विकास आणि पारदर्शकतेला निवडले आहे.



**- केशव प्रसाद मौर्य**, भाजपा नेते

# काँग्रेसच्या पराभवासाठी एसआयआर जबाबदार

## पवन खेडा यांचा आरोप, गणित चुकले

◆ **नवी दिल्ली, १४ नोव्हेंबर**



बिहार निवडणुकीतील पराभवासाठी मतदार याद्यांचे पुनरीक्षण अर्थात् एसआयआर जबाबदार असल्याचा दावा काँग्रेस नेते पवन खेडा यांनी केला. निवडणूक आयोगाच्या निर्णयाने आमचे गणित चुकले असेही ते म्हणाले. बिहार निकालावर वृत्तसंस्थेशी संवाद साधताना पवन खेडा म्हणाले, ही निवडणूक जनता आणि निवडणूक आयोगाविरोधात होती. जनतेने आम्हाला साथ दिली नाही याचे वाईट वाटते. हा विजय भाजपा अथवा रालोआचा नसून निवडणूक आयोग आणि एसआयआर प्रक्रियेता आहे. आम्ही सातत्याने एसआयआरचा निषेध केला आहे. (वृत्तसंस्था)

### महिलांना दहा हजार दिल्याने विजय : अशोक गेहलोत



काँग्रेस नेते अशोक गेहलोत म्हणाले, मतदानापूर्वी महिलांना देण्यात आलेली दहा हजाराची मदत रालोआच्या विजयासाठी महत्त्वाची ठरली. निवडणूक आयोगाने आमच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले. त्यांचे सत्ताधारी पक्षाशी संगनमत होते, आणि याचा आम्हाला मोठा फटका बसला.

### पक्षाने आत्मपरीक्षण करावे : शशी थरूर



काँग्रेस नेते शशी थरूर म्हणाले, पक्षाने आत्मपरीक्षण करायला हवे, तसेच महाआघाडीत सर्वाधिक जागा लढविणाऱ्या राजदनेदेखील काळजीपूर्वक परीक्षण करावे. पराभवासाठी लोकांचा कल, संघटनात्मक शक्ती आणि कमकुवतपणा असे अनेक मुद्दे जबाबदार आहेत. तसेच पक्षाने मला निवडणुकीत प्रचारापासून दूर ठेवले.

# २०१० च्या निकालाची पुनरावृत्ती

◆ **पाटणा, १४ नोव्हेंबर**

२०२५ च्या रालोआच्या विजयानंतर २०१० च्या निवडणूक निकालाच्या आठवणींना उजाळा मिळाला आहे. ही तीच निवडणूक होती, ज्यात भाजपा आणि नितीश कुमार यांच्या जेदयूने कमालच केली नव्हती तर विरोधकांना जबरदस्त झटका दिला होता. त्यावेळी रालोआने २०६ जागांवर विजय मिळवला होता.

निवडणुकीचे निकाल आले तेव्हा रालोआने रेकॉर्डब्रेक २०६ जागांवर विजय मिळवला. या निकालात विरोधीपक्ष असेलेल राजद, एलजेपी आणि काँग्रेसला केवळ २५ जागांवर समाधान मानावे लागले. या निवडणुकीत जदयू ११५, भाजपा ९१ जागांवर विजयी झाली होती. दुसरीकडे राजद २२ आणि एलजेपी ३ आणि काँग्रेसने ४ जागा जिंकल्या होत्या. (वृत्तसंस्था)

# अजितदादांचे सर्व उमेदवार ५०० च्या आत

◆ **मुंबई, १४ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी एनडीएने विरोधी बाकावरील महाआघाडीचा पुरती दाणादाण उडवली आहे. बिहारमध्ये पुन्हा मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वातील एनडीए सरकार येणार हे स्पष्ट झाले आहे. त्यात आता वेगवेगळ्या पक्षांनी केलेली सुमार कामगिरीही समोर येत आहे.

**लढवल्या होत्या १४ जागा**



महाराष्ट्रातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसने बिहार विधानसभा निवडणुकीत तब्बल १४ जागा लढवल्या होत्या. पण या सर्वच जागांवर राष्ट्रवादीला पराभवाचे तोंड पहावे लागले आहे. यापैकी एकाही उमेदवाराला ५०० मतांचा टप्पा ओलांडता आला नाही. त्यांच्याहून अधिक मते अपक्ष म्हणून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना पडली आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसने नारकटियागंज येथे मोहम्मद राशिद अझीम यांना उमेदवारी दिली होती. हे वृत्त लिहेस्तोवर त्यांना केवळ १०४ मते मिळाली. नौटन विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादीचे उमेदवार जय प्रकाश यांना केवळ ४३ मते मिळाली. तर पिंप्रा येथील अमित कुमार कुशवाहा यांना ३७०, मनिहारी येथील सैफ अली खान यांना १९६, पारसा येथील बिपीन सिंह यांना १४४, सोनेपूर येथील धर्मवीर कुमार यांना अवघी २५ मते मिळाली आहेत.

महुआ विधानसभा मतदारसंघात अखिलेश कुमार ठाकूर यांना १४९ मते, राघोपूर येथे अनिल सिंह यांना १४७ मते, बाखरी येथील विकास कुमार यांना १२७ मते, अमरपूर येथील अनिल कुमार सिंह यांना ५२ मते, पाटना साहिबचे राष्ट्रवादीचे उमेदवार आदिल आफताब खान यांना १९२ मते मिळाली. (वृत्तसंस्था)

# एसआयआरने खेळ केला : अखिलेश

◆ **लखनौ, १४ नोव्हेंबर**

बिहार निवडणुकीत एनडीए युती मोठ्या विजयाकडे वाटचाल करत आहे. निवडणूक निकाल आता स्पष्ट होत आहेत. निकालाने उत्तरप्रदेशातील भाजपा आणि त्यांचे मित्रपक्ष आनंदात आहेत. एनडीए युती या विजयाला विकासाचा विजय म्हणत आहे. दरम्यान, अखिलेश यांनी विरोधकांच्या पराभवासाठी एसआयआरला जबाबदार धरले.

सपा प्रमुख म्हणाले की,



बिहारमध्ये मतदार यादी पुनरीक्षणाच्या नावाखाली एक खेळ खेळला गेला आहे. आम्ही उत्तरप्रदेशात असे होऊ देणार नाही. दरम्यान, काशीमध्ये भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा करण्यास सुरुवात केली आहे. पंतप्रधान मोदींच्या संसदीय मतदारसंघात भाजपा कार्यकर्त्यांनी 'बिहारमें बहार... ' असे लिहिलेले पोस्टर घेऊन मिरवणूक काढली. मिरवणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणात फटाके फोडण्यात आले. कार्यकर्ते ढोल ताशांच्या तालावर नाचताना दिसले. (वृत्तसंस्था)

### भाजपा हा दल नाही, छल आहे

अखिलेश म्हणाले, बिहारमध्ये ने खेळलेला खेळ आता पश्चिम बंगाल, तामिळनाडू, उत्तरप्रदेश किंवा इतरत्र शक्य होणार नाही, कारण हे निवडणूक कट आता उघड झाले आहे. आम्ही त्यांना हा खेळ पुढे खेळू देणार नाही. सीसीटीव्हीप्रमाणे, आमचे पीपीटीव्ही किंवा पीडीए प्रहारी सतर्क राहतील आणि भाजपाच्या योजनांना हाणून पाडतील. भाजपा हा दल नाही, छल आहे.



बिहार निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर राष्ट्रीय जनता दलाची खिल्ली उडविताना संयुक्त जनता दलाचा कार्यकर्ता

# तुरुंगात असताना निवडणूक जिंकली

## अनंत कुमार सिंह यांची अशीही कमाल

◆ **पाटणा, १४ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीत मोकामा या लोकप्रिय मतदारसंघातून एनडीएचे उमेदवार अनंत कुमार सिंह विजयी झाले आहेत. विशेष म्हणजे, कारागृहात असतानाही त्यांनी आपली विजयी पताका फडकवली.

अनंत कुमार सिंह यांनी आरजेडी उमेदवार वीणा यांचा २८,००० पेक्षा जास्त मतांनी पराभव केला. दुलारचंद यादव हत्याकांडात नाव आल्यानंतर तुरुंगात असलेले जेडीयू उमेदवार मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच आघाडीवर होते. या विधानसभा निवडणुकीत अनंत सिंह यांचे नाव विशेष आहे कारण जागा आणि तिकिटे वाटप होण्यापूर्वीच त्यांनी मोकामा येथून जेडीयूच्या तिकिटावर निवडणूक लढवण्याची घोषणा केली. ६ नोव्हेंबर रोजी पहिल्या टप्प्यात मोकामा येथे मतदान झाले होते, त्यापूर्वी दुलारचंद यादव हत्याकांडाच्या आरोपाखाली अनंत सिंह यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. (वृत्तसंस्था)

# चिराग पासवान ठरले 'रवींद्र जडेजा'

## बिहार निवडणुकीत पार पाडली 'फिनिशर'ची भूमिका

◆ **पाटणा, १४ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीत रालोआने दणदणीत विजय मिळवला. या निवडणुकीत चिराग पासवान रालोआसाठी 'रवींद्र जडेजा' ठरले. त्यांच्या लोजपा (आरव्ही) 'फिनिशर'ची भूमिका पार पाडली. रवींद्र जडेजा ज्याप्रमाणे शेवटच्या षटकांमध्ये भारतासाठी आक्रमक खेळ खेळून सामना जिंकवून देतो, तशीच कामगिरी चिराग पासवान यांनी केली आहे.

चिराग पासवान यांनी २९ जागांवर उमेदवार दिले होते. त्या तुलनेत भाजपा आणि जदयूने प्रत्येकी १०१ जागा वाटून घेतल्या होत्या. मोठ्या पक्षांनी सलामीला येणाऱ्या फलंदाजांप्रमाणे दणकट सुरुवात करून दिली. मात्र, 'फिनिशिंग टच' चिराग पासवान यांच्या पक्षाला द्यायचा होता आणि त्यांनी ती कामगिरी बिनचूकपणे पार पाडली.

२०२४ च्या लोकसभा निडणुकीत पाच जागांवर निवडणूक लढवत त्या सर्व जिंकणाऱ्या चिराग पासवान यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'हनुमान' म्हटले गेले होते. आता पुन्हा त्यांनी तशीच दमदार कामगिरी पार पाडली. विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाने २३ पैकी २३ जागांवर विजय मिळवला. मगध, सीमांचल आणि पाटलीपुत्र भागात चिराग पासवान यांनी दमदार कामगिरी केली. त्यांच्या पाच टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळाली आहेत.

**रालोआचे मत हस्तांतरण चिरागांकडे**

रालोआचे मोठ्या प्रमाणात मत हस्तांतरण चिराग पासवान यांच्या पक्षाकडे झाले. भाजपा आणि जदयूच्या समर्थकांनी लोजपाच्या उमेदवारांवर विश्वास दाखवला आणि त्यांच्या उमेदवाराला भरभरून मतदान केले. (वृत्तसंस्था)

### आश्चर्यचकित करणारी कामगिरी

२०२० च्या तुलनेत चिराग पासवान यांची कामगिरी आश्चर्यचकीत करणारी ठरली. २०२० मध्ये लोजपाने १३७ जागा लढवल्या होत्या. मात्र, केवळ एक जागा जिंकणेच शक्य झाले होते. चिराग यांच्या नितीशविरोधी मोहिमेमुळे जदयूला मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. यावेळी रालोआच्या सोबत राहून चिराग पासवान यांनी केवळ आपला पक्षच बळकट केला नाही, तर नितीशकुमार आणि रालोआच्या जागा वाढवल्या.

# विविधतेला सांभाळणे जगाला शिकवणार भारत : सरसंघचालक

◆ **जयपूर, १४ नोव्हेंबर**



विविधतेला कसे सांभाळायचे, हे आपल्याला जगाला शिकवायचे आहे. कारण, भारताकडे याचे जे तंत्र आहे, ते जगात कोणाकडेही नाही. भारत हा विविधतेत एकता असणारा असामान्य देश आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

संघ शताब्दीनिमित्त '१०० वर्षांची संघ यात्रा श्रृंखला' अंतर्गत कॉन्स्टिट्यूशन क्लब जयपूर येथील पृथ्वीराज चौहान सभागृहात ते बोलत होते. 'उद्यमी संवाद-नव्या क्षितिजाकडे' या विषयावर सरसंघचालकांनी राजस्थानातील प्रमुख उद्योजकांशी संवाद साधला. ते म्हणाले, संघाचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय त्याविषयी आपले मत बनवू नका. संघाशी जोडण्याकरिता शाखेत या, जे तुम्हाला अनुकूल वाटेल, ते काम तुम्ही करू शकता. संघ संपूर्ण समाजाला संघटित करू इच्छितो. संपूर्ण समाज संघ बनावा, म्हणजेच प्रामाणिकता, नि:स्वार्थ बुद्धीने सर्वांनी जगले पाहिजे, हा आमचा उद्देश आहे.

संघाचा १०० वर्षांचा प्रवास पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये कोणतेही मोठ्या जल्लोषांचे आयोजन नाही, तर पुढील वाटचालीच्या दृष्टीने आपल्या कामाची व्याप्ती वाढविण्यासाठी नवनवीन उपक्रम केले जात आहेत. राष्ट्राला परम वैभवसंपन्न आणि विश्वगुरू बनवणे कोणत्याही एका व्यक्तीचे काम नाही. हे सर्वांचे काम आहे आणि यासाठी सर्वांना एकत्रित वाटचाल करावी लागेल, असे ते म्हणाले.

संघाची स्थापना कोणत्याही एका विषयाला अनुसरून झालेली नाही. संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार क्रांतिकारी होते. ते इंडियन नॅशनल काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ता होते. संघ स्थापनेपूर्वी आणि नंतर आंदोलनांदरम्यान असे दोन वेळा ते कारागृहात गेले. देशहिताच्या प्रत्येक कार्यात ते सक्रिय राहिले. असहकार आंदोलनात त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोपही ठेवण्यात आला. त्यांनी स्वत:च्या बचावासाठी आपली बाजू मांडण्याचा पर्याय निवडला. कारण, त्यांना पुन्हा भाषणाची संधी मिळाली नसती. त्यांनी बचावाचे असे काही भाषण केले की, ते ऐकून न्यायाधीशांना हे म्हणावे लागले की, त्यांच्या आधीच्या भाषणापेक्षा दुसरे जास्त राजद्रोही आहे. डॉ. हेडगेवारांना हे लक्षात आले की, समाजात दीड हजार वर्षांपासून अनेक दुर्गुण रूजत आले आहेत, जे दूर करणे गरजेचे आहे. त्यांना हे जाणवले की, हिंदू समाजाला एकत्र आणल्याशिवाय या आजारातून मुक्त होता येणार नाही. त्यासाठी त्यांनी सुमारे दशकभर विचार आणि विविध प्रयोग केल्यानंतर संघाची स्थापना केली, याकडे सरसंघचालकांनी लक्ष वेधले.

सरसंघचालक म्हणाले, संघाची स्थापना कोणाला नष्ट करण्यासाठी झालेली नाही. भारतात आपली ओळख हिंदू अशी आहे. हिंदू शब्द सर्वांना एकत्र आणणारा आहे. आपला देश राज्यांवर नव्हे, तर संस्कृतीच्या आधारावर एक आहे. पूर्वी जेव्हा राज्य अनेक होते, तेव्हा आपण एक देश होतो, पराधीन होतो तेव्हा देखील एक देश होतो. संघ व्यक्ती निर्माणाचे कार्य करतो. संघ स्वयंसेवक तयार करतो आणि स्वयंसेवक बाकी सर्व कामे करतात. (वृत्तसंस्था)

### सहकार, कृषी, उद्योग हे विकासाचे आधारस्तंभ

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले, सहकार, कृषी आणि उद्योग आपल्या विकासाचे आधारस्तंभ आहेत. कृषी, व्यापार, उद्योग एकमेकांच्या हातात हात घालून, परस्पर निर्भर होऊन एकत्रितपणे प्रगतीपथावर यावे. छोटे आणि मध्यम उद्योग अर्थव्यवस्थेचे विकेंद्रिकरण करतात. या उद्योगांना पोषक वातावरण देणे मोठ्या उद्योगांचे काम आहे. छोट्या उद्योगांमध्ये रोजगार, कौशल्य, उत्पादन गुणवत्ता आणि उत्पादन वाढणे गरजेचे आहे.

# ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल यांचे निधन

**मुंबई, १४ नोव्हेंबर -**

हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल यांचे शुक्रवारी वयाच्या ९७ व्या वर्षी निधन झाले. त्या शेवटच्या आमिर खान आणि करीना कपूर स्टारर 'लाल सिंह चड्ढा' या चित्रपटात दिसल्या होत्या. २०२३ मध्ये आलेल्या शाहिद कपूर आणि कियारा अडवाणी यांच्या 'कबीर सिंह' या चित्रपटात त्यांनी शाहिद कपूरच्या आजीची भूमिका देखील साकारली होती.

सर्वाधिक मानधन घेणारी अभिनेत्री कामिनी कौशल या १९४० च्या दशकातील सर्वात



यशस्वी अभिनेत्रींपैकी एक होत्या. १९४७ आणि १९४८ मध्ये बॉक्स ऑफिस इंडियाच्या टॉप अभिनेत्रींच्या यादीत त्या पहिल्या क्रमांकावर होत्या. २०२२ मध्ये, त्यांचा समावेश आउटलुक इंडियाच्या ७५ सर्वोत्कृष्ट बॉलिवूड अभिनेत्रींमध्ये झाला.

कामिनी कौशल यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९२७ रोजी लाहोर येथे झाला. त्यांचे वडील, प्राध्यापक शिवराम कश्यप, लाहोर येथील पंजाब विद्यापीठात वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यांना भारतात बॉयोलॉजीचे जनक म्हणूनही ओळखले जाते.

त्यांनी सहा नवीन वनस्पती प्रजाती शोधल्या. कामिनी दोन भाऊ आणि तीन बहिणींमध्ये सर्वात लहान होत्या. कामिनी सात वर्षांच्या असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. सात दशकांच्या चित्रपट कारकिर्दीत, कामिनी कौशल यांनी दो भाई, शहीद, नदिया के पार, जिद्दी, शबनम, पारस, उपकार, पूरब और पश्चिम, रोटी, कपडा और मकान यांसारख्या चित्रपटांत काम केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# पुन्हा एकदा मंगलराज

बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मिळालेल्या दणदणीत विजयाचे 'अभूतपूर्व' या शब्दातच वर्णन करावे लागेल. बिहारमध्ये रालोआ विजयी होणार, याबद्दल कोणाच्याच मनात शंका नव्हती. मात्र रालोआचा विजय हा एवढा एकतर्फी राहील, अशी कल्पनाही कुणी केली नव्हती हेही खरे. बिहारमधील रालोआच्या या विजयाचे खरे शिल्पकार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आहेत. रालोआ या निवडणुकीत १६० च्या वर जागा जिंकेल, असा विश्वास या दोन्ही नेत्यांनी व्यक्त केला होता; प्रत्यक्षात रालोआ २०० च्या घरात गेला. रालोआने राज्यात हा विक्रमी आकडा दुसऱ्यांदा गाठला आहे. बिहारमध्ये रालोआ आणि महाआघाडी यांच्यात चुरशीची लढत असल्याने जी आघाडी जिंकेल आणि जी पराभूत होईल, त्यांच्यात जागांचा फार थोडा फरक राहील, असे वाटत होते. पण बिहारच्या जनतेने हा अंदाज खोटा ठरवला आणि रालोआला छप्पर फाड के बहुमत दिले. बिहारी लोक राजकीयदृष्ट्या किती सजग आहेत, याचाच हा पुरावा.

गेल्या दोनेक दशकांपासून नितीशकुमार बिहारचे मुख्यमंत्री राहिले आहेत. आतापर्यंत नऊ वेळा त्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. दहाव्यांदाही त्यांना संधी मिळेल, असे सध्या तरी दिसते. पुढची समीकरणे कशी आकार घेतात यावर ते ठरेल. सुरुवातीला प्रकृतीच्या कारणावरून नितीशकुमार यांना धारेवर धरण्यात आले होते. पण बिहारचे खरे आणि लोकप्रिय नेते नितीशकुमारच आहेत, हे या निवडणूक निकालांनी सिद्ध झाले. मागील विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत जदयुच्या जागांमध्येही यावेळी लक्षणीय वाढ झाली आहे. जदयुला दणदणीत विजयाची पूर्ण खात्री होती. मतमोजणीच्या आधीपासूनच राजधानी पाटण्यात 'टायगर अभी जिंदा है' असा मजकूर असलेले मोठमोठे होर्डिंग्ज लावण्यात आले होते. ही तयारी सार्थ होती आणि नितीशकुमार बिहारचे निर्विवाद नेते आहेत, हे या निकालांनी पुन्हा एकदा सिद्ध झाले. बिहारची निवडणूक रालोआ आणि महाआघाडी उर्फ महागठबंधन यांच्यात लढली गेली. रालोआचे नेतृत्व जनता दल संयुक्तचे नेते आणि विद्यमान मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्याकडे होते, तर महाआघाडीचे नेतृत्व राजदचे तेजस्वी यादव यांच्याकडे होते. जदयु आणि राजद हे दोन्ही प्रादेशिक पक्ष. पण भाजपा आणि काँग्रेस या दोन्ही मोठ्या पक्षांना ही निवडणूक जदयु आणि राजद या दोन प्रादेशिक पक्षांचे बोट पकडून लढवावी लागली. मतमोजणीनंतर भाजपाने आपण मोठा भाऊ असल्याचे सिद्ध केले, हे खास. काँग्रेसची काय गत झाली, ते साऱ्यांनीच पाहिले.

रालोआने बिहार विधानसभा निवडणुकीत दुहेरी शतक झळकावले आहे. २०० च्या आसपास जागांचा पल्ला गाठला आहे. महाआघाडीला फार मोठा फटका बसला आहे. बिहारच्या या निकालांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालांची आठवण करून दिली. गेल्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडी सत्तेवर येईल, असे वातावरण होते. लोकसभा निकालांची त्याला पृष्ठभूमी होती. मात्र महायुतीने विधानसभेच्या २०० च्या आसपास जागा जिंकत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. बिहारमध्ये तसेच झाले. हे अकल्पित असले तरी मतदारांनी ठरविले तर काय घडू शकते, याची ही ग्वाही आहे हेच खरे. रालोआच्या या विजयाचे श्रेय भाजपाचे निवडणूक प्रभारी आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान तसेच भाजपाचे राष्ट्रीय महासचिव आणि बिहारचे प्रभारी विनोद तावडे यांना द्यावे लागेल. याशिवाय, महाराष्ट्राचे सुपुत्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही श्रेय द्यावे लागेल. बिहारमध्ये रालोआच्या विजयात या दोन्ही नेत्यांचा वाटा मोठा आहे. त्यांनी अनेक ठिकाणी सभा घेतल्या. बिहारमधील रालोआच्या विजयात महाराष्ट्रातील या तीन महाराष्ट्रीय नेत्यांचे योगदान कोणालाच नाकारता येणार नाही.

रालोआने बिहारची निवडणूक विद्यमान मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात लढवण्याची घोषणा केली होती. मात्र, नितीशकुमार यांना रालोआचा मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले नव्हते. नवनिर्वाचित आमदार नवा मुख्यमंत्री ठरवतील, असे भाजपा नेते सांगत होते. येणाऱ्या काळात नेमके काय ते कळेल. महाआघाडीने मात्र राजदचे तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा तर व्हीआयपीचे नेते मुकेश सहानी यांना उपमुख्यमंत्रिपदाचा उमेदवारही जाहीर केले होते. या निवडणुकीत व्हीआयपीला आपले खातेही उघडता आले नाही. तेजस्वींच्या नेतृत्वात सरकार येण्याचा प्रश्न तर पार निकालीच निघाला.

महाआघाडीची सत्ता आल्यावर काँग्रेस पक्षाचा एक तसेच अल्पसंख्यक समाजातून एक असे आणखी दोन उपमुख्यमंत्री देण्याची घोषणाही महाआघाडीने केली होती. तेजस्वी यादव यांनी तर आपले मंत्रिमंडळही तयार करून ठेवले असावे. अर्ध्या हळकुंडात पिवळे होणे म्हणजे काय, हे तेजस्वी यादव यांनी दाखवून दिले. नितीशकुमार यांच्या तुलनेत तेजस्वी यादव हे तरुण रक्ताचे नेते. पण, तेजस्वी यादव यांच्या जोशवर नितीशकुमार यांच्या होशने मात केली, असे म्हणायला हरकत नाही. योगायोग म्हणजे बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल १४ नोव्हेंबरला जाहीर झाले; हा दिवस बाल दिवस म्हणून देशात साजरा केला जातो. यादिवशी लालूप्रसादांच्या दोन बालांची स्वप्ने हवेत विरली. नाव मोठे आणि लक्षण खोटे अशी या दोघांची स्थिती झाली. बिहारच्या मतदारांनी या दोघांना त्यांची जागा आणि लायकी दाखवून दिली. देशाच्या अन्य भागांप्रमाणे बिहारातही काँग्रेसचे पानिपत झाले. विधानसभा निवडणुकीच्या आधी काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बिहारमध्ये मतदार अधिकार यात्रा काढली होती. त्या यात्रेला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे काँग्रेसचा उत्साह वाढला होता. परंतु, त्या उत्साहावर विरजण टाकणारा निकाल आला आहे. राहुल गांधींच्या नंतर राजद नेते तेजस्वी यादव यांनीही बिहारमध्ये एक यात्रा काढली. या दोन्ही यात्रांचा काहीच परिणाम मतदारांवर झाला नाही. राहुल गांधी हे काँग्रेसचे सर्वांत अपयशी नेते आहेत, हे या निवडणूक निकालांनी पुन्हा एकदा सिद्ध झाले. राहुल गांधी काँग्रेसला आतापर्यंत एकही निवडणूक जिंकून देऊ शकले नाहीत. नवीन राज्यात काँग्रेसची सत्ता आणणे तर दूर; पण ज्या राज्यात काँग्रेसची सत्ता होती, तिथली सत्ताही ते टिकवू शकले नाहीत. निवडणूक कशी लढवावी, निवडणुकीचे नियोजन कसे करावे, हे काँग्रेस नेत्यांनी अमित शाह यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. तर, निवडणूक कशी लढवू नये, हे काँग्रेस आणि महाआघाडीकडून शिकले पाहिजे, असे हा निकाल सांगतो.

बिहारमध्ये महिला आणि तरुणांनी नितीशकुमार यांच्या बाजूने मतदान केले, असे दिसते. महिलांसाठी नितीशकुमार यांच्या सरकारने महिला स्वयंरोजगार योजना जाहीर केली. महिलांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी नितीशकुमार सरकारने त्यांच्या खात्यात प्रत्येकी १० हजार रुपये जमा केले. राज्यातील ७५ लाख महिलांच्या खात्यात असे पैसे जमा झाले. नंतर ही संख्या वाढत-वाढत दीड कोटीपर्यंत गेली. महिलांना नंतर त्यांच्या रोजगारासाठी दोन लाख रुपये देण्याचेही सरकारने जाहीर केले होते. त्याचा सकारात्मक परिणाम झाला. महाराष्ट्रातील महायुतीचा विजय हा जसा लाडकी बहीण योजनेचा होता, तसाच बिहारमधील रालोआचा विजय हा या योजनेचा विजय म्हणावा लागेल. त्यामुळे यावेळी पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या मतदानाची टक्केवारी जास्त होती. तरुणांना एक कोटी नोकऱ्या देण्याची घोषणाही रालोआने केली होती. त्यामुळे तरुणांनी रालोआच्या बाजूने भरभक्कम मतदान केले, असे दिसते. महाआघाडीनेही अशाच आशयाची आश्वासने दिली होती, पण त्यांच्या आश्वासनांपेक्षा मतदारांना रालोआच्या आश्वासनाची विश्वसनीयता जास्त वाटली असावी. एकुणात रालोआच्या दणदणीत विजयाने बिहारमध्ये पुन्हा एकदा डबल इंजिन सरकारचा मार्ग प्रशस्त झाला आहे. त्यामुळे बिहारच्या प्रगतीला आणखी वेग येणार आहे. बिहारमध्ये महाआघाडीच्या जंगलराजचे सावट निकालात काढताना मतदारांनी रालोआच्या मंगलराजला आपली पसंती दिली, हेच या निवडणुकीच्या निकालांनी स्पष्ट झाले आहे.

## यंगिस्तान

# परंतु तेथे भैरवाचे अधिष्ठान पाहिजे...

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

१० नोव्हेंबर २०२५, संध्याकाळी ६.५२ वाजता दिल्लीतील लाल किल्ल्याजवळील चांदनी चौक आणि नेताजी सुभाष मार्गाच्या टोकावर, लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट नंबर १ जवळ एका कारमध्ये स्फोट झाला आणि पुन्हा एकदा थरकाप उडाला. स्फोटामुळे परिसरातील इतर वाहनांना आग लागली आहे. १३ जण मृत व २० हून अधिक जखमी झाल्याची बातमी समोर येत आहे. या कारमध्ये डॉ. उमर नबी होता, तो देखील यात दगावला आहे. मात्र हा उमर आत्मघाती बॉम्बर असल्याची माहिती येत आहे. या प्रकरणात ५ ते ९ संशयितांना अटक करण्यात आली आहे. ज्यात प्रामुख्याने डॉ. मुजम्मिल, डॉ. शाहीन सईद (महिला डॉक्टर), डॉ. आदिल अशा उच्चशिक्षित डॉक्टरांचा सहभाग आहे. आत्मघाती बॉम्बर डॉ. उमर नबी हा देखील पेशाने उच्चशिक्षित डॉक्टर होता. ओसामा बिन लादेनही उच्चशिक्षित होता हे देखील आपण इथे समजून घेतलं पाहिजे. त्यामुळे शिक्षणाच्या अभावामुळे लोक अतिरेकी होतात किंवा कुणावर अत्याचार होतो, सतत टीका होते म्हणून लोक दहशतवादी होतात हे पूर्णपणे खोटं आहे. तसं असतं तर डायरेक्ट ॲक्शनमधील, काश्मीरमधील नरसंहाराला आणि अत्याचाराला बळी पडलेला हिंदू समाजही अतिरेकी झाला असता. काँग्रेस आणि पुरोगाम्यांनी हिंदूंना भगवा आतंकवाद असा लेबल लावला असला तरी हिंदू आजतागायत ज्ञानेश्वरांच्या जाणिवेने जगत आले आहेत. आपल्यावरील अत्याचार विसरून ''विश्व स्वधर्म सूर्ये पाहो'' हेच म्हणत आले आहेत. म्हणूनच एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की अतिरेकी व्हायला हेतू व परिस्थिती कारणीभूत ठरते. हेतू म्हणजे पैसे कमावणे किंवा आकाशातल्या ईश्वराच्या मार्गावरून चालणे इत्यादी. परिस्थिती म्हणजे तुम्ही कोणत्या कुळात जन्माला येता. तुम्ही वाळवंटी प्रदेशाला किंवा इतर भूप्रदेशाला पुण्यभूमी मानत असणाऱ्या कुळात जन्माला आला असाल तर परिस्थितीने तुम्हाला अतिरेकी होण्याची प्रेरणा मिळते. कारण दुर्दैवाने तसे संस्कार बालमनावर केले जातात. यातले अनेक अतिरेकी हे पैसे कमावण्यासाठी अतिरेकी बनत नाहीत. तर आतंकवाद हा त्यांचा आध्यात्मिक मार्ग आहे. जे आपल्या वाळवंटी कुळाचे नाहीत त्यांचा सर्वनाश करणे, त्यांच्यावर अत्याचार करणे ही त्यांची आध्यात्मिक प्रक्रिया आहे हे समजून घेतलं पाहिजे. वरील सर्व उच्चशिक्षित, चांगले पैसे कमावणाऱ्या, चांगली कारकीर्द असणाऱ्या डॉक्टरांना या जाणिवेतून प्रेरणा मिळाली आहे, तसे संस्कार त्यांच्या बालमनावर झाले आहेत हे समजून घेणे अतिशय आवश्यक आहे. आता



आपल्या भारताचे नेतृत्व, पोलिसी यंत्रणा, न्याय यंत्रणा या स्फोटामागील दोषींना पकडून शिक्षा सुनावेल यात दुमत नाही. मात्र सुमारे दहा वर्षांनंतर सीमा प्रदेश वगळता भारताच्या आत अशाप्रकारचं जिहादी कृत्य झालं आहे. याचा अर्थ भारतातले, भारतातंच जन्मलेले स्लिपर सेल हे आदेशाची वाट बघत तयारी करत असतात हे उघड आहे. त्यामुळे यापुढे कोणाकडून खरेदी करावी, याचबरोबर कोणाकडून इतर सेवा घ्यायच्या याचाही विचार भारतीयांना दुर्दैवाने करावा लागणार आहे. कारण उच्चशिक्षित डॉक्टर स्फोट करू शकतात तर त्याच प्रेरणेतून ते रुग्णांना चुकीची, जीवघेणी औषधेही देऊ शकतात. हाच न्याय इतर सेवा देणाऱ्यांना देता येईल. त्यामुळे भारतीयांनी अखंड सावधान असले पाहिजे.

भारतावर केवळ अतिरेक्यांचे संकट नसून इतरही अनेक समस्या आहेत. आपण सर्व जण ईश्वराचा धावा करतो ते स्वतःच्या वैयक्तिक समस्यांसाठी. पण देशाच्या संरक्षणासाठी, उन्नतीसाठी देवासमोर सहसा हात जोडत नाही किंवा अनुष्ठान व व्रत करत नाही. सावरकर म्हणाले होते की ''स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देवापुढे एक फूल जरी अर्पण केलं असेल तरी त्याच्यामुळेही स्वातंत्र्य मिळालं आहे.'' म्हणजेच त्या काळी स्वातंत्र्यप्राप्ती हे प्रत्येक भारतीयाचं ध्येय होतं. आताही प्रत्येक भारतीयाने हिंदुस्थानाचे संरक्षण आणि उन्नतीसाठी प्रयत्न करायला हवेत. तसेच श्रद्धाळूंनी नित्य उपासनेत आणि इतर अनुष्ठानातही देशाचा विषय समावेश करून घ्यायला हवा. स्वतःला नास्तिक समजणाऱ्या देशभक्तांनीही एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की आपला सामना श्रद्धेसाठी निर्दयीपणे, क्रूरपणे, अमानवी, शैतानी पद्धतीने जीव घेणाऱ्या आणि देणाऱ्या वृत्तीशी आहे. त्यामुळे इथे आपला नास्तिकवाद काही कामाचा नाही. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी ''स्वराज्य व्हावे ही श्रींची इच्छा'' असे म्हटले. पण ते श्रींची प्रतीक्षा करत बसले नाहीत तर स्वतःच श्री होऊन कार्य करत होते. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी श्रींच्या इच्छेखातर स्वतःच्या शरीराची समिधा केली. या दोन्ही महापुरुषांना श्रींकडून प्रेरणा मिळाली. हेच आहे भगवंताचे अधिष्ठान... १२ नोव्हेंबर २०२५ रोजी भैरव जयंतीनिमित्त अहिल्यानगर येथील श्री पीतांबरा बगलामुखी शक्ति पीठम् येथे भैरव चंडी यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये हजारो भाविक सहभागी झाले होते. हे हवन पीठाधीश श्री मयूरेश विसपुते गुरुजी यांच्या नेतृत्वात पार पडले. विशेष म्हणजे दक्षिण भारतातून अनेक ब्राह्मण आणि गुरू समान व्यक्तींनीही उपस्थिती लावली. ३ वर्षांपूर्वी भैरव चंडी यज्ञासाठी साधारण ५०-६० लोक आले असतील आणि आता हजारोंची संख्या गाठण्यात पीठमला यश लाभले आहे. विशेष म्हणजे कार्यक्रमात भव्यता आली असली तरी दिव्यता जराही कमी झालेली नाही. उलट ती आणखी वृद्धिंगत झाली आहे. मयूरेश गुरुजींची दैवतावरील श्रद्धा, उपासना आणि भक्त, शिष्य व कार्यकर्त्यांचे कष्ट यातूनच हा अद्भुत सोहळा संपन्न होऊ शकला आहे. कोणतीही बुवाबाजी न करता शुद्ध साधनेच्या बळावर इतक्या तरुण वयात त्यांनी अतिशय मानाचं स्थान प्राप्त केलं आणि भक्तवर्ग निर्माण केला हे त्यांचं कौशल्य आहे. गुरुजींना तुम्ही अनेक पॉडकास्टमध्ये पाहिले असेल. या कार्यक्रमात लोक आपापल्या समस्या घेऊन आले होते. आपल्या समस्यांचं निवारण करण्यासाठी त्यांनी यज्ञात आहुती दिल्या. मात्र गुरू कसा असावा याचं उत्तम उदाहरण म्हणजे मयूरेश गुरुजी! गुरूने भक्तांना केवळ भौतिक किंवा आध्यात्मिक गोष्टीत गुंतवून न ठेवता राष्ट्राचा व धर्माचाही विचार करायला लावला पाहिजे. गाईची पूजा करता करता आपण गाय होऊ नये अशी सावरकरप्रभृती क्रांतिकारकांची धारणा होती. देवीचं वाहन वाघ आहे, सिंह आहे. प्रत्येक देवतेच्या हातात शस्त्र आहे याचा विसर पडू नये हीच महापुरुषांची इच्छा होती. म्हणूनच कदाचित नितेश राणे यांनी वराह जयंतीचा आग्रह धरला असावा. आता येणारा काळ अधिक कठीण असणार आहे. यंत्रणा आपलं काम करेल. पण भारतीयांना आता समाज एकसंध ठेवावा लागणार आहे. प्रबोधनाचे अद्भुत पर्व सुरू करावे लागणार आहे. त्याचबरोबर संकटांचा सामना करण्यासाठी सज्ज राहावे लागेल. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल. हे सर्व जरी केले तरी तेथे भैरवाचे अधिष्ठान पाहिजे!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# उत्तरप्रदेश महिलांसाठी सुरक्षित

महिलांना सायंकाळी ६ वाजेनंतर कार्यालय किंवा कामाच्या ठिकाणी थांबवू नये किंवा त्यांच्याकडून काम करवून घेऊ नये, असा शासकीय नियम आहे. असा नियम करण्याचे कारण म्हणजे कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ झाल्याची अनेक प्रकरणे घडली. अनेक प्रकरणांत अशा प्रकरणात दोषी असलेल्यांवर कारवाई होऊन त्यांना शिक्षा झाल्याचे सर्वज्ञात आहे. तसेच, मुली, महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सातच्या आत घरात, असा सर्वसाधारण सर्वच कुटुंबांमध्ये अलिखित नियम आहे. याचा विचार करूनच सरकारने महिलांना सायंकाळी ६ नंतर कार्यालयात किंवा कामाच्या ठिकाणी थांबवू नये. सायंकाळी कामाची वेळ संपल्यावर त्यांच्याकडून ओव्हर टाईम करवून घेऊ नये, असा नियम तयार करण्यात आला.

मात्र, उत्तर प्रदेशातील योगी सरकारने महिलांना रात्रपाळीच्या कामाची परवानगी देण्याचा निर्णय घेतला. यावरून योगी सरकारला उत्तर प्रदेशमध्ये महिलांच्या सुरक्षेबाबत केलेले नियम, कायदे आणि राबविण्यात येत असलेल्या योजनांची योग्य अंमलबजावणी होत असल्याचा आत्मविश्वास असावा. कामगार महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेले हे मोठे आणि महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे म्हटले जात आहे. महिला सुरक्षेबाबत केलेल्या उपायांची चाचपणी म्हणूनही हा निर्णय घेण्यात आला असावा. यापूर्वी महिला रात्रपाळीत काम करत नव्हत्या असे नाही. पण, ती क्षेत्रे वेगळी होती. आरोग्य व तत्सम विभागात या आधी देखील महिला रात्रपाळीत काम करीत होत्या. पण, कारखाने किंवा विविध धोकादायक उद्योग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १२ उद्योगांतच त्या काम करू शकत होता. उ. प्र. सरकारच्या या निर्णयाने आता २९ धोकादायक उद्योगांत काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. आज महिला सर्वच क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने काम करताना आपण पाहतो. वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणक, शैक्षणिक एवढेच नव्हे तर, आज महिला वैमानिक, टॅक्सीचालक, रेल्वे इंजिनचालक झाल्या आहेत. अवकाश क्षेत्रातही महिला काम करीत आहेत. केवळ सुरक्षितता नसल्याने त्यांना रात्रपाळीची कामे करता येत नव्हती. त्यातही उ. प्र. सारख्या राज्यात सायंकाळी ७ नंतर महिलांना बाहेर पडणे शक्य होत नव्हते. कारण, या राज्यात यापूर्वी बाहुबली, माफियांचे राज्य होते. महिलांच नव्हे तर, पुरुष देखील सुरक्षित नव्हते. सकाळी घराबाहेर पडलेली व्यक्ती सायंकाळी घरी सुखरूप येईल की नाही, अशी भीती होती. त्यामुळे महिलांनी रात्रपाळीच काय तर, कामावर जाणे देखील टाळले जात होते. पण, योगी सरकार आल्यापासून या राज्यातील गुंडाराज संपवून कायद्याचे राज्य स्थापन झाले आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची उत्तर प्रदेशातील गुन्हेगारांमध्ये चांगलीच जरब निर्माण झाली आहे. बुलडोझरबाबा म्हणून त्यांची नवी ओळख निर्माण झाली आहे. आपल्या राज्यात कामगार महिलांवर कोणीही अत्याचार करणार नाही, असा आत्मविश्वास योगीजींना असल्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला असावा. यासाठी महिला कामगारांना संमतिपत्र दिल्यानंतरच रात्रपाळीत काम करता येणार आहे. महिलांच्या सुरक्षेबाबत कारखान्यांमध्ये सुरक्षा, आरोग्य व वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे कारखानदारांना अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच, कामाच्या ठिकाणी चोवीस तास सीसीटीव्हीची नजर राहणार आहे. महिला सुरक्षारक्षकही तैनात करावे लागणार आहे. या सुविधांमुळे महिलांना विश्रांतीशिवाय सलग सहा तास काम करता येणार आहे. महिलांना आपले उत्पन्न वाढविण्यासाठी कामाच्या वेळेनंतर ज्यादा तास काम करता येणार आहे. महिलांसाठी कामाच्या तासांची मर्यादा आता १४४ तास करण्यात आली आहे. पूर्वी ही ७५ तास होती. या निर्णयामुळे महिला कामगारांना आपले कौशल्य विकसित करून आत्मविश्वासाने काम करून आपला आर्थिक विकास साधण्याची संधी प्राप्त होणार आहे. सुरक्षेच्याबाबतीत व विशेषतः महिलांच्या सुरक्षेबाबत कुप्रसिद्ध असलेले उत्तर प्रदेश योगी सरकारच्या या निर्णयामुळे महिलांबाबत सुरक्षित राज्य होण्याकडे मोठे पाऊल टाकत आहे. तेव्हा, योगी सरकारच्या या निर्णयाच्या फलश्रुतीकडे देशाचे लक्ष असणार आहे, हे नक्की!

८८०६००६१४९

## प्रासंगिक

# आदिवासी परंपरेचा प्रेरणादायी वारसा


**डॉ. अशोक उईके**

भारताच्या सांस्कृतिक विविधतेचा अविभाज्य भाग असलेल्या आदिवासी समाजाचे देशाच्या इतिहासात आणि विकास प्रवासात एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. या समाजाने केवळ आपल्या परंपरा, संस्कृती आणि मूल्यव्यवस्था जपल्या नाहीत, तर स्वातंत्र्य संग्रामातही शौर्य, बलिदान आणि स्वाभिमानाचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे. या अमूल्य योगदानाची स्मृती जपण्यासाठी आणि आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजाती गौरव दिवस' म्हणून साजरा केला जातो.

**भगवान बिरसा मुंडा : आदिवासी अस्मितेचे प्रतीक** : जनजाती गौरव दिवस हा महान आदिवासी नेता, स्वातंत्र्य सैनिक आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रणेते भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध 'उलगुलान' या क्रांतीचे नेतृत्व केले आणि आदिवासी समाजाला स्वाभिमान, एकता आणि स्वावलंबनाचा संदेश दिला. भगवान बिरसा मुंडा हे केवळ स्वातंत्र्य सैनिक नव्हते, तर ते आदिवासी समाजातील सामाजिक न्याय आणि धार्मिक सुधारणा चळवळीचेही अग्रदूत होते. त्यांच्या कार्याने आदिवासी समाजात नवचेतना निर्माण केली. आजही त्यांची परंपरा नवनिर्माण आणि सक्षमीकरणासाठी प्रेरणा देणारी ठरते.

**जनजाती गौरव वर्षाचा प्रारंभ** : भगवान बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त देशभरात 'जनजाती गौरव वर्ष' साजरे करण्यात येत आहे. केंद्र शासनाने १५ नोव्हेंबर २०२४ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत हा उत्सव साजरा करण्यास मान्यता दिली होती. या वर्षभर चालणाऱ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून देशभरातील आदिवासी समाजाच्या संस्कृती, इतिहास आणि योगदानाचे प्रदर्शन, अभ्यास व प्रसार करण्यात येणार आहे. विविध मंत्रालये, राज्य शासन, शैक्षणिक संस्था आणि सांस्कृतिक संघटनांच्या माध्यमातून सेमिनार, प्रदर्शन, शिबिरे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**केंद्र शासनाची जनजाती कल्याणाची भूमिका** : केंद्र शासनाने आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या आहेत. प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियान (पीएम-जनमन), एकलव्य मॉडेल निवासी शाळा (ईएमआरएस), वन धन विकास केंद्रे, तसेच प्रधानमंत्री आदिवासी विकास अभियान यांसारख्या योजनांद्वारे आदिवासी समाजाच्या शिक्षण, आरोग्य, रोजगार व सांस्कृतिक जतनावर भर दिला जात आहे. या उपक्रमांमुळे आदिवासी समाजाच्या जीवनमानात सुधारणा होत असून, देशाच्या सर्वसमावेशक विकासात त्यांचा सहभाग अधिक बळकट होत आहे.



**संस्कृती, वारसा आणि आत्मसन्मानाचे प्रतीक** : जनजाती गौरव वर्ष हा केवळ स्मरणाचा उत्सव नाही, तर तो आदिवासी समाजाच्या आत्मसन्मान, संस्कृती आणि वारशाच्या पुनरुज्जीवनाचा राष्ट्रीय सोहळा आहे. या उपक्रमातून भारतातील प्रत्येक नागरिकाला आदिवासी समाजाचे योगदान ओळखण्याची आणि त्यातून प्रेरणा घेण्याची संधी मिळणार आहे. देशातील आदिवासी समाजाच्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारकडून महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. पीएम जनमन योजना व धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या जीवनात शाश्वत विकास घडवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान** : देशातील आदिवासी जमातींच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी केंद्र सरकारतर्फे 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २५ प्राधान्य क्षेत्रे आणि १७ मंत्रालये निश्चित करण्यात आली आहेत. महाराष्ट्र राज्यातील ३२ जिल्ह्यांची निवड या अभियानासाठी करण्यात आली असून, यात २१४ तालुके आणि ४,९७५ गावे समाविष्ट आहेत. या अभियानामार्फत केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमध्ये संरचित दृष्टिकोन व अभिसरण साध्य करून प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यात आली आहे. अभियानात समाविष्ट गावांतील अनुसूचित जमातींच्या कुटुंबांच्या वैयक्तिक व सामूहिक सुविधांच्या अभावाचा तपशील 'मिशन अंत्योदय २०२२-२३' च्या माहितीच्या आधारे निश्चित करण्यात आला आहे.

**पीएम-जनमन महाअभियान** : समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे हा दृष्टिकोन ठेवून विकासाच्या प्रवाहापासून वंचित घटकांना इतरांच्या बरोबरीने समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य प्रयत्न करीत आहेत आहे. वंचित आदिवासी समूहांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीत सुधारणा घडवून त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी विविध लोककल्याणकारी योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. आदिवासी समूहांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्याकरिता प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानाची (पीएम-जनमन) सुरुवात करण्यात आली आहे. या अंतर्गत ९ मंत्रालयांच्या माध्यमातून सर्वांना पक्की घरे, प्रत्येक घरी नळाने पाणी, गावा-गावापर्यंत रस्ते, प्रत्येक घरापर्यंत वीज, शिक्षणासाठी वसतिगृह, कौशल्य विकास, गावोगावी फिरते वैद्यकीय पथक, सर्वांना पोषण, प्रगत जीवनमान, दुर्गम भागापर्यंत दूरसंचार सेवा अशा एकूण ११ महत्त्वाच्या कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

**शबरी नॅचरल्सद्वारे आदिवासी उत्पादनांना जागतिक बाजारपेठ** : आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जतन करून त्याला नव्या उंचीवर नेण्याचे कार्य 'शबरी नॅचरल्स' या उपक्रमाद्वारे करण्यात येत आहे. आदिवासी विकास महामंडळाच्या या अभिनव उपक्रमाने ई-कॉमर्सच्या माध्यमातून आदिवासी उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत नवी ओळख मिळवून दिली आहे.

या उपक्रमांतर्गत आदिवासी बांधवांनी पारंपरिक पद्धतीने तयार केलेल्या हस्तकला, खाद्यपदार्थ, वनौषधी आणि नैसर्गिक उत्पादनांना नव्या बाजारपेठांचा प्रवेश मिळाला आहे. 'शबरी नॅचरल्स'च्या माध्यमातून ग्रामीण आणि दुर्गम भागातील आदिवासी उत्पादकांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. या उपक्रमामुळे आदिवासी समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणास चालना मिळाली असून, त्यांच्या पारंपरिक ज्ञान आणि कौशल्याला नवे व्यावसायिक मूल्य प्राप्त झाले आहे. शाश्वत विकासाच्या दिशेने 'शबरी नॅचरल्स' हे एक आदर्श मॉडेल म्हणून उदयास येत आहे.जनजाती गौरव वर्ष हा आदिवासी समाजाच्या परंपरा, संस्कृती आणि योगदानाचा गौरव करणारा उत्सव आहे. या उपक्रमांद्वारे आदिवासी समाजाच्या विकासाचा प्रवास केवळ साजरा होत नाही, तर तो देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा महत्त्वाचा घटक ठरतो. आदिवासी संस्कृती, कला आणि वारसा जतन करण्यासोबतच त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न शासन सातत्याने करत आहे.

(लेखक राज्याचे आदिवासी विकास मंत्री आहेत.)

## भारतातील लोकशाहीतील पंचम स्तंभ

भारतात लोकशाही आहे आणि त्याची भिस्त चार खांबांवर आहे म्हणतात. १) विधिमंडळ : कायदे बनवण्याचे कार्य करते.२) कार्यकारी मंडळ : बनवलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करते.३) न्यायपालिका : कायद्यांचा अर्थ लावण्याचे आणि न्याय देण्याचे काम करते. ४) माध्यमे : जनतेला खरी माहिती पुरवून लोकशाहीला सक्षम बनवते, याला लोकशाहीचा चौथा स्तंभ असेही म्हणतात.

यातला एकही स्तंभ जर तुटला, ढासळला, नुसता त्याला चिरा गेला तर? नक्कीच भारतातील लोकशाहीला ग्रहण लागेल. सर्वच स्तंभांना खास करून या चौथ्या स्तंभाला धोका देणारा पंचम स्तंभ (किंवा अंतर्गत शत्रू) म्हणजे अशा लोकांचा समूह जो एखाद्या राष्ट्राला आतून कमकुवत करत शत्रू राष्ट्राला मदत करण्यासाठी सतत उघडपणे किंवा गुप्तपणे प्रयत्नशील असतो. फेक नॅरेटिव्ह पसरवणे, धर्माधर्मात, जातीजातीत कलह निर्माण करणे. हे सर्व करण्याची कारणे; देशद्रोही वृत्ती, आपल्या कट्टर धर्माचा टोकाचा दुरभिमान आणि त्याकरिता वाट्टेल ते करण्याची तयारी, सत्ता मिळवण्यासाठी हपापलेले सत्तापिपासू, धन, संपत्ती, पैसा, विकृत विलासिता, ऐशोआराम भोगण्याची लालसा, हे आधीपासून होते. यात आता सहजसाध्य सोशल मीडिया, व्हॉट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर आणखी बरेच काही, त्यात भरीस भर सत्य असत्य यातील धूसर अंतर मिटवणारे आता एआय. आपण पाहत आहोत काही दिवसांपूर्वी झालेल्या दिल्ली बॉम्बस्फोटाच्या घटनास्थळावर जाऊन वृत्तवाहिन्यांचे लोक गाडीचा एखादा भाग, कुणाचा तरी तुटून पडलेला हात, कान, उचलून दाखवत आहेत हे परिस्थितिजन्य पुराव्यांचं नष्ट करणं नाही का? राष्ट्रप्रेमी जनहो, हीच वेळ आहे या पंचम स्तंभाला छेद देण्याची. सत्य लोकांपर्यंत पोचवण्याची, अशी घटना पुन्हा घडणार नाही याची खबरदारी घ्यायची. आपल्या शीर्षस्थ नेतृत्वावर, सरकारी यंत्रणांवर विश्वास ठेवा.

**रवी वाघमारे**/नागपूर

## वाचक पत्रे

### तरुण भारतचा स्तुत्य उपक्रम

तरुण भारतने तुळस लावा, पर्यावरण वाचवा, हा उपक्रम राबविला तो खरोखरच स्तुत्य आहे. आजच्या धावपळीच्या यंत्रयुगात अशा उपक्रमांची अत्यंत आवश्यकता आहे. आपली संस्कृती, त्यासोबतच आपले आरोग्य यांची सांगड घालणारा हा उपक्रम आहे. सुरुवातीला घरोघरी जाऊन तरुण भारतच्या प्रतिनिधी, त्यांच्या पत्नींनी तुळशीची बीजे दिली. त्याची रोपे तयार करवून घेतली. त्यानंतर ती रोपे दान करून त्याची जोपासना करण्याचे कार्य केले. २ ते ५ नोव्हेंबर या कालावधीत तुळशी विवाहासाठी उपयुक्त असणाऱ्या वस्तू एकाच डब्यामध्ये उपलब्ध करून दिल्या. जुन्या पिढीतील मंडळी आजही सर्व सण तुळशी विवाह उत्साहाने साजरे करतात. मात्र, युवा पिढीला या सर्व गोष्टी करायला वेळच नाही. पण, तरुण भारतच्या या उपक्रमामुळे तुळशी विवाह अगदी थाटात यथासांग पार पडला. तुळशी विवाह साहित्यासोबत एक पुस्तक देखील देण्यात आले. त्यात तुळस आरोग्यासाठी किती उपयुक्त आहे, याबाबत माहिती आहे. तुळशीची कथा, मंगलाष्टके सुद्धा या पुस्तकात अंतर्भूत आहेत. विशेष म्हणजे या डब्यावर भगवद्गीतेतील ४ थ्या अध्यायातील १४ व्या श्लोकातील एक चरण लिहिले आहे. नमे कर्मफले स्पृहा, खरंच याचा अर्थ की, तरुण भारतने हे सुंदर कर्म केले आहे. पण, त्याच्या फळाबद्दल कोणतीही आसक्ती ठेवलेली नाही. लोकांनी जर तुळशीची रोपे लावली, त्याची जोपासना केली तर, तरुण भारतला काय फायदा ? लोकांचेच आरोग्य सुधारेल. पर्यावरणातला दूषितपणा कमी होईल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संस्कृतीचे रक्षण होईल. यासाठी कोणतीही आसक्ती न ठेवता राबविलेल्या या उपक्रमाबद्दल तरुण भारतला साष्टांग दंडवत!

**रेणुका जोशी**/९९६०४६१८५०

## आजचे संघगीत-४३

शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५

### जाग उठा है आज देश का वह सोया अभिमान

जाग उठा है आज देश का वह सोया अभिमान
प्राची की चंचल किरणों पर आया स्वर्ण विहान ॥ जाग उठा...

स्वर्ण प्रभात खिला घर-घर में जागे सोये वीर
युद्धस्थल में सज्जित होकर बढ़े आज रणधीर
आज पुन: स्वीकार किया है असुरों का आव्हान ॥ जाग उठा...

सहकर अत्याचार युगों से स्वाभिमान फिर जागा
दूर हुआ अज्ञान पार्थ का धनुष-बाण फिर जागा
पांचजन्य ने आज सुनाया संसृति को जयगान ॥ जाग उठा...

जाग उठी है वानर-सेना जाग उठा वनवासी
चला उदधि को आज बाँधने ईश्वर का विश्वासी
दानव की लंका में फिर से होता है अभियान ॥ जाग उठा...

खुला शम्भु का नेत्र आज फिर वह प्रलयंकर जागा
तांडव की वह लपटें जागी वह शिवशंकर जागा
तालताल पर होता जाता पापों का अवसान ॥ जाग उठा...

ऊपर हिम से ढकी खड़ी हैं वे पर्वत मालाएँ
सुलग रही हैं भीतर-भीतर प्रलयंकर ज्वालाएँ
उन लपटों में दीख रहा है भारत का उत्थान ॥। जाग उठा...

# साखर कारखानदार ३० नोव्हेंबरला जाहीर करणार एफआरपीसह अधिकचे दर

- जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी घेतली बैठक
- १६ कारखान्यांच्या प्रतिनिधींची होती उपस्थिती
- उर्वरित कारखान्यांना सोमवारी उपस्थित राहण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

ऊस दरासंदर्भात सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांची बैठक घेण्यात आली असून, ३० नोव्हेंबर २०२५ रोजी साखर कारखानदार एफआरपीसह अधिकचे दर जाहीर करणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. दरम्यान, या बैठकीसाठी जिल्ह्यातील १६ साखर कारखान्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थिती दर्शविली होती, असेही त्यांनी सांगितले.

साखर कारखाने सुरू होऊन १५ ते २० दिवस झाले तरी अद्यापही जिल्ह्यातील सहकारी आणि खासगी कारखान्यांनी ऊस दर जाहीर केलेला नाही. ऊस दर जाहीर न करताच गाळप सुरु केल्याने शेतकऱ्यांमधून खूप मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी गुरुवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी त्यांच्या दालनात कारखानदारांची बैठक घेतली. या बैठकीला जे कारखानदार अनुपस्थित होते; त्यांची बैठक सोमवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार आहे. या बैठकीस उर्वरित कारखानदार वा त्यांचे प्रतिनिधींनी उपस्थित रहावेत, असे आदेशही त्यांनी दिले.



या बैठकीला युटोपियन शुगर्स लिमिटेड, आवताडे शुगर लिमिटेड, विठ्ठल सहकारी साखर कारखाना गुरसाळे, श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लिमिटेड युनिट नंबर एक, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लिमिटेड युनिट नंबर दोन, श्री शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड सदाशिवनगर, धाराशिव शुगर लिमिटेड सांगोला, सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना भाळवणी, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना अकलूज, श्री संत कुर्मदास सहकारी साखर कारखाना लिमिटेड पडसाळी, दि सासवड माळी शुगर फॅक्टरी माळीनगर, इंद्रेश्वर शुगर प्रा. लिमिटेड उपळाई ठोंगे, लोकमंगल ॲग्रो इंडस्ट्रीज बीबीदारफळ, लोकमंगल शुगर इथेनॉल अँड को जनरेशन लिमिटेड भंडारकवठे, राजीव ॲग्रो पॉवर प्रा. लिमिटेड भैरवनाथ आलेगाव या कारखान्याचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यंदा मे महिन्यापासून कमी-अधिक प्रमाणात पाऊस सुरु आहे. सप्टेंबरमध्ये तर ऊस उत्पादकांना अतिवृष्टी, महापुराचा फटका बसला आहे. वीर, भाटघर आणि उजनी धरणातून नियमित पाणी मिळाल्याने यंदा उसाचे क्षेत्रही मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्यामुळे ऊस उत्पादनातही मोठी वाढ अपेक्षित आहे. मागील दोन वर्षांच्या तुलनेत यंदाच्या हंगामात किमान ४० लाख टनांनी वाढ होईल, असा अंदाज सोलापूरच्या प्रादेशिक सहसंचालक विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे किमान १५० ते १६० लाख टन उसाचे गाळप होईल, असा प्राथमिक अंदाज आहे.

अतिवृष्टी, महापुरामुळे सुमारे १० ते १५ लाख टन उसाचे नुकसान झाल्याची प्राथमिक आकडेवारी आहे. आतापर्यंत सोलापूर विभागातील ४० साखर कारखान्यांनी गाळप हंगाम सुरु करण्यासाठी प्रस्ताव दाखल केले आहेत. याच धर्तीवर आज जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक बोलावून विस्ताराने चर्चा केली आणि एफआरपी दराबाबतही कारखानदारांना विचारणा केली. यावेळी उपस्थित प्रतिनिधींनी ३० नोव्हेंबरला एफआरपी जाहीर करणार असल्याची ग्वाही दिली.

### गोकुळच्या थकीत बिलासंदर्भात उपस्थित राहण्याचे आदेश

अक्कलकोट तालुक्यातील रुद्धेवाडी येथील मातोश्री लक्ष्मी शुगर कारखाना अवसायानात निघाल्याने ज्या कंपनीने तो कारखाना ताब्यात घेतला आहे, त्यांच्याशी बोलणे सुरू असून, गोकुळ कारखान्याच्या थकीत ऊस बिला संदर्भात येत्या सोमवारी उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद देण्यात आल्याचे सांगितले.

### शेतकरी संघटनांही आक्रमक

ऊस दर जाहीर करण्यासंदर्भात शेतकरी संघटनांही आक्रमक झाली असून, केंद्र शासनाच्या एफआरपी दरानुसारच आणि उपपदार्थातून मिळणाऱ्या उत्पन्नातून ऊस दर जाहीर करण्याची मागणी होत आहे.

## महत्वाचे...



### श्री मल्लिकार्जुन हायस्कूल येथे वृक्षारोपण

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरेनगर येथे श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रोटरी क्लब जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले. प्रशालेच्या मैदानात वड व पिंपळाची ५० झाडे माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे,प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे,रोटरी क्लबचे प्रेसिडेंट विक्रम बंडेवार,रोटे.स्वप्नील नाईक यांच्या शुभ हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे यांनी वृक्षारोपण करणे काळाची गरज आहे असे सांगत मानवी जीवनात वृक्षांचे स्थान खूप महत्त्वाचे आहे सांगितले,तसेच वृक्ष संवर्धन करावे असे सर्व विद्यार्थ्यांना आवाहन केले. यावेळी अमरनाथ कदारे, लक्ष्मीकांत पनशेट्टी,श्रीनिवास कोलप्याक, वीरेश हचडे आदी उपस्थित होते.



### प्रबुद्ध भारत तरुण मंडळातर्फे आद्यक्रांतिगुरू लहुजी साळवे यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

प्रबुद्ध भारत चौक मिलिंद नगर बुधवार पेठ येथे आद्यक्रांतिगुरू लहुजी साळवे यांच्या जयंतीनिमित्त प्रा. सतीश रास्ते व श्रीमंत जाधव यांच्या हस्ते लहुजी साळवे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, प्रा. अविनाश शिंदे, चंद्रकांत सोनवणे, अरविंद गायकवाड, महेश शिंदे, गौतम शिंदे, बिराप्पा काळे, विश्वास माने यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



### बालदिनानिमित्त इक्विटस बँकेतर्फे मनपा देशमुख वस्ती शाळेत वह्या वाटप

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

कै. गंगाराम देशमुख मनपा देशमुख वस्ती शाळेत बाल दिनानिमित्त शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या १२० विद्यार्थ्यांना इक्विटस बँकेचे डिव्हिजन मॅनेजर अरुण शिंदे व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बबन ऐवळे यांच्या हस्ते वह्या वाटप करण्यात आले. अरुण शिंदे यांच्या हस्ते खाऊ वाटप करण्यात आले. प्रास्ताविक नागेश गोसावी यांनी केले तर आभार व सूत्रसंचालन संतोष सुतार यांनी केले. यावेळी रिजनल हेड अभिजित बुरगोल, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बबन ऐवळे, एरिया मॅनेजर उमाकांत देशमाने, ब्रँच मॅनेजर विनाकायक मिरजकार, राजगड अभ्यासिका प्रमुख सिद्राम मोटे, सामाजिक कार्यकर्ते विजय रुपनर, मुख्याध्यापक राहुल पाटील, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सविता माळवदकर, नागेश गोसावी, प्रकाश अनबुले, संतोष सुतार, उमेश युवनाती उपस्थित होते.



## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रदेश चिटणीसपदी मुस्तारे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या महाराष्ट्र प्रदेश चिटणीसपदी सोलापूर मनपा परिवहन समितीचे माजी सभापती आनंद मुस्तारे यांची निवड करण्यात आली.

पक्षाचे सोलापूर शहर-जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांच्या शिफारशीनुसार प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी ही नियुक्ती केली आहे. राष्ट्रवादीचे प्रदेश कोषाध्यक्ष तथा सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे यांच्या हस्ते मुस्तारे यांना नियुक्तिपत्र प्रदान करण्यात आले. आगामी महापालिका निवडणुकीमध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांची निश्चिती करण्यात येऊन महापालिकेवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकवण्याचा मानस मुस्तारे यांनी यावेळी बोलून दाखवला.

यावेळी माजी खासदार आनंद परांजपे, प्रदेश सरचिटणीस लतिफभाई तांबोळी, सहकोषाध्यक्ष संजय बोरगे, सरचिटणीस संजय तटकरे, प्रदेश प्रवक्ते सूरज चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. या निवडीबद्दल मुस्तारे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## पूरग्रस्तगावात आरोग्य सेवा देण्यासाठी प्रतिसाद टीम सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ४८ पूरग्रस्तगावांमध्ये मिनिमम इनिशल सर्विस ऑफ पॅकेज अंतर्गत प्रजननक्षम जोडप्याना कुटुंब नियोजन साधनांचे वाटप, सुरक्षित गर्भपात, गरोदर व स्तनदा माता तपासणी, गर्भाशय व स्तानाची कॅन्सर तपासणी, एच.आय. व्ही तपासणी व समुपदेशन, लिंगभेद अन्याय व अत्याचार समुपदेशन व संदर्भ सेवा, वंधत्व निवारण, स्त्री पुरुष लैंगिक आजारावर उपचार, हिमोग्लोबिन, शुगर, व्ही.डी.आर. एल. तपासणी व सर्वसामान्य तपासणी व औषधोपचार आदी सेवा देण्यासाठी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेची आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद टीम सज्ज झाली आहे.




इंटरनॅशनल प्लॅन्ड पेरेंटहूड फेडरेशन व ऑस्ट्रेलियन एड यांच्याकडून फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेला स्प्रिंट फोर सी.इ. २०२५ महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. मुंबई मुख्यालयाचे प्रकल्प व्यवस्थापक डॉ. अमित कीटूकले यांनी आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद टीम ला मिस्प सेवा याविषयी एकदिवसीय प्रशिक्षण दिले. या टीम मध्ये प्रकल्प समन्वयक, सांख्यिकी अधिकारी, समुपदेशक, एम.बी.बी.एस डॉक्टर, नर्स, लॅब टेक्निशियन व चार स्वयंसेवक असणार आहेत. महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रकल्प मुंबई मुख्यालयाच्या डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे, असिस्टंट डायरेक्टर जनरल अमिता धानू, यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असणार आहे तर स्थानिक शासकीय आरोग्या यंत्रनेचे याला सहकार्य मिळणार आहे. प्रशिक्षण शिबिरात फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, वैद्यकीय अधिकारी डॉ. गौरी कहाते, डॉ. समन खान तांबोळी, डॉ. सोनाक्षी टेकाडे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, प्रकल्प समन्वयक स्वप्निल सोनवणे, सांख्यिकी अधिकारी मल्लिकार्जुन कडकोळ, समुपदेशिका रेखा पाटील- कपाळे, लॅब टेक्निशियन व्यंकटेश कंची, परिचारिका शकीला मणियार, अविनाश कांबळे, जिया शेख, सुनीता पाटील, कीर्ती धंगापुरे, लीला धंगापुरे, कल्पना गडगडे, आकाश गायकवाड, शाहीन मेंडूक, आशालता मस्के, रोजमेरी गायकवाड, सुकेशनी सोनकांबळे, हिशोब अधिकारी व्यंकटेश मच्छा आदी उपस्थित होते.

## शहा-कोठारी प्रशालेत शेती, व्यापार व पर्यावरण संरक्षण याविषयी व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

सन्मति ज्ञान प्रसारक मंडळ संचलित, श्री न. फु.शहा कोठारी प्रशालेत शेती, व्यापार,उद्योग व पर्यावरण संरक्षण याविषयी व्याख्यान संपन्न झाले. मुख्याध्यापक रमेश यादवाड व प्रमुख व्याख्याते तज्ञ मार्गदर्शिका सुवर्णा जाधव उपस्थित होते. प्रारंभी सहशिक्षक श्री भांजे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिले. डॉ. सुवर्णा जाधव यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक जीवनात सेंद्रिय शेती,ठिबक सिंचन, बदलते हवामान, हवामानानुसार येणारी पालेभाज्या, इ चे महत्व सांगितले. पर्यावरण पूरक व्यापार व उद्योगाची विदयार्थ्यांनी उभारणी केली पाहिजे असे आवाहन केले.



शेती, व्यापार व पर्यावरण यावर कृतियुक्त स्पर्धा घेऊन सहभागी विध्यार्थ्यांना बक्षिसे देऊन कौतुक केले. सूत्रसंचाल एस. ए. बिडवे यांनी केले. ए. एस. माने यांनी आभार मानले.

### थांबलेल्या ट्रकला धडकून दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

केगाव ते हत्तूर बायपास रोडवरील शिवाजी नगर येथील रॉयल बंजारा हॉटेलसमोर थांबलेल्या एका ट्रकला धडकून दुचाकीस्वार जखमी झाला. समाधान शिवाजी साठे (वय-२८, रा.कोंडी, ता.उत्तर सोलापूर) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास समाधान साठे हा सोलापूरहून दुचाकीवरुन विजापूरकडे जात असताना रॉयल बंजारा हॉटेलसमोर थांबलेल्या एम.एच.१४ एल.बी.०७२७ या क्रमांकाच्या ट्रकला धडकल्याने ते खाली पडले. यात त्याच्या डोक्यास, हाताला, पायाला मार लागून गंभीर जखमी झाला. साठे यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project (www.smart-mh.org)**

**E-TENDER NOTICE NO: 2025_DOAWB_1245783**

**(Supply, Installation, Commissioning and Testing of Fully Automatic Cleaning and Grading 4 TPH With Colour sorter)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. CHAURAS FARMERS PRODUCER COMPANY LTD. AT ASGAON TA -PAWANI DIST-BHANDARA is one of the beneficiaries under the project and inviting online bids on https://mahatenders.gov.in for above mentioned Machinery. The last date for submission of online bid is 15/12/2025 up to 01.00 PM. Any updates or notices shall be published on aforementioned website only.

District Implementation Unit, SMART Project, Dist.: Bhandara

### जाहीर समन्स

रेमुनं. १००९/२०२१

**सोलापुर येथील मे. सिव्हिल जज्ञ सिनियर डिव्हिजन न्यायालय सागे, यांचे कोर्टात**
**(मे. भोसले मॅडम जज्ज साहेब) निशान नं.**

मे. सोलापुर ई कॉन रेसिफाईनचे भागीदार,
१) श्री. दुर्गाप्रसाद मुरलीधर मिणीयार
२) श्री. गुलाबचंद जिवराज शहा
३) श्री. उदय दुर्गादास मिणीयार
४) श्री. निलय विपुल शहा,
वादी नं. १ ते ४ यांचे कुलमुखत्यारधारक म्हणून
श्री. दुर्गाप्रसाद मुरलीधर मिणीयार
रा. ४४/३, महावीर भगवती सोसायटी, सम्राट चौक,
सोलापुर. ४१३००३. **-- वादी**

विरुध्द

**श्री. वैभव विलास कुलकर्णी**
वय ४१ वर्षे, धंदा :- व्यापार,
रा. इंडियन मॉडेल स्कुल समोर, जुळे सोलापुर. **-- प्रतिवादी**

ज्याअर्थी वादी मे. सोलापूर ई कॉन यांनी प्रतिवादीविरुध्द मे. कोर्टात दावा दाखल केला असुन सदर दाव्याचे समन्स अनेकदा पाठविले असता, सदरहूकामी प्रतिवादीस में. कोर्टातर्फे अनेकदा बेलिफमार्फत समन्स काढले असता, प्रतिवादी हा दिलेल्या नमुद पत्त्यावर अनेक वर्षापासुन रहात नाही, असा बेलिफ रिर्पोट आल्यामुळे तो समन्स न बजावता परत आले आहे व मे. कोर्टानी सदर प्रतिवादी यांना जाहिर समन्सव्दारे समन्स बजावणीचा हुकुम केला आहे.

त्याअर्थी प्रतिवादी यांना सदर जाहिर समन्सव्दारे कळविण्यात येते की, सदर दाव्याचेकामी प्रतिवादीचे व कोणाचेही कसल्याही प्रकारचे काही हरकत अथवा म्हणणे असल्यास हि जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासुन मे. कोर्टानी दिलेली तारीखः १८/१२/२०२५ रोजी स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. अन्यथा याप्रकरणी प्रतिवादीस काही सांगावयाचे नाही, असे ग्रहीत धरुन सदर दाव्याचे एकतर्फी सुनावणी केली जाईल, यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/११/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

सही/-
लिपिक

शिक्का

हुकुमावरुन
सही/-
सहा अधिक्षक मे. जिल्हा न्यायालय सो

### जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. १११/२०२५
पुढील नेमली तारीख २०/१२/२०२५
नि. ५

**बार्शी येथील मे. सि. ज्यु. डी. सो यांचे कोर्टात**
**(मा. आर.पी. बागडे सो)**

कावेरी ऊर्फ कावेरा चंद्रहास मसाळ — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार धामणगाव (दु.) ता. बार्शी, जि. सोलापूर येथील रहिवासी आहे. वर नमुद अर्जदार हिने हा अर्ज मयत चंद्रहास बापू मसाळ यांचे अर्जदार हि वारस असलेबाबत वारसप्रमाणपत्र या न्यायालयात दाखल केलेला आहे. यातील मयत चंद्रहास बापू मसाळ यांचे मृत्युपश्चात देय असलेली एकुण रक्कम व दरमहाची कुंटुंब निवृत्तीची रक्कमेकरीता मयत वारस म्हणून अर्जदार हिचे नावे वारसा दाखला मिळावा म्हणून हा दि.कि. अर्ज क्र. १११/२०२५ चा अर्ज या न्यायालात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहिरप्रसिद्धीव्दारे कळविणेत येते की, सदर अर्जास कोणाचीही हरकत, तक्रार असलेस हे जाहिर प्रसिद्धीकरण झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा नेमली तारीख २०/१२/२०२५ रोजी या मा. कोर्टात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून हरकत तक्रार करावी. मुदतीत या कोर्टात हरकत, तक्रार दिली नाही, तर सदर बाबतीत पुढील यथारोग्य आदेश करण्यात येतील.

हे जाहिर प्रसिद्धीकरण दि. १३/११/२०२५ रोजी आमचे सही व शिक्क्यानिशी दिले असे.

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,
बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर

### जाहीर प्रसिद्धीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ०२/२०२४
नि. ८

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

**विनोद आत्माराम उमाटे** वय-२५ — अर्जदार
धंदा-नोकरी, रा. भोईजे, ता. बार्शी, जि. सोलापूर
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कमल अर्जुन उमाटे हे दि. ०२/०८/२०२२ रोजी भोईजे बार्शी येथे मयत झालेले आहेत त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून अर्जतदार विनोद आत्माराम उमाटे यांनी या मे. कोर्टात सदरहू मयत कमल अर्जुन उमाटे यांचे पश्चात वारस प्रमाणपत्र मिळावे यासाठी अर्ज केला आहे.

त्या अर्थी अर्जदार हे सदरहू मयताचे वारसदार नाहीत असे कोणास सांगण्याचे असेल तर संबंधितांनी या जाहीर प्रसिद्धीकरणाच्या तारखेपासून १ महिन्याचे आत या मे, कोर्टात हजर होवून आपल्या लेखी हरकती पुराव्या दाखल कागदपत्र दि. २२/१२/२०२५ रोजी अगर वर नमूद मुदतीत सादर कराव्यात.

सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दिलेस सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेऊन त्यांना मयत कमल अर्जुन उमाटे यांचे पश्चात कायदेशीर वारस म्हणून वारस प्रमाणपत्र देईल. हे जाहिर प्रसिद्धीकरण दिले. दि. १४/११/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,
बार्शी

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) यांनी खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत.

**निविदा सूचना क्रमांक 40-2025-SrDENC**
कामाचे नाव-१-एडीईएन/बीजी/केडब्ल्यूव्ही उपविभागांतर्गत पीडब्ल्यूआय कार्यालय आणि स्टोअरचे बांधकाम आणि एडीईएन/बीजी/केडब्ल्यूव्ही उपविभागांतर्गत एडीईएन/बीजी/केडब्ल्यूडब्ल्यू आणि आयओडब्ल्यू/केडब्ल्यूव्ही/बीजी कार्यालय आणि स्टोअरचे वाढीकरण. 2-एडीईएन/बीजी/केडब्ल्यूडब्ल्यू उपविभागांतर्गत बीजीव्हीएन येथे स्टोअर सुविधांसह नवीन पीडब्ल्यूआय कार्यालय डेपोचे बांधकाम. कामाची अंदाजे किंमत रु. 57029514.72/-, सुरक्षा रक्कम - रु. 435200.00/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी - 12 महिने, देखभाल कालावधी - 24 महिने.

**निविदा सूचना क्रमांक 41-2025-SrDENC**
कामाचे नाव लातूर कोचिंग कॉम्प्लेक्ससाठी सर्व्हिस रूमचे बांधकाम. कामाची अंदाजे किंमत रु. 14300975.16, बयाणा रक्कम - रु. 221500.00/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी 12 महिने, देखभाल कालावधी - 24 महिने.

www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ 05/12/2025 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ - 05/12/2025 दुपारी 3:30 वाजता. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्यवर्ती रेल्वे, सोलापूर**

SUN 90

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**मध्य रेल्वे**
**विद्युत विभाग**
**विद्युत काम**
**ई-निविदा सूचना**

भारताचे राष्ट्रपतीच्या वतीने आणि त्यांच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूरचे वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता जनरल, रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांकः SUR/L/T/2024/30R2 कामाचे नावः- वाडी यार्डचे अ वर्ग मालवाहतूक परीक्षा यार्डमध्ये अपग्रेडेशन करण्याच्या संबंधात कामाचा विद्युत सामान्य सेवा भाग. अंदाजे खर्चः-1,11,77,433.48/-, बोली सुरक्षा :- रू.2,08,900/- पूर्ण कालावधीः- 12 महिने, ऑफरची वैधताः-60 दिवस, वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळः-08/12/2025 दुपारी 3:00 वाजता. बोली सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरावा लागेल.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य)**

SUN 89

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**मध्ये रेल्वे**
**विद्युत विभाग**
**विद्युत काम**
**ई-निविदा सूचना**

सीनियर डिव्हिजनल इलेक्ट्रिकल इंजिनिअर (टीआरडी), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांकः सोलापूर विभागातील होटगी येथे इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हच्या तपासणी आणि देखभालीच्या कामासाठी ट्रिप मेंटेनन्स/ॲडव्हान्स इन्स्पेक्शन सेंटर्सच्या निर्मितीशी संबंधित निविदा क्रमांकः SUR/TD/T/2025/27 कामाचे अंदाजे खर्चः- रू 43,86,328.43/-, बोली सुरक्षाः 87,700/- पूर्ण कालावधीः- 12 महिने, कालावधी वैधताः- 60 दिवस, वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीखः- 05/12/2025 दुपारी 15:00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)**

SUN 88

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर यांनी राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. निविदा सूचना क्रमांक 14-2025-SrDENCo कामाचे नाव - कुर्डुवाडी (बीजी) उपविभाग दौंड (वगळून) ते कुर्डुवाडी (समावेश) या कुर्डुवाडी कार्यशाळेसाठी झोन 'बी' साठी वार्षिक विभागीय करार, ज्यामध्ये कुर्डुवाडी कार्यशाळा ढवळस, भालवणी, पोफळज, वाशिंबे, पारेवाडी, जिंती, मलठण, बोरीबेल, भिगवण, केत्तूर, जेऊर, केम इत्यादी सेवा इमारत, कार्यालय इमारत आणि कर्मचारी वर्ग (वर्षः 2026-27, 2027-28 2028-29, 2029-30). झोन 'सी' ADEN/W/SUR उपविभाग कुर्डुवाडी (वगळून) ते दुधनी (समाविष्ट) वडसिंगे, माढा, अनगर, वाकाव, मलिकपेठ, मोहोळ, बाळे, अक्कलकोट रोड, पाकणी, तिलाटी, होटगी इत्यादीसाठी वार्षिक विभागीय करार सेवा इमारत, कार्यालयीन इमारत आणि कर्मचारी वर्ग. (वर्षः 2026-27, 2027-28 2028-29, 2029-30). झोन 'डी' ADEN/KLBG उपविभाग दुधनी (वगळून) ते वाडी (समाविष्ट) शहाबाद, मार्तूर, हिरेनांदुरू, कलबुर्गी, बबलाद, कुलाली, ताजसुलतानपूर इत्यादींसाठी सेवा इमारत, कार्यालयीन इमारत आणि कर्मचारी वर्गासाठी वार्षिक विभागीय करार. (वर्षः 2026-27, 2027-28 2028-29, 2029-30). झोन 'ई' ADEN/LUR उपविभाग कुर्डुवाडी (वगळून) ते लातूर रोड (वगळता) शेंद्री, कळमरूड, हरंगुळ, ढोकी, येडशी, धाराशिव, बार्शी टाउन, पांगरी, लातूर इत्यादींसाठी सेवा इमारत, कार्यालयीन इमारत आणि कर्मचारी वर्गासाठी वार्षिक विभागीय करार. (वर्षः 2026-27, 2027-28 2028-29, 2029-30). झोन 'एफ' ADEN/PVR उपविभाग कुर्डुवाडी (वगळून) ते मिरज (वगळून) पंढरपूर, मोडनिंब, सांगोला, जत रोड, धलगाव, सलगरे, कवठेमहाकाळ, आरग इत्यादींसाठी सेवा इमारत, कार्यालयीन इमारत आणि कर्मचारी वर्गासाठी वार्षिक विभागीय करार. (वर्षः 2026-27, 2027-28 2028-29, 2029-30). कामाची अंदाजे किंमत रु. 360004805.20/-, बयाणा रक्कम रु. 1950000.00/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी - 48 महिने, देखभाल कालावधी - 06 महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ - 14-2025-SrDENCo-08/12/2025 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ - 14-2025-SrDENCO-08/12/2025 दुपारी 3:30 वाजता. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार पुन्हा पाहण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइटः www.ireps.gov.in.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर**

SUN 87

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# द. आफ्रिकेला १५९ धावांत गुंडाळले

## जसप्रीत बुमराहचे ५ बळी ● मोहम्मद सिराज, कुलदीप यादवचे प्रत्येकी २ ● भारत १ बाद ३७

♦ **कोलकाता, १४ नोव्हेंबर**

दोन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या कसोटीच्या पहिल्या दिवशी शुक्रवारी जसप्रीत बुमराहच्या घातक गोलंदाजीपुढे दक्षिण आफ्रिका संघाने अक्षरश: नांगी टाकली आणि त्यांचा संघ १५९ धावांवर बाद झाला. दिवसाचा खेळ थांबला तेव्हा भारताने १ गडी बाद ३७ धावा केल्या होत्या.

कोलकाताच्या ईडन गार्डन्स मैदानावर दक्षिण आफ्रिका संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पण त्यांचा हा निर्णय भारतीय गोलंदाजांनी साफ चुकविला. ५१ वा कसोटी सामना खेळणाऱ्या बुमराहने एका डावात १६ व्यांदा पाच बळी घेतले. त्याच्या गोलंदाजीपुढे दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना जास्त वेळ खेळपट्टीवर टिकाव धरता आला नाही. त्याने दक्षिण आफ्रिकेचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू एडेन मार्कराम (३१) आणि रायन रिकेल्टन (२३) यांना बाद करून सुरुवातीचा धक्का दिला आणि नंतर फॉर्मात असलेल्या टोनी डी जॉर्गी (२४) याला पायचित केले. चहापानानंतर बुमराहने सायमन हार्मर (५) आणि केशव महाराज यांना बाद करून पाच बळी घेतले.



रायन रिकेल्टनला बाद केल्यानंतर आनंद साजरा करताना जसप्रीत बुमराह

द. आफ्रिका संघाचे फलंदाज पटापट बाद होत गेल्याने भारतीय खेळाडूंचा उत्साह वाढत होता. आज दिवसभरात ११ खेळाडू बाद झाले. बुमराहला मोहम्मद सिराज आणि कुलदीप यादवने तोलामोलाची साथ देत प्रत्येकी दोन गडी बाद केले. बुमराहला कुलदीप यादवने ३६ धावांत २ आणि मोहम्मद सिराजने ४७ धावांत २ बळी घेऊन चांगली साथ मिळाली. अक्षर पटेलने २१ धावांत १ गडी बाद केला. त्यानंतर भारतीय फलंदाजांनी सावध सुरुवात केली आणि २० षटकांत १ बाद ३७ धावा केल्या. भारत सध्या पहिल्या डावात १२२ धावांनी मागे आहे. लोकेश राहुल (१३) आणि वॉशिंग्टन सुंदर (६) धावांवर खेळत आहे. यशस्वी जयस्वाल १२ धावांवर बाद झाला. त्याने मार्को यानसेनचा चेंडू त्याच्या ऑफ-स्टंपजवळ कट करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो चेंडू यष्टीरक्षकाकडे गेला. जयस्वालने त्याच्या डावाच्या १६ व्या चेंडूवर यानसेनच्या चेंडूवर चौकार मारून आपले खाते उघडले, त्यानंतर मुल्डरच्या चेंडूवर चौकार मारला. तथापि, त्याची खेळी जास्त काळ टिकली नाही.

डावाच्या सुरुवातीला अतिशय बचावात्मक दृष्टिकोन स्वीकारणाऱ्या लोकेश राहुलने कव्हर आणि मिड-ऑफ दरम्यान मुल्डरविरुद्ध चौकारासाठी एक शानदार ड्राइव्ह मारला. दक्षिण आफ्रिकेच्या वेगवान गोलंदाजांनीही उत्कृष्ट लाईन आणि लेंथसह गोलंदाजी केली आणि भारतीय फलंदाजांना बांधून ठेवले. उद्या भारताला मोठी धावसंख्या उभारून द. आफ्रिकेला दबावात ठेवावे लागणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे


### लक्ष्य सेन उपांत्य फेरीत



**कुमामोतो** : पॅरिस २०२४ च्या उपांत्य फेरीत पोहोचलेल्या लक्ष्य सेनने शानदार विजय मिळवत कुमामोटो मास्टर्स जपान २०२५ च्या उपांत्य फेरीत स्थान निश्चित केले. शुक्रवारच्या सामन्यात लक्ष्य सेनने सिंगापूरच्या माजी विश्वविजेत्या लो किआन यूचा २१-१३, २१-१७ असा सरळ गेममध्ये पराभव केला. त्यांच्यातील १० सामन्यांमधील हा विजय लक्ष्यचा सातवा विजय होता. लो किआन यूने सुरुवातीला आघाडी घेतली होती, परंतु लक्ष्य सेनने स्वत:ला लवकर सावरले आणि पहिला गेम आरामात जिंकला. सिंगापूरचा खेळाडू दुसऱ्या गेममध्येही पुढे होता, परंतु लक्ष्यने सलग आठ गुणांसह सामना उलटला. लो किआन यूने शेवटी पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु लक्ष्यने तीन शानदार गुण मिळवून सामना जिंकला. लक्ष्य सेन आता उपांत्य फेरीत जपानचा जागतिक क्रमवारीत १३ वा आणि आशियाई क्रीडा स्पर्धा २०१८ चा कांस्यपदक विजेता केंटा निशिमोटोशी सामना करेल. या वर्षी लक्ष्यचा बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूरमध्ये हा तिसरा उपांत्य फेरीत प्रवेश आहे. त्याने यापूर्वी हाँगकाँग ओपनच्या अंतिम फेरीत आणि मकाऊ ओपनच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला होता.या हंगामात त्याला सुरुवातीच्या फेरीत अनेक पराभवांना सामोरे जावे लागले असले तरी, डेन्मार्क ओपनमध्ये जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या अँडर्स अँटोनसेनविरुद्धचा त्याचा मोठा विजय हा एक प्रमुख आकर्षण होता. ■

### हरिकृष्णने साधली जोस मार्टिनेझशी बरोबरी

**पणजी** : भारतीय ग्रॅण्डमास्टर पी. हरिकृष्णने विश्वचषकाच्या पहिल्या फेरीत मेक्सिकोच्या जोस एडुआर्डो मार्टिनेझशी बरोबरी साधली. त्याच्या मागील दोन सामन्यांमध्ये, मार्टिनेझने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह आणि सर्बियाच्या अलेक्सी सरना यांना हरवले. स्पर्धेत २०६ खेळाडू होत. त्यापैकी फक्त १६ शिल्लक होते. बहुतेक खेळाडू बचावात्मक खेळले, जोखीम टाळली. रशियाचा आंद्रेई एसिपेंको आणि अलेक्सी ग्रेबनेव्ह यांच्यातील सामना अनिर्णीत राहिला. आर्मेनियाचा गॅब्रिएल सर्गिस्यान आणि उझबेकिस्तानचा नोदिरबेक याकुबोव्ह यांनीही बरोबरी साधली. जर्मनीचा अलेक्झांडर डोन्चेन्को आणि व्हिएतनामचा लिम ली क्वांग यांच्यातील सामनाही अनिर्णीत राहिला. या स्पर्धेतील अव्वल तीन स्थान पुढील कॅन्डिडेटसाठी राखीव आहेत आणि इतर कोणताही भारतीय अद्याप कॅन्डिडेटसाठी पात्र ठरलेला नाही.





# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या कार्यकारिणीवर सोलापूरचे राजीव देसाई व किरण चौगुले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या कायकारिणीवर सोलापूरचे राजीव देसाई व प्रा. डॉ. किरण चौगुले यांची निवड झाली.

मुंबई येथे महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२५ ते २०२९ या कालावधी करिता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ही कार्यकारिणी जाहीर केली.

श्री. देसाई हे सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव व राज्य संघटनेचे सहसचिव आहेत. सोलापूर सारख्या ठिकाणी आयोजित केलेल्या लॉन टेनिसच्या महिलांच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा व या खेळाच्या केलेल्या सर्वांगीण विकासाबद्दल अजित पवार यांनी त्यांचे कौतुक केले. देसाई यांच्या या निवडीबद्दल जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी, उपाध्यक्ष दिलीप बच्चुवार, कोषाध्यक्ष दिलीप अत्रे, सहसचिव पंकज शहा यांनी अभिनंदन केले.

श्री. चौगुले हे जिल्हा फुटबॉल संघटना व वेस्टर्न इंडिया फुटबॉल संघटनेचे सचिव आहेत. त्यांच्या निवडीबद्दल जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी अभिनंदन केले.

# गांधी नाथाच्या पाच खेळाडूंची पुणे विभागासाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

गांधी नाथा रंगजी विद्यालयाच्या पाच खेळाडुंची पुणे विभागीय शालेय स्पर्धेसाठी निवड झाली.

शालेय शहर जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत अनिकेत शिंदे याने तायक्कॉंदो स्पर्धेत व सम्राट वाघमारे याने किक बॉक्सिग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. अमृता जेंबगी, तनुश्री बद्दुरकर व देवांग दिक्षित यांची पुणे विभागीय रोल बॉल निवड चाचणीसाठी निवड झाली. त्यांना क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, प्राचार्या स्मिता रणदिवे व अमोल कांबळे यांनी अभिनंदन केले.



# अकलूजच्या तिघांची अश्वमेध क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**अकलूज, दि.१४ नोव्हेंबर-**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत के. टी.एच.एम.कॉलेज नाशिक या महाविद्यालयात केंद्रीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यातून अकलूज अभ्यास केंद्राच्या तीन विद्यार्थ्यांची अश्वमेध क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यामध्ये रेहान रियाज तांबोळी (उंच उडी), आर्यन मंगलसिंग साळुंखे (बास्केटबॉल) व महेश महादेव जाधव (भालाफेक) हे निवडलेले खेळाडू आहेत.







अकलूज अभ्यास केंद्रातील तेरा विद्यार्थ्यांनी मुक्त विद्यापीठ अंतर्गत पुणे विभागीय केंद्राच्या वतीने शिरूर जिल्हा पुणे येथे विभागीय स्तरावरील क्रीडा महोत्सवामध्ये विविध स्पर्धात सहभाग घेतला होता. पुणे विभागीय केंद्रामार्फत अकलूजच्या सहा विद्यार्थ्यांनी केंद्रीय क्रीडा महोत्सवामध्ये आपला सहभाग नोंदविला. यशस्वी विद्यार्थ्यांचे अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते -पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, सभापती सयाजीराजे मोहिते- पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे,केंद्रप्रमुख प्रा.डॉ.शिवप्रसाद टिळेकर,केंद्र संयोजक डॉ.बाळासाहेब मुळीक व अभ्यास केंद्रातील सर्व समंत्रक यांनी अभिनंदन करून अश्वमेध स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### वेळापूरचा सुहान आतार महाराष्ट्र खो-खो संघात

**वेळापूर, दि. १४ नोव्हेंबर-**



अहिल्यानगर येथे झालेल्या राज्य शालेय खो-खो स्पर्धेत १७ वर्षाखालील गटात इंग्लिश स्कूल वेळापूरने तृतीय स्थान मिळविले. या कामगिरीवर सुहान सलीम आतार याची महाराष्ट्र संघात निवड झाली. सुहान अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाचा खेळाडू आहे. त्यास क्रीडाशिक्षक सतीश कदम, शिवाजी जाधव, प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, अर्धनारी नटेश्वर क्रिडामंडळाचे अध्यक्ष जावेद मुलाणी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, संचालिका डॉ. मीनाक्षी कदम, सचिवा डॉ. प्रियदर्शनी महाडिक, संचालिका तेजस्विनी कदम, शाळा समिती चेअरमन प्रतापराव पाटील, प्राचार्य आर. बी. पवार, उपमुख्याध्यापक पठान शिवशरण, पर्यवेक्षक बी. एस. सावळे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष अमोल मंडलिक, व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप जगदाळे, उपाध्यक्ष प्रियंका पोरे यांनी अभिनंदन केले आहे.



# टेनिक्काईट स्पर्धेत सुमतीबाई स्कूलला उपविजेतेपद

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे झालेल्या शालेय शहर टेनिक्काईट स्पर्धेत पी.एस. इंग्लिश मीडियम टेक्निकल हायस्कूलने १७ व १९ वर्षांखालील गटात उपविजेतेपद संपादिले.

**कामगिरी केलेले संघ : १७ वर्षाखालील मुले :** भार्गव तमशेट्टी, ओम भैरवपाटील, निखिलेश गुडशिलो, ईश्वर खडकी, श्रेयश भगरे, आकाश म्हेता

**१९ वर्षाखालील मुले :** चिराग संदल, आरुष जालनापुरे,अखिलेश गुंडला

# कुमार-मुली जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा सोलापुरात

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

कुमार-मुली जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धा जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या मैदानावर २२ व २३ नोव्हेंबर रोजी होईल.

ही स्पर्धा सोलापूर सोलापूर खो खो ॲम्युचर असोसिएशन व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिली आहे. यातून अहिल्यानगर येथे ४ ते ७ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेसाठी जिल्ह्याचे संघ निवडण्यात येणार आहेत. २२ नोव्हेंबरला कुमार तर २३ नोव्हेंबरला मुलींच्या स्पर्धा होतील. या स्पर्धेसाठी कुमार-मुली १८ वर्षाखालील म्हणजेच ५ जानेवारी २००८ रोजी अथवा त्यानंतर जन्मलेले असावेत. तसेच कुमार-मुलीसाठी वय (वर्ष) उंची (से.मी.) वजन (कि. ग्रॅ.) २५० असे मूल्यांकन असेल.

कुमार-मुली खेळाडू जास्तीत जास्त पदवी प्रथम वर्ष अथवा त्याखालील वर्गात शिकत असला पाहिजे. जन्मतारखेच्या पुराव्यासाठी दहावी उत्तीर्णांनी परीक्षेचे हॉल तिकीट व जे १२ उत्तीर्ण व त्याखालील इयत्तेत आहेत, त्यांनी दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र व त्याखालील वर्गातील खेळाडूंनी जन्मतारखेचा दाखला व आधार कार्ड दाखवणे बंधनकारक आहे. कुमार व मुली हे सोलापूर जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयात शिकणार पाहिजेत. प्रवेश शुल्क भरल्याशिवाय भाग्यपत्रिकेत संघाचे नाव समाविष्ट करण्यात येणार नाही याची इच्छुक संघानी नोंद घ्यावी. संलग्न जिल्हा संघानी संघटनेचे खजिनदार श्रीरंग बनसोडे (मो. ९६९९१७५७९८) यांच्याकडे प्रवेश शुल्कासह नोंदणी करावी, असे आवाहन सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर व सचिव उमाकांत गायकवाड यांनी केले आहे.

### 'एसव्हीसीएस'च्या कांबळेची राज्य स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**



जिल्हा रोल बॉल असोसिएशन यांच्या वतीने इंदिरा प्रशाला येथे घेण्यात आलेल्या चाचणी स्पर्धेत एसव्हीसीएस. हायस्कूल एम आयडीसी येथील श्रुती कांबळे हिची जळगाव येथे होणाऱ्या राज्य रोल बॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला क्रीडा शिक्षक हणमंत यळमेली, आकाश बिराजदार व कालिका बोकडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, प्रशालेचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक संतोषकुमार तारके यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# विभागीय तलवारबाजी स्पर्धेत दमाणीच्या खेळाडूंची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

राजीव गांधी स्टेडियमवर झालेल्या विभागीय तलवारबाजी सर्धेत बी.एफ. दमाणी प्रशालेच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. या खेळाडूंना प्रशिक्षक पवन भोसले, गणेश म्हमाणे व सोनाली थोबडे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे प्रशालेचे स्थानिय अध्यक्ष कालिदासजी जाजू, सचिवा मंगलजी काबरा, सहसचिव तापडिया, मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती, पर्यवेक्षक राहुल इंगळे यांनी कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



**कामगिरी : १४ वर्षांखालील गट :** बसवराज धनश्री, रणवीर कबाडे, राजमंजुश्री शिंदे, स्वराज घाळे, अपर्णा सिडगिद्दी (रौप्य). मयूर भोसले प्रांजली कोरे (सुवर्ण). स्वानंदी ताटे (कांस्य).

**१७ वर्षाखालील :** ज्ञानदा शिरवाळ, प्रथमेश कस्तुरे (सुवर्ण), अथर्व बारसे (रौप्य), वेदिका धसाडे, मुजीब शेख, जयवंत चौगुले ( कांस्य).

**१९ वर्षाखालील :** सई पाटील (कांस्य).



# विभागीय शालेय हॉकी स्पर्धेत मॉडेल पब्लिक स्कूल तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

पुणे विभागीय शालेय हॉकी स्पर्धेत मॉडेल पब्लिक स्कूलने १९ वर्षाखालील मुलींच्या वयोगटात मॉडेल पब्लिक स्कूलने तृतीय क्रमांक संपादिला. संघास राज्य क्रीडा मार्गदर्शक जरार कुरेशी, क्रीडा शिक्षक रविकिरण आवटे, अजय चाबुकस्वार, प्रशिक्षक अवेज होटगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी , मुख्याध्यापिका अदिती कुलकर्णी व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

**तृतीय संघ :** विदिता वाघमोडे (कर्णधार), समिक्षा खरसाडे, देवयानी तिवारी (गोलकीपर), श्रेया वि. बिराजदार, श्रेया शि. बिराजदार, कावेरी बळूरगी, अनम मुलानी, ईश्वरी माने, चैत्रा बिराजदार, अक्षरा मुलामणी, साक्षी वालीकर, वृंदावली भिसे, दुर्वा कमळे, अहाना नदाफ, मृणमयी मजगे, किर्ती ममदापूरे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# पंढरपूर पालिकेचा आजपर्यंतचा इतिहास, कोणी भूषविले चेअरमनपद, कोणी भूषविले नगराध्यक्षपद, कोण ठरल्या पहिल्या महिला नगराध्यक्षा

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. १४ नोव्हेंबर -**

पंढरपूर नगरपरिषदेच्या २०२५ च्या निवडणूकीचे पडघम सध्या वाजु लागलेले आहेत. निवडणूकीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात झालेली आहे. एकीकडे पालिका निवडणूकीची धामधुम सुरु असली तरी पंढरपूर नगरपरिषदेच्या स्थापने पासूनचा आज पर्यंतचा इतिहास बऱ्याच पंढरपूरकर नागरिकांना तसेच नवीन मतदारांना माहित नाही. पालिकेच्या आजपर्यंतच्या इतिहासा मध्ये कोणीकोणी चेअरमन, नगराध्यक्षपद भूषविले, पहिल्या महिला नगराध्यक्षा कोण ठरल्या, सर्वात जास्त नगराध्यक्षपदाची धुरा कोणी सांभाळली या सर्व माहितीसाठी सोलापूर तरुण भारत कडून खास करण्यात आला आहे हा बाबतीचा प्रपंच.





साधना भोसले

पंढरपूर नगरपालिकेची स्थापना १८८२ मध्ये झाली असून सध्याच्या २०२५ पर्यंतच्या १४३ वर्षाच्या या कार्यकाळा मध्ये पालिकेचे अध्यक्ष, कमीशनर, प्रभारी अध्यक्ष तसेच प्रशासक म्हणून तब्बल ९४ जणांनी पालिकेच्या कारभाराची धुरा आपल्या खांद्यावर घेतलेली होती. या मध्ये १८८६ पासून ते १९२५ या काळा मध्ये रामचंद्र नारायण करंदीकर, जी.बी. धायगुडे एच.टी. कवठेकर यांनी कमिशनर म्हणून तर बी.आर.हेबळीकर, जी.ई.स्कॉट यांनी (अध्यक्ष) म्हणून तर एम.टी.चिपळूणकर, व्ही.एम. खोपकर, जी.व्ही.काळे यांनी (चेअरमन) आणि व्ही.टी.काळे, व्ही. के. नामजोशी, जी.आर.केसकर, व्ही.बी. काणे आणि अकबरअली अब्दुलहुसैन यांनी अध्यक्ष म्हणून काम पाहिलेले होते.

सन १९२५ पासून पुढे डी.टी. आराध्ये, आर.एन.पुरंदरे, जी.बी. वालावलकर, जी.बी.राजोपाध्ये, बी.जे.बुरजे, जी.एस.अभंगराव,आर. जी.काळे, एन.एन. मांगले, एम.जे. भिंगे, एस.जे.भिंगे, पां.तु.उत्पात, एम.ए. मुळे यांनी नगराध्यक्ष म्हणून काम पाहिले. त्या नंतर सन १९८५ ते १९९१ या काळात बाळासाहेब डोंबे, आर.के. कांबळे, नारायण धोत्रे, प्र.कृ.देशमुख, अरविंद देवडीकर, सुनील पाटील, अरविंद जाधव, सुभाष भोसले, प्रभाकर अधटराव यांनी नगराध्यक्षपद भूषविले.

तत्कालीन आमदार सुधाकर परिचारकांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे लक्ष्मीनारायण भट्टड यांनी १९९१ ते १९९६ असे सलग पाच वर्षे नगराध्यक्षपदावर काम केले. त्या नंतर भागवताचार्य वा.ना.उत्पात, दगडूशेठ घोडके यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाला नंतर राजश्री गंगेकर या पहिल्या महिला नगराध्यक्षा म्हणून नगराध्यक्षपदाच्या खुर्चीवर विराजमान झाल्या. तेथून पुढे सुरेखा दिलीप पवार यांनी आणि २००१ मध्ये जनते मधुन नगराध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणूकी मध्ये सुनीता साळुंखे या विजयी झाल्या. २००१ ते २००६ हा पाच वर्षाचा कार्यकाल त्यांनी पुर्ण केला. त्या नंतर २००६ नंतरच्या पाच वर्षाच्या काळात लक्ष्मण शिरसट, दगडू धोत्रे, सतीश मुळे, पांडुरंग वामन बंदपट्टे यांची नगराध्यक्षपदी वर्णी लागली. सन २०११ मध्ये झालेल्या निवडणूकीत परिचारक गटाचा पराभव होवून पालिकेत सत्तांतर झाले. आमदार भारत भालके गटाच्या ताब्यात पालिकेची सत्ता गेली. त्या वेळी उज्वला भालेराव यांच्या गळ्यात नगराध्यक्षपदाची माळ पडली. अडीच वर्षाच्या कार्यकाळा नंतर झालेल्या सत्तांतरा पासून ते गेल्या नगरपालिका निवडणूकी मध्ये जनते मधुन परिचारक गटाकडून साधना भोसले या नगराध्यक्षपदाच्या सर्वसाधारण जागेवर निवडून आल्या होत्या.

**आठ वर्षे परिचारकांनी आणि साडेसात वर्षे भोसलेंनी सांभाळली नगराध्यक्षपदाची धुरा**

पंढरपूर नगरपरिषदेच्या स्थापने पासून ते आज पर्यंतच्या १४३ वर्षाच्या कार्यकाळा मध्ये सलग आठ वर्षे नगराध्यक्षपद भूषविण्याचा पहिल्यांदा मान जी.बी.परिचारक यांना मिळाला होता. त्या नंतर तब्बल ८३ वर्षांनी माजी नगराध्यक्षा साधना भोसले यांना सलग साडेसात वर्षे नगराध्यक्षपद भूषविण्याचा मान मिळाला आहे. यंदा देखील नगराध्यक्षपदाच्या शर्यती मध्ये त्या आहेत. त्यांनी देखील भाजपाकडून नगराध्यक्षपदाची उमेदवारी मागितली आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा नगराध्यक्षपदाची निवडणूक लढण्याची संधी मिळते का ? हे येत्या एक, दोन दिवसांमध्ये स्पष्ट होईल. जर त्यांना उमेदवारी मिळाली आणि त्या विजयी झाल्या तर सलगच्या नगराध्यक्षपदाच्या त्यांच्या रेकॉर्ड मध्ये निश्चितच पुन्हा भर पडू शकणार आहे.

**प्रशासकांच्या ताब्यात पालिकेचा कारभार**

पंढरपूर पालिकेवर डी.एस.भिंगे यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाल वगळता सन १९७७ते १९८५ या काळात जे.पी. बुधवंत, आय.सी.पाटील, रमनाथ झा, श्री.के.वनपाल, डी.एस.पवार आणि एम.रामास्वामी यांनी प्रशासक म्हणून पालिकेचे काम पाहिले होते.

**पहिल्या महिला नगराध्यक्षा गंगेकर**

पंढरपूर नगरपालिकेची स्थापना १८८२ मध्ये झाली. त्या वेळी तुकाराम रामचंद्र कवठेकर यांनी नगरपालिकेचे पहिले अध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. त्या नंतर पहिल्या महिला नगराध्यक्षा होण्याचा मान १९९७ मध्ये राजश्री गंगेकर यांनी मिळविला होता. पालिकेच्या स्थापने पासूनच्या आज पर्यंतच्या कार्यकाळा मध्ये राजश्री गंगेकर, सुरेखा पवार, सुनिता साळुंखे, उज्वला भालेराव आणि साधना भोसले या पाच महिलांनाच नगराध्यक्षपद भूषविण्याचा मान मिळाला आहे.

**सर्वात जास्त वेळा भूषविले नगराध्यक्षपद**

पंढरपूर नगरपालिके मध्ये जी.बी. परिचारक यांनी सन १९२५ ते १९३३ आणि १९३७ ते १९३९ आणि पुन्हा १९५७ ते १९५८ असे एकुण अकरा वर्षे नगराध्यक्ष म्हणून काम पाहिले. त्या नंतर ॲड.बी. जी. भादुले यांनी १९४९ ते १९५० आणि १९५१ ते १९५७ असे सात वर्षे तर ए.एच.कवठेकर यांनी टप्प्या टप्प्याने प्रत्येकी सहा वर्षे नगराध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती.

---

## महत्वाचे...




### 'फॅबटेक' मध्ये बालदिन उत्साहात साजरा

**सांगोला, दि. १४ नोव्हेंबर-**

फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्यु.कॉलेजमध्ये शुक्रवारी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीचे औचित्य साधून बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीस पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन सुरेखा रूपनर, सारिका रूपनर, प्राचार्य सिकंदर पाटील, प्रियाका पावसकर, वनिता बाबर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनी रुद्राणी ठोंबरे हिने गीत सादर केले. तसेच शिक्षिका विद्या नरुटे, शिक्षक दयानंद चांडोले यांनी बालदिना विषयी माहिती देत बडबड गीते, नाटक, नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण कोडक यांनी केले. उपस्थितांचे आभार नुजहत शेख यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



### सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये बालदिन उत्साहात

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज केगाव येथे बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला विद्यार्थ्यांसाठी दिवसभर विविध उपक्रमांचे आयोजन करून बालदिन अविस्मरणीय करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारताचे पहिले पंतप्रधान आणि मुलांचे लाडके चाचा नेहरू यांच्या प्रतिमापूजनाने झाली. यानंतर मुलांसाठी रंगतदार मॅजिक शो घेण्यात आला. जादूगाराने सादर केलेल्या रोमांचक, गूढ आणि मनोरंजक प्रयोगांनी विद्यार्थ्यांची उत्सुकता टोकाला पोहोचली. प्रत्येक प्रयोगानंतर उमटणाऱ्या टाळ्यांच्या गजरात संपूर्ण सभागृह दुमदुमत होते. यानंतर विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा म्हणून पारले बिस्किट्स फॅक्टरीला औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली. उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, पॅकेजिंग अशा विविध विभागांची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. विद्यार्थ्यांच्या विज्ञानाविषयक जिज्ञासेला चालना देण्यासाठी सोलापूर सायन्स सेंटरला शैक्षणिक सहल घेण्यात आली. विज्ञान प्रदर्शनातील आकर्षक मॉडेल्स, थरारक प्रयोग, डिजिटल डिस्प्ले आणि ३ शोमुळे विद्यार्थी अक्षरशः भारावून गेले. याप्रसंगी कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले यांनी मुलांना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### शिवरंजनी परिवारातर्फे २३ नोव्हेंबरला संगीत कार्यक्रम

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

शिवरंजनी परिवार प्रस्तुत आणि स्वान आर्ट फाउंडेशनच्या आयोजनातून 'मेलडी डेझ - आओ जी ले, फिरसे' हा किस्से, गप्पा, गाणी आणि लाईव्ह पेंटिंगचा अद्वितीय संगम असलेला कार्यक्रम सोलापुरात २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजता शिवछत्रपती रंगभवन येथे रंगणार असल्याची माहिती दिग्दर्शक उन्मेष शहाणे यांनी दिली. हा फक्त साधा संगीत कार्यक्रम नसून प्रेक्षकांना भावनिक प्रवासावर घेऊन जाणारा एक अनुभव असेल. संगीत आणि दृश्यकलेचा सुंदर मिलाफ प्रेक्षकांना पुन्हा बालपणीच्या खोडकर आठवणी, कॉलेज जीवनातील रंगीबेरंगी दिवस आणि आयुष्यातील ते खास क्षण पुन्हा जगण्याची संधी देईल, असेही ते म्हणाले. कार्यक्रमासाठी संगीत संयोजन अविनाश इनामदार यांचे असेल. गप्पा डॉ. जतिन काजळे आणि उन्मेष शहाणे रंगवतील. गायिका म्हणून अपूर्वा शहाणे सहभागी होणार असून गायनात उन्मेष शहाणे, विश्वास शाईवाले आणि अथर्व शहाणे यांचीही साथ मिळणार आहे. तबल्याची संगत सन्मित रणदिवे करणार आहेत. तसेच या संपूर्ण कार्यक्रमाला दृश्यात्मक परिपूर्णता देण्यासाठी दर्शना धुमाळ लाईव्ह पेंटिंग साकारतील. कार्यक्रमाचे लेखन दिग्दर्शक उन्मेष शहाणे यांचे असून त्यांना माधव देशपांडे यांनी सहाय्य केले आहे. महेश कोकाटे सहाय्यकाची भूमिका पार पाडणार आहेत तर संपूर्ण व्यवस्थापनाची धुरा सुवर्णा शहाणे सांभाळत आहेत.

---

## बालदिनानिमित्त अकलूजमध्ये महिला आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १४ नोव्हेंबर-**

विवा हॉस्पिटल, अकलूज आणि जिजाऊ ब्रिगेड (पुणे विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने बालदिनानिमित्त महिला आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात परिसरातील शेकडो महिलांनी सहभागी होऊन विविध मोफत आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला.




शिबिरामध्ये महिलांसाठी हिमोग्लोबिन, थायरॉईड, ब्लड शुगर अशा महत्त्वपूर्ण चाचण्यांचे मोफत आयोजन करण्यात आले. महिलांच्या आरोग्यासाठी या तपासण्या अत्यंत गरजेच्या असल्यामुळे मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थित राहून आरोग्यविषयक सुविधा घेतल्या. कार्यक्रमात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रीती गांधी यांनी महिलांच्या दैनंदिन आरोग्य समस्या, तसेच प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतरची काळजी या विषयांवर मार्गदर्शन केले. त्यांनी नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व महिलांना पटवून दिले. यानंतर डॉ. जयदीप काळे यांनी आयव्हीएफ व वंध्यत्व उपचार, आधुनिक तंत्रज्ञान तसेच यामुळे जोडप्यांच्या आयुष्यात होणारे बदल यावर माहिती दिली. शिबिरातील विशेष माहितीपर सत्र डॉ. मीनाक्षी जगदाळे यांनी घेतले.

सूत्रसंचालन सारिका थोरात यांनी केले. बालदिनाचे औचित्य साधून लहान मुलांकडून केक कापून बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विवा हॉस्पिटलचे सर्व डॉक्टर, कर्मचारीवर्ग तसेच जिजाऊ ब्रिगेडच्या महिला पदाधिकारी सुषमा पाटील, सुवर्णा शेंडगे यांनी परिश्रम घेतले.

---




## कल्याणशेट्टी महाविद्यालयात फूड फेस्टिवल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ नोव्हेंबर-**

उसाचा ताजा रस, पावभाजी, कचोरी, पाणीपुरी, सुगंधी दूध, फूड सॉलिड, थंड मठ्ठा, कोल्ड्रिंक्स, गरमागरम आप्पे आदींचा आस्वाद घेऊन विद्यार्थी तृप्त झाले. निमित्त होते कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयाकडून आयोजित फूड फेस्टिवल कार्यक्रम.

कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने फूड फेस्टिवलचे आयोजन केले होते. संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून फेस्टिवलचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

फूड फेस्टिवल उपक्रमाचे नियोजन पुनम पोकळगी यांच्या मार्गदर्शनानुसार प्रा. सलोनी शहा, प्रा. गुरुशांत हपाळे, शिल्पा धूमशेट्टी, संगीता स्वामी, शितल फुटाणे, मधुबाला लोणारी यांनी केले.

या उपक्रमाबद्दल संस्थेचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

---

## हराळवाडीच्या शाळा व्यवस्थापन समितीवर महिलाराज

### अध्यक्षपदी सावित्री माडकर; बिनविरोध निवडीने वेधले मोहोळ तालुक्याचे लक्ष



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

सध्या राज्यात राजकारणाचे वारे वाहत असून कोणीही नमतं घ्यायला तयार नसताना मोहोळ तालुक्यातील हराळवाडी येथे खेळीमेळीच्या वातावरणात शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडी बिनविरोध पार पडल्या. महिलांना समान संधी फक्त बोलून चालणार नाही म्हणत ग्रामस्थांनी महिलांना शाळा समितीवर बिनविरोध संधी देत अध्यक्षपदी सावित्री माडकर यांची निवड करण्यात आली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हराळवाडी येथे झालेल्या शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडणुकीत महिलाराज बिनविरोध प्रस्थापित झाले. शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षपदी गजानन पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. पालकांच्या उपस्थितीत ही निवड मुख्याध्यापिका कविता फुटाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

मोहोळ तालुक्यातील हाराळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडी करण्यात आल्या. यामध्ये सदस्य म्हणून सोनाली चवरे, सुरेखा धोडमिसे, पिंकू शेळके, प्रियांका कांबळे, अश्विनी मोटे, सुवर्णा कोळी, प्रताप शेळके, अर्चना माने, गीता पवार, रंगनाथ गावडे, लक्ष्मी गायकवाड यांची निवड करण्यात आली असून राम शेळके यांची शिक्षणप्रेमी सदस्य म्हणून निवड झाली आहे.

यावेळी गोविंद शेळके, लिंगराज व्हनमाने, सोन्याबापू ऐवळे, मनिषा पाटील, अर्चना माने, सुवर्णा जावीर, रेश्मा पवार उपस्थित होते. सूत्रसंचालन फुटाणे यांनी तर आभार शंकर पाटील यांनी मानले.

---

## राघोजी भांगरे : ब्रिटिश राजसत्तेला आव्हान देणारा पहिला संघर्षयोध्दा

जनजाती किंवा वनवासी आणि शहरवासी यांच्यात जाणीवपूर्वक भेद उत्पन्न करण्याचा अर्बन नक्षली प्रयत्न म्हणजे देश तोडण्याचा कुटील डाव. त्यापृष्ठभूमीवर राघोजी भांगरे यांचे स्मरण करणे क्रमप्राप्त ठरते. ९ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस साजरा करण्याचा अर्बनी जातकुळींचा नवा फंडा. १५ नोव्हेंबर भगवान बिरसा मुंडा यांची जयंती. या निमित्त देशपातळीवर जनजाती गौरव दिन साजरा करण्यात येतो. स्वातंत्र्य लढ्यात अनेक जनजातींनी संघर्ष केला. हालअपेष्टा सहन केल्या. ब्रिटिश अत्याचाराविरोधात निकराने लढा दिला. आपली संस्कृती टिकविली. त्यामुळे त्यांचे स्मरण आणि अभिवादन. या जनजातींमध्ये असाच एक योध्दा होता राघोजी भांगरे. त्यांचा जन्म (८/११/१८०५) नोव्हेंबर महिन्यात. ब्रिटिशांनी पंढरपुरात त्यांना पकडले तो दिवस २ जानेवारी १८४८. आणि एकतर्फी खटला चालवून त्यांना फासावर चढवलं. अशा जनजाती योद्ध्याचे यानिमित्त स्मरण करूया...त्यांनी केलेला संघर्ष आपल्यासाठी नेहमीच प्रेरणादायी आहे.

१८१८ मध्ये शनिवार वाड्यावर ब्रिटिशांचा युनियन जॅक फडकला. त्यानंतर ब्रिटिशांनी महादेव कोळी समाजाच्या अधिकारात किल्ल्यांची शिलेदारी, वतनदारी काढून घेतली. मराठी साम्राज्याशी एकनिष्ठ रामजी भांगरे आणि गोविंद खाडे यांनी उठाव केला. यात अग्रणी होते रामजी भांगरे यांचा मुलगा राघोजी. त्यांचा जन्म ८ नोव्हेंबर १८०५ रोजीचा. अहिल्यानगर जिल्ह्यातील देवगावचे ते रहिवासी. बालवयातच राघोजी तलवारबाजी, भालाफेक, बंदुकीने लक्ष्य साधणे, घोडेस्वारी यात तरबेज झाले. एकदा काय झाले. कोकणातील एका दरोड्यात ब्रिटिशांनी रामजीच्या कुटुंबियांवर संशय घेत रामजीचे भाऊ, नातेवाईक व महिला यांचा अनन्वित छळ केला. तिथून राघोजी आणि ब्रिटिश यांच्या संघर्षाची ही सुरवात. त्यासाठी राघोजींनी महादेव कोळी बांधवांची संघटना उभी केली. शस्त्रास्त्रे जमा केली. सैनिकी प्रशिक्षण दिले. महाड पासून त्र्यंबकेश्वर पर्यंतच्या इलाक्यात जाळे मजबूत केले. मग पुढे ब्रिटिशांवर गनिमी काव्याने हल्ले करून त्यांना जेरीस आणले.



जनजाती गौरव दिन

राघोजी शंकराचे, त्र्यंबकेश्वर, जेजुरीचा खंडोबा आणि पंढरपूरच्या विठुरायाचे निस्सीम भक्त. राघोजींना नियंत्रित करण्यासाठी ब्रिटिशांनी आतोनात प्रयत्न केले. पण जनतेची मर्जी सांभाळलेले राघोजींना जनतेनेच संरक्षित केले. त्यांचा ठावठिकाणा लागणे मुश्कील. या दरम्यान ब्रिटिश कॅप्टन मार्किन्तोशी जुन्नर येथे राघोजींनी दोन हात केले. या लढाईत राघोजींच्या सैन्याने ब्रिटिशांना नाकी नव आणले. नंतरच्या काळात ब्रिटिशांनी राघोजी भांगरेशी लढताना युध्दाचे तंत्र बदलले. तरीही राघोजीनी संघर्ष आणि हल्ले थांबवले नाहीत. या दरम्यान वरचढ ठरलेल्या ब्रिटिशांनी राघोजी भांगरे यांच्या सोबतच्या सहकार्यांचा छळ आरंभला. त्यांना चुकवण्यासाठी राघोजी हरिश्चंद्र गडावरील शंकराच्या दर्शनाला जाउन आले. शिवाय भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर जेजुरीचा खंडोबा या ठिकाणीही वेषांतर करून गेले होते. तरीही ब्रिटिशांची त्यांच्यावर पाळत होती. युद्धजन्य परिस्थिती तर होतीच. या संघर्षाच्या वातावरणात राघोजींनी :धाडस केले आणि वेष पालटून पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनाला गेले. तो दिवस होता, २ जानेवारी १८४८. राघोजीनी चंद्रभागेत स्नान केले. विठुरायाचे दर्शन घेऊन पुन्हा चंद्रभागेच्या वाळवंटात दाखल झाले. या दरम्यान साध्या वेशातील ब्रिटिश सैनिक राघोजींच्या मागावर होतेच. तेव्हा राघोजी निःशस्त्र होते. त्यामुळे राघोजींना पकडणे ब्रिटिशांना सोपे झाले. तिथून पुणे, ठाणे येथील तुरुंगात डांबून ठेवले. तिथेच एकतर्फी खटला चालवला. निकालही त्यांच्याच (ब्रिटिशांच्या) बाजूने दिला. नंतर ठाण्याच्या तुरुंगात २ मे १८४८ रोजी राघोजी भांगरे यांना फासावर चढवले. सह्याद्रीचा हा ढाण्या वाघ स्वातंत्र्यासाठी आणि देशासाठी फासावर चढला, पण राघोजी भांगरे यांचे बलिदान वाया गेले नाही. सह्याद्री कधीही इंग्रजांच्या दबावाखाली शांत बसला नाही. संस्कृती टिकवून ठेवणारा समाज भारतीय जनतेने देश स्वतंत्र होईपर्यंत विविध मार्गांनी लढाई आणि संघर्ष सुरूच ठेवला. महादेव कोळी समाज आजही देशभक्त, धर्मनिष्ठच आहे. ख्रिश्चनांनी आटोकाट प्रयत्न करूनही तो स्वतःचा हिंदू धर्म टिकवून आहे. हा समाज हिंदू धर्मापासून दूर गेलेला नाही. आम्ही सारे एक आहोत हा भाव देशातील जनजाती समाजाने टिकवून ठेवला आहे. वनवासी बांधव या देशातील सनातन संस्कृतीचेच वाहक आहेत. ही संस्कृती त्यांनी टिकवून ठेवली आहे. ते परिश्रमी आणि सन्मार्गाने जगणारे आहेत. शौर्य आणि स्वाभिमान ही त्यांची विशिष्ट ओळख आहे. एका दिव्य आणि आदर्श समाजाचे दर्शन म्हणजेच वनवासी बांधवांचे दर्शन. कावेबाजपणा ओळखायला हवा राष्ट्रीय संघर्षातही वनवासी बांधवच सदैव अग्रणी राहिले आहेत. इंग्रजांची शक्ती वाढू लागल्यानंतर एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी इंग्रजांनी संपूर्ण भारतावर कब्जा मिळवला. मात्र यावेळी त्यांना सर्वात मोठा संघर्ष जनजातींशीच करावा लागला. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, ओडिशा किंवा केरळ असेल किंवा नागालँड, आसाम, मेघालय वा अरुणाचल असेल. येथेच इंग्रजांना मोठा संघर्ष करावा लागला, हे लक्षात घ्यावे लागेल आणि हा संघर्ष जनजाती बांधवांनी केला होता. जनजातींचे स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान राहिले आहे. जनजाती विरुद्ध शहरवासी हा संघर्ष आज हेतूतः अर्बन नक्षली निर्माण करीत आहेत. हिंदूंमध्ये फूट पाडण्याची ही खेळी आहे. हा कावेबाजपणा समजून घेणे ही गरज आणि आवश्यकता आहे.

**विजयकुमार पिसे**
**विभाग सहमंत्री, विहिंप**
**मो. ८८८८८४७२५६**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# महापूर अन् अतिवृष्टीने सोलापूर जिल्ह्यातील १२ हजार हेक्टर जमिनीवरील माती गेली खरडून

## शासनाकडे ५७ कोटी रुपयांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

महापुराने अन् अतिवृष्टीने जिल्ह्यातील १२ हजार ५० हेक्टर क्षेत्रावरील माती खरडून गेली. त्यामुळे या जमिनी कसण्यायोग्य राहिल्या नाहीत. अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांसाठी शेतकऱ्यांना भरपाई देण्यात येत आहे यासाठी राज्य शासनाकडे ५७ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी दिली.

अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे काम सुरु आहे. फॉर्मर आयडी असलेल्या शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचत आहे. ज्या शेतकऱ्यांचे फॉर्मर आयडी नाहीत, अशा शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी गाव पातळीवर शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी तलाठी यांना



आदेश देण्यात आले आहेत, असेही ते म्हणाले.

अतिवृष्टीने जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी ढासळून त्यात गाळ पडला आहे. या विहिरीच्या दुरुस्तीचेही नियोजन आखण्यात येत आहे. यासाठी रोजगार हमी योजनेतून शेतकऱ्यांना मदत करण्यात येत असल्याचेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

### २६ हजार शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅकचे काम पूर्ण



अतिवृष्टी आणि महापुराने नुकसान झालेल्या शेतकरी बांधवांना शासनाकडून डीबीटीद्वारे मदतीचा हात मिळत आहे. मात्र ॲग्रीस्टॅक आणि ई-केवायसीअभावी अनेक शेतकरी मदतीपासून वंचित राहत आहेत. यामुळे या १५ दिवसात जवळपास २६ हजार शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅकचे काम पूर्ण केले आहे. शेतकऱ्यांच्या ई-केवायसीचेही काम गतीने सुरु असल्याचेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.



# एमएसईबीच्या वायरवर चढून बसला साप

**डब्ल्यूसीएसच्या सदस्यांनी सापाला सोडले निसर्गाच्या सानिध्यात**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

बाळे येथील आकाश नगरचे परिसरातील एमएसीबीच्या लाईन वायरवर साप चढून बसला होता याची माहिती वाईल्ड लाइफ कंजर्वेशन असोसिएशन सोलापूरचे सदस्य सोमा डोके यांना मिळताच तातडीने घटनास्थळी जाऊन तो साप रेस्क्यू करून निसर्गाच्या सानिध्यात सोडून देण्यात आला.

गुरूवारी १३ नोव्हेंबर गुरुवार रात्री ७.३० वा. बाळे येथील आकाश नगरचे रहिवासी विनय गोवर्धनकर यांनी घरासमोरील लाईन वायरवर एक साप चढून बसला आहे व त्याला रेस्क्यू करावे असे डब्ल्यूसीएसचे सदस्य सोमा डोके यांनी फोनवरून माहिती दिली. ही माहिती मिळताच सोमा डोके व रोहित गावडे हे दोघेजण आकाश नगरला घटनास्थळी गेले. दहा ते पंधरा मिनिटात घटनास्थळी पोहोचले. तिथे पाहणी केली असता MSEB च्या लाईन वायरवर एक विरोळा जातीचा बिनविषारी साप चढून बसला असल्याचे दिसून आले.

हे दृश्य पाहून दोघेही अचंबित झाले. कारण साप हा भिंतीवर, झाडावर अथवा वायरवर चढल्याचे आजपर्यंत कधीच पाहण्यात आले नव्हते त्यामुळे लोकांची उत्सुकताही शिगेला पोहोचली होती. डोके यांनी लाईन वायर समोरील गॅलरीवर चढून एका पोत्यामध्ये त्या सापाला अलगद पकडले आणि तिथे जमलेल्या लोकांचा जीव भांड्यात पडला.

त्यानंतर तेथील जमलेल्या नागरिकांना त्या सापाबद्दल अभ्यासपूर्ण माहिती देऊन त्या सापाला पुन्हा निसर्गाच्या सानिध्यात सुखरूपपणे सोडून देण्यात आले.

## महत्वाचे...



### 'हरिभाई देवकरण'मधील भानुदास इरशेट्टी यांचा सेवागौरव समारंभ उत्साहात

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

शिक्षण प्रसारक मंडळी पुणे संचलित सोलापूर येथील हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहाय्यक या पदावरून ३३ वर्ष सेवा करुन भानुदास इरशेट्टी हे सेवानिवृत्त झाले आहेत. शाळा समितचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या मार्गदर्शननुसार तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या दीपा फाटक यांच्या हस्ते शाल, मानपत्र देऊन सत्कार कारण्यात आला. प्रास्ताविक प्रा. महेश पाटील यांनी तर मानपत्राचे वाचन प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी केले. कार्यालयीन प्रमुख रत्नाकर लोंढे आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, पर्यवेक्षकद्वय प्रा. भानुदास बनसोडे अप्पासाहेब राऊत, औदुंबर सर्वगोड, महेंद्र रणधीर, डॉ. मारुती शहाणे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. उर्मिला चव्हाण तर आभार प्रा. सारिका अनपट यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल महारुद्र कत्ते, चित्रकला शिक्षक रोणे यांनी परिश्रम घेतले.



### कै. वि. मो. मेहता शाळेत बालदिन साजरा

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. अधिव्याख्याता प्रभाकर बुधाराम यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. याप्रसंगी इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनींनी गीत सादर केले.मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. बालसभेचे अध्यक्ष समर्थ डिगे यांची निवड चेतन बिराजदार याने केली व अनुमोदन मलकारसिद्ध पुजारी यांने दिले. प्रमुख अतिथींचा परिचय सूर्याणी गायकवाड हिने केला. इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांनी पंडित नेहरूंविषयी भाषणे केली. त्याचे यादी वाचन तनुष्का टेळे हिने केले. श्रेयश राठोडने पंडित नेहरूंची वेशभूषा साकारली. सहशिक्षिका भारती शिंदेंनी नेहरूंच्या जीवनातील प्रसंग गोष्टी रुपातून सांगितले. शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्रतीक्षा तेली हिने केले तर आभार अवनी कराळे हिने केले. सहशिक्षिका सुजाता यादव व मयुरी दुरुगकर यांनी बालसभेची तयारी करून घेतली.बालदिनानिमित्त करंजकर, बिराजदार व कदम या पालकांतर्फे शाळेतील सर्वच विद्यार्थांना खाऊ देण्यात आला.

# मालमत्ता कर विभागातील ६४ वसुली लिपिकांना प्रत्येकी ५०० रुपयांचा दंड

- वसुली इष्टांक पूर्ण न झाल्याने करण्यात आली कारवाई
- महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी काढले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

महिन्यात दिलेले इष्टांक पूर्ण न झाल्याने महापालिकेतील ६४ वसुली लिपिकांना प्रत्येकी ५०० रुपयांचा दंड करण्यात आला आहे. हा दंड त्यांच्याकडून तातडीने वसूल करण्यात येणार आहे. महापालिका मालमत्ता कर विभागाचे प्रमुख तथा उपायुक्त आशिष लोकरे यांनी कारवाईचे आदेश काढले आहेत.

सोलापूर महापालिका मालमत्ता कराची मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. याच्या वसुलीसाठी प्रशासनाकडून युध्दपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. अशावेळी महापालिकेच्या कर वसुलीतील सर्व पेठांमधील वसुली लिपिकांना दरमहा वसुलीचे इष्टांक देण्यात आले आहे. मालमत्ता कर विभागासाठी वार्षिक उद्दिष्टपूर्ती थकबाकी वसूल करणे, थकबाकी न भरल्यास मिळकतींवर बोजा चढविणे अथवा मिळकती सील करणे अशा प्रकारची कारवाई निश्चित करण्यात आली आहे. उद्दिष्टपूर्ती होण्याच्या दृष्टीने यापूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी आढावा



बैठकीत आदेश दिलेले आहेत.

दरम्यान, माहे नोव्हेंबरमध्ये प्रत्येक वसुली लिपिकाने किमान २ लाख रुपयांची वसुली आणण्याचे निर्देशित देण्यात आले आहेत. दि. १ ते ११ नोव्हेंबर या कालावधीमध्ये केवळ १ कोटी ८७ लाख ५९ हजार ९९३ रुपये इतकीच वसुली झालेली आहे. वसुलीसंदर्भात वारंवार बजावून देखील इष्टांकानुसार वसूल न करता कमी प्रमाणात वसुली आणल्याचे निदर्शनास आले आहे. दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करणे जबाबदारी व कर्तव्य पार न पडणे. असे प्रकार निदर्शनास आले आहे. यासाठी सर्वस्वी वसुली लिपिक हेच जबाबदार आहेत. यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) १९७९ चे नियम ३ (१) मधील तरतुदीचा भंग झाल्याने त्यास वसुली लिपिक यांना जबाबदार धरण्यात आले आहे. यानुसार महापालिकेच्या मालमत्ता कर विभागातील एकूण ६४ वसुली लिपिक-कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ५६(२) (ड) च्या तरतुदीनुसार प्रत्येकी ५०० रुपये दंड करण्यात आला आहे.

**या कर्मचाऱ्यांवर झाली दंडात्मक कारवाई**

मालमत्ता कर विभागातील दंडात्मक कारवाई झालेले एकूण ६४ वसुली लिपिक असे - राम सिंग पवार, अस्लम नदाफ, पी.पी. सोनवणे, बी.एम. जवळगी, पी.व्ही. उपळेकर, पी.पी. सोनवणे, जी.एस. शेख, ए.एम. मुलाणी, ए.व्ही. कुलकर्णी, आर.एच. उगरल, आर.एस. बाबरे, के.बी. धारा, संदेश गंधम, प्रशांत केरूळकर, वाय.एस. झंपले, एस.के. माने, पवन कन्ना, महेश माळेकर, पी.जी गट्टू, चंदन उंब्रजकर, ए.जी. गोरे, एस.डी. माने, के.एस. भोसले, ए.एन. गुलेड, एस.के. बडेवाले, के.पी. दळवी, पी.एस. मंडल, व्ही.ए. आडम, जय सिमोन गट्टू, एस.बी. करजगीकर, अर्शद शेख, भीमाशंकर सरसंबी, एन.एन. गायकवाड, एस.सी. स्वाके, डी.एस. जमादार, आर.एस. गवळी, दीपक फुलसुंदर, रवी गडवालकर, एन.बी. पवार, एस.आर. कोरबू, बी.पी. माने, व्ही.आर. गोडलोलू, एस.एस. टेके, सलाउद्दीन बाडेवाले, बी.आर. नरळे, जब्बार नदाफ, एस.आर. सरवदे, कैलास लोहार, डी.यु. दांडे, डी.एम. पाटील, गोपाल आव्हाळे, बी.डी.शिवशरण, टी. एस. कुलकर्णी, एन. ए. शिरसाट, आर.ए. परांडेकर, सुजित काळे, जी.बी. जाधव, व्ही.एस. उपरे, ए.ए. जकातदार आणि पी.सी. सरवाडकर.

## आद्यक्रांती गुरु लहुजी वस्ताद साळवे यांना महापालिकेच्या वतीने अभिवादन

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

आद्य क्रांती गुरु लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३१ व्या जयंतीनिमित्त साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा आवारात सोलापूर महानगरपालिका आणि क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे मध्यवर्ती जयंती महोत्सव मंडळच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी मध्यवर्ती मंडळाचे संस्थापक सुरेश पाटोळे, मध्यवर्ती जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष खंडू आप्पा बनसोडे, किशोर जाधव, भीमराव गायकवाड, अजित खानसोळे, जावेद पानगल, रोहन कामने, बापू गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती. सोलापूर महापालिकेचे कर्मचारी राजाराम भोसले, रमेश चव्हाण, उद्यान विभागाचे यल्लाप्पा पुजारी यांचा विशेष गौरव करण्यात आला.

### जय भारत शाळेत बालदिन साजरा

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**


जय भारत प्राथमिक शाळेत पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सिद्राम फुले उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव दिपक फुले, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी, चंदन फुले, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी, चंदन फुले उपस्थित होते. कायक्रमाचे प्रास्ताविक कविता लेंगरे यांनी केले तर आभार राजश्री आंबेकर यांनी मानले. सूत्रसंचालन श्री. गाटे यांनी केले.

# नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुका; नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायती यांच्या सदस्य व अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. सोलापूर जिल्ह्यातील ११ नगरपरिषदा व १ नगरपंचायतींचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे.

निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील, खनिकर्म अधिकारी निलिमा जाधव, प्र.जिल्हा सह आयुक्त योगेश डोके, नायब तहसिलदार तथा दुय्यम चिटणीस उत्कर्ष देवकुळे हे जिल्ह्यातील सर्व नोडल अधिकारी यांचेशी समन्वय



साधून नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे अनुषंगाने सर्व कामकाजाची पूर्तता करून घेणे, त्याबाबत वेळोवेळी जिल्हाधिकारी यांना अवगत करणे. आचारसंहिता अंमलबजावणी करणे आदी कामकाज पाहणार आहेत.

तहसिलदार सं.गां.यो.शिल्पा पाटील यांच्याकडे सोलापूर जिल्हांतर्गत निवडणुका असलेल्या नगरपरिषद / नगरपंचायतीकडे निवडणुकीसाठी आवश्यक कर्मचारी नियुक्तीबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून माहिती घेणे, कर्मचारी अपुरे पडत असल्यास संबंधित तहसिलदार यांचेकडून तालुक्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची माहिती घेवून कर्मचारी उपलब्ध करून देणे. तसेच राज्य निवडणूक आयोग यांचे मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक कार्यवाही करणे. अनुपस्थित कर्मचारी यांचेवर कारवाई करणेबाबत जिल्हाधिकारी यांचेकडे अहवाल सादर करणे आदी जबाबदार आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, नायब तहसिलदार (आस्थापना शाखा) बालाजी बनसोडे, उपजिल्हाधिकारी (महसूल) संतोषकुमार देशमुख, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांना जबाबदाऱ्या वाटून दिल्या आहेत. मतदान प्रक्रिया पाडल्यानंतर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निश्चित केलेल्या सुरक्षा कक्षात राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे ठेवले गेल्याची खात्री करणे. मतदान दिवस पूर्व, मतदान दिवसावेळी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून EVM² अहवाल संकलित करणे. त्याप्रमाणे EMS Software मध्ये अद्यावत करणे/ खात्री करणे. मतमोजणी नंतर सर्व मतदान यंत्रे निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून स्विकारणे, सुरक्षित ठेवणे व एतच् छेवरश्र जषषळलशी यांनी राज्य निवडणूक आयोग यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे तंतोतंत पालन करणे. निवडणूक कामानिमित्त नेमणेत आलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकरिता प्रशिक्षण घेणे आदी जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.





# पद्मावतीदेवीची कुंकूमार्चना भक्तीभावात; आजपासून माहेरच्या साडीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

तिरुपती येथील पद्मावतीदेवीला यंदा सोलापुरातील पद्मशाली बांधव सामूहिक देणगीतून 'पुट्टींटी पट्टूचिरा' अर्थात माहेरची साडी अर्पण करणार आहेत. यानिमित्ताने पद्मावतीदेवीची शुक्रवारी लोटस मंगल कार्यालयात सामूहिक कुंकूमार्चना करण्यात आली. यानंतर शनिवारदिनांक १५ नोव्हेंबर पासून देवीला अर्पण करण्यात येणाऱ्या माहेरच्या साडीच्या दर्शनाची सोय दाजी पेठेतील व्यंकटेश्वर मंदिरात करण्यात येणार आहे.

पद्मशाली श्री पद्मावतीदेवी ब्रह्मोत्सवम संस्थेतर्फेसालाबादप्रमाणे यंदा २१ नोव्हेंबर रोजी तिरुपतीनजीकच्या तिरुचानूर येथील श्री पद्मावतीदेवीला ब्रह्मोत्सवनिमित्त माहेरची साडी अर्पण करण्यात येणार आहे. याचे यजमानपद अनेक जोडप्यांनी घेतले आहे. दरम्यान ज्या भाविकांना तिरुपती येथील ब्रह्मोत्सवात सहभागी होता येत



**सोलापूर : लोटस मंगल कार्यालयात पद्मावतीदेवीची सामूहिक कुंकूमार्चना करण्यात आली. यामध्ये सहभागी झालेले भक्त.**

नाही अशांच्या सामूहिक देणगीतून देवीला एक स्वतंत्र साडी अर्पण करण्यात येणार आहे. या साडीची पूजा शुक्रवारी लोटस मंगल कार्यालयात करण्यात आली. यानिमित्त पद्मावतीदेवीची सामूहिक कुंकूमार्चना करण्यात आली. पंडित वेणुगोपाल जिल्ला, पंडित सुदर्शन जिल्ला यांच्या पौरोहित्याखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी संस्थेचे संस्थापक जनार्दन कारमपुरी, अध्यक्ष अंबादास बिंगी, अखिल भारतीय पद्मशाली संघाचे तुकेश भैरी, नागेश सरगम, गोपी वड्डेपल्ली, व्यंकटेश पडाल, पुरुषोत्तम पोबत्ती, दामोदर पासकंटी, तुषार जक्का आदी तसेच महिला भक्तगण उपस्थित होते.

यावेळी कल्याण व्यंकटदास भजनी मंडळाचे गायक बाळू मदनाल, गायिका इंदिरा गड्डम, गीता सग्गम, चंदू लिबोळे, नारायण रुमाल, श्रीनिवास बोगा यांनी भक्तीगीते सादर केली. भक्तांनी व्यंकटरमणा गोविंदा... गोविंदा... चा जयघोष केला. अतिशय भक्तीपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम पार पडला. सामूहिक देणगीतून देवीला अर्पण करण्यात येणारी माहेरच्या साडीचे शनिवार दिनांक १५ नोव्हेंबरपासून दाजी पेठेतील व्यंकटेश्वर मंदिरात दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. याच ठिकाणी या साडीसाठी देणगी देण्यासाठी हुंडीची सोय करण्यात आली आहे. १९ नोव्हेंबरपर्यंत भक्तांना या साडीचे दर्शन घेता येईल.या ठिकाणी भक्तांनी यथाशक्ती देणगी अर्पण करावी, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.



## राष्ट्रमाता इंदिरा शाळेत बालदिन साजरा

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

हैदराबाद रोड विडी घरकुल येथील राष्ट्रमाता इंदिरा प्राथमिक शाळेत माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन साजरा करण्यात आला. यावेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस अमृतदत्त चिन्नी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांची भाषणे झाली तसेच विविध कलागुण सादर करण्यात आले. चित्रकला स्पर्धेचे आयोजन करून बक्षीस वितरण व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. कार्यक्रमास मुख्याध्यापक तोळणुरे व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती स्थापन

### नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक २०२५

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांच्या निर्देशानुसार नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे. ही समिती दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली.

या समितीचा उद्देश निवडणूक कालावधीत प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या राजकीय जाहिरातींची तपासणी, प्रमाणीकरण आणि संनियंत्रण करणे हा आहे. जिल्हा माहिती अधिकारी हे समितीचे सदस्य सचिव तथा नोडल अधिकारी म्हणून कार्य करतील. या समितीमध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक, सोलापूर, निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित नगरपरिषद / नगरपंचायतचे मुख्याधिकारी आदींचा समावेश आहे. ही समिती मीडिया मॉनिटरिंग कमिटी म्हणून कार्य करणार असून, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, सोशल मीडिया आणि इतर डिजिटल माध्यमांवरील राजकीय जाहिरातींचे परीक्षण व प्रमाणीकरण करणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि प्रसारमाध्यम प्रतिनिधींना आवाहन करण्यात येते की, प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व जाहिराती या समितीकडून प्रमाणित करूनच प्रसारित कराव्यात, जेणेकरून निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि कायद्याच्या चौकटीत राहील.

## महत्वाचे...

### महिला एस.टी.बस प्रवाशाचे २ लाखांचे दागिने लंपास

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

सोलापूर ते सांगोला एस.टी.बसमध्ये चढणाऱ्या वृध्द महिलेच्या पर्सची चैन उघडून चोरट्याने २ लाख २ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याबाबत जयश्री दत्तात्रय झुंजकर (वय ५९, रा. गौडगाव, ता. बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयश्री झुंजकर या १३ नोव्हेंबर रोजी सकाळी पावणे बाराच्या सुमारास सोलापूर एस टी स्टॅन्ड येथे सोलापूर ते सांगोला एस टी बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत जयश्री झुंजकर यांच्या खांद्याला अडकाविलेल्या पर्सची चैन उघडून त्यातून पर्समध्ये हात घालून ३० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या पाटल्या, १० ग्रॅम वजनाचा लक्ष्मीहरि, ८ ग्रॅम ३०० मिलीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा २ लाख २ हजार ४६२ रुपयांचा ऐवज चोरून नेला. अशी नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार चुंगे पुढील तपास करीत आहेत.

### पूर्व वैमनस्यातून तलवारीने मारहाण; पाच जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

पूर्व वैमनस्यातून तरूणाला तलवारीने मारहाण करणाऱ्या पाचजणांविरूध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत प्रेम बन्सी मन्सावाले (वय १८, रा. हुच्चेश्वर नगर भाग ३, कुमठा नाका, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन कृष्णा राजू जमादार, सुमीर राजू जमादार, गणेश राम जमादार, दिपक राम जमादार, सनी राम जमादार (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास प्रेम मन्सावाले हा पाटील नगरमधील श्री टेलर्स दुकानासमोरून स्वागत नगर ते चेतन हॉटेल रस्त्याने जात होता. त्यावेळी जुन्या भांडणाचा राग मनात धरून प्रेम मन्सावाले यास जमादार यांनी तीन दुचाकींवरून येऊन फायटर, लोखंडी रॉड, फरशी, तलवारीने मारहाण करून जखमी केले. या भागाचे दादा आहोत, कोणी मध्ये आले तर तुम्हांला खल्लास करू असे म्हणून पुन्हा आमच्या नादी लागला तर जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक वाघमारे पुढील तपास करीत आहेत.

### बनावट नोटरी व करारपत्र करून २ लाख ५० हजारांची फसवणूक

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

बनावट नोटरी व करारपत्र करून २ लाख ५० हजारांची फसवणुक करणाऱ्या चौघांवर एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत असदउल्ला इफ्तेखार खतीब (वय ४८, रा. कुर्बान हुसेन नगर, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन मतीन शेख, इरफान शेख, अल्ताफ शेख, शहाजाहूर चौधरी (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑगस्ट २०२३ ते १३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मतीन शेख व त्याच्या साथीदारांना जुना सर्व्हे नं. २४७/१ नवीन सर्व्हे नं. ४२/१ पैकी शिवपार्वती नगर प्लॉट नं. १४१ यांसी क्षेत्रफळ १ हजार चौ. फुट जागा लिहून देणार म्हणून अंबाजी मल्लय्या गोणे व लिहून घेणार इरफान शेख असे दाखवून सदर जागेची बनावट नोटरी कब्जे पावती व करार पत्र तयार करून सदरची जागा इरफान शेख व शहाजाहूर चौधरी यांनी असदउल्ला खतीब यांच्याशी २ लाख ५० हजार रुपये घेऊन व्यवहार केला. अशा प्रकारे मतीन शेख व त्याच्या साथीदारांनी मिळून खतीब यांची २ लाख ५० हजार रुपयांची फसवणुक केली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक गाढवे पुढील तपास करीत आहेत.




### गणपती घाट येथून दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

सोलापूर शहरातील गणपती घाट येथे पार्क करुन ठेवलेली ७० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरुन नेली. याबाबत श्रीवल्लभ दत्तात्रय ओक (वय-२६, रा.भवानी पेठ, सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. १० नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास श्रीवल्लभ ओक यांनी गणपती घाट येथे एम.एच.१३ सी.एक्स.३५५२ या क्रमांकाची दुचाकी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. अज्ञात चोरट्याने ती चोरुन नेली असे फिर्यादीत नमूद आहे. हवालदार घुगे तपास करीत आहेत.



## बिहारमधील तगडा विजय : पंतप्रधान मोदींच्या विकासकामांवर जनतेने टाकलेल्या विश्वासाचे प्रतिक

### महापालिका निवडणूक : भाजपा प्रमुख रघुनाथ कुलकर्णी यांचा निर्वाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ नोव्हेंबर-**

बिहार विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीसह एनडीएला मिळालेले घवघवीत यश हे बिहारमधील जनतेचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या विकासावर असलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे सोलापूर महानगरपालिका निवडणूक प्रमुख रघुनाथ कुलकर्णी यांनी केले. बिहारमधील भाजपा एनडीएच्या विजयाबद्दल भाजपा शहर मध्यतर्फे आ. देवेंद्र कोठे यांच्या संपर्क कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी प्रचंड जल्लोष करत विजय साजरा केला.

यावेळी आ. देवेंद्र कोठे यांनी भाजपा महापालिका निवडणूक प्रमुख कुलकर्णी यांना मिठाई भरवत गुलाल लावत पक्षाच्या विजयाबद्दल अभिनंदन केले. यानंतर भाजपाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी ढोल ताशांच्या गजरात जल्लोष केला. यावेळी कार्यकर्त्यांनी भारत माता की जय, वंदे मातरम्, जय श्रीराम, भारतीय जनता पार्टीचा विजय असो, देश का नेता कैसा हो, नरेंद्र मोदी जैसा हो, बिहार चुनाव तो झाकी है, पश्चिम बंगाल बाकी है अशा घोषणा दिल्या.

यावेळी ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांची आतिषबाजी करत भाजपा कार्यकर्त्यांनी एकमेकांना मिठाई भरवत नागरिकांना मिठाईचे वाटप करून जल्लोष केला. यावेळी माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, माजी स्थायी समिती सभापती विनायक कोंड्याल, माजी सभागृह नेते देवेंद्र भंडारे, महिला मोर्चा अध्यक्षा रंजिता चाकोते, कुमुद अंकाराम, रामेश्वरी बिर्रु, विजया वड्डेपल्ली, राजकुमार हंचाटे, मेघनाथ येमुल, भारतसिंग बडूरवाले, रविसिंग कय्यावाले, जेम्स जंगम, नागनाथ कसलोलकर, काशिनाथ झाडबुके, सुनीता कामाठी, अंबादास करगुळे, नागेश सरगम, अक्षय अंजिखाने, नागेश खरात यांच्यासह भाजपा पदाधिकारी मंडल पदाधिकारी, शक्ती केंद्र, बूथ प्रमुख व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### आ. देवेंद्र कोठेंनी दिला अबकी बार ७५ पारचा नारा

बिहार विधानसभा निवडणुकीतील विजयाचा आत्मविश्वास कायम ठेवत या पुढील सर्व निवडणुका भाजपा कार्यकर्त्यांनी मोठ्या ताकतीने आणि त्याच आत्मविश्वासाने लढण्याचे आवाहन आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना केले. यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी अबकी बार ७५ पार असा नारा देत कार्यकर्त्यांमध्ये उत्साह भरला. आमदार कोठे यांच्या या घोषणेनंतर भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी या घोषणेला जोरदार प्रतिसाद देत टाळ्यांचा कडकडाट केला.




## भाजपा पक्ष कार्यालयात बिहार विजयाचा जल्लोष

### भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

बिहार विधानसभेच्या निवडणुकीत भाजपा, जेडीयू आणि मित्र पक्षांच्या आघाडीला मिळालेल्या विजयाचा जल्लोष सोलापुरात उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम सिव्हिल चौक येथील भाजपा पक्ष कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. प्रसंगी स्थानिक स्वराज्य संस्था सोलापूर महानगरपालिका भाजपा निवडणूक प्रमुख रघुनाथ कुलकर्णी, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कार्यक्रमाला मोर्चा-आघाडी सेल प्रमुख, आजी-माजी नगरसेवक, मंडल पदाधिकारी, शक्तिकेंद्र व बूथ प्रमुख यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमात बिहारमधील निकालाबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले आणि पुढील निवडणुकांसाठी संघटनात्मक तयारी अधिक बळकट करण्याचा निर्धार करण्यात आला. इतकेच नाहीतर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये भाजपा पदाधिकाऱ्यांनी मुसंडी मारावी आणि घवघवीत यश मिळवावे, असे आवाहन सोलापूर महानगरपालिका भाजपा निवडणूक प्रमुख रघुनाथ कुलकर्णी यांनी माध्यमांशी बोलताना केले.

## ‘काल्या अन् वॉन्टेड’ सोलापूर, धाराशिव जिल्ह्यातून तडीपार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

सोलापूर शहरातील सराईत गुन्हेगार काल्या आणि वॉन्टेड या दोघांना पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर आणि धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले.

सलमान उर्फ वॉन्टेड इरफान होटगीकर (वय ३२, रा. सुजाता नगर, मुळेगांव रोड, सोलापूर) आणि अनिल उर्फ काल्या राजु चौगुले (वय ३०, रा. मड्डी वस्ती, सोलापूर) अशी नावे आहेत. सलमान उर्फ वाटेंड होटगीकर याचेविरुध्द सन २०१३, २०१९, २०२३ व २०२५ या कालावधीमध्ये साथीदारांसह दंगा व मारामारी करणे, घातक शस्त्राचा वापर करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. तसेच अनिल उर्फ काल्या चौगुले याचेविरुध्द सन २०१८ व २०२४ या कालावधीमध्ये चोरी करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे या दोघांनाही सोलापूर शहरातून तडीपार करण्यात यावे म्हणून पोलीस उप-आयुक्त कबाडे यांना सादर करण्यात आला होता. त्या प्रस्तावास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी मंजूरी देत दोघांनाही सोलापूर व धाराशीव जिल्हा येथून दोन वर्षाकरीता तडीपार करण्याचे आदेश दिले.


काल्या


वॉन्टेड

## राष्ट्रवादीच्या मुख्य प्रवक्तेपदी सुहास कदम; माध्यम समन्वयकाची अतिरिक्त जबाबदारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ नोव्हेंबर-**

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहर युवक अध्यक्ष यांच्यावर राष्ट्रवादीच्या जिल्हा मुख्य प्रवक्तेपदाची व माध्यम समन्वयकाची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी कदम यांची निवड जाहीर केली. जिल्हा परिषद, पंचायत समित्या व नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने ही निवड करण्यात आली आहे. कदम यांनी पक्षाची ध्येयधोरणे तळागाळात पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच विरोधात असतानाही पक्षाच्या अनेक आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन पक्षाची बाजू मांडण्यासाठी त्यांची प्रवक्तेपदाबरोबरच माध्यम समन्वयकाची जबाबदारी देण्यात आली आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दृढ विश्वास, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे मार्गदर्शन आणि जिल्हाध्यक्ष उमेश् पाटील यांचे पाठबळ यामुळेच आपण पक्षामध्ये चांगले काम करू शकलो असल्याची भावना निवडीनंतर कदम यांनी व्यक्त केली.



## बॅटने मारहाण केल्याप्रकरणी ५ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

बॅटने मारहाण करून गंभीर दुखापत केल्याप्रकरणी तरूणास जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांनी ५ वर्षे सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. राम मधुकर फुलारी (वय २१, रा. कुमार स्वामी नगर, शेळगी) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. याबाबत राजू शरणप्पा पुजारी (रा. कुमार स्वामी नगर, शेळगी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

३० मे २०२१ रोजी संध्याकाळी राजू पुजारी याच्याबरोबर क्रिकेट खेळण्याच्या कारणावरून राम फुलारी याने हातातील बॅटने राजू पुजारी याच्या डोक्यावर जबर मारहाण केली होती. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात खूनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सहायक पोलिस निरीक्षक प्रविण दुपारगुडे यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. याची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश शर्मा यांच्या समोर झाली. सरकारच्यावतीने ६ साक्षीदार तपासण्यात आले. या मध्ये जखमी फिर्यादी, हजर प्रत्यक्ष साक्षीदार, पंच, डॉक्टर, तपासी अंमलदार यांची साक्ष महत्वाची होती. फिर्यादीस प्राणघातक शस्त्राने गंभीर दुखापत केल्याचा आरोप सरकारी पक्षाने शाबीत केल्याने न्यायाधीश शर्मा यांनी आरोपीस ५ वर्षे सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

दंड न भरल्यास तीन महिने सक्तमजुरीची शिक्षादेखील सुनावली.सरकारच्यावतीने ॲड. आनंद कुर्डूकर यांनी फिर्यादीकडून ॲड. सैफोद्दीन शेख, ॲड. म. इरफान शेख यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. व्हि.पी. शिंदे यांनी काम पाहिले.

## ‘राष्ट्रवादी’चे दोन्ही गट एकत्र येणार का? अजित पवार गटाचा ‘तो’ नारा खरा ठरणार का?







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

खा.सुप्रिया सुळे यांनी नुकताच केलेले ते वक्तव्य, राष्ट्रीय नेते शरद पवार यांचे भाकरी फिरवण्यासंदर्भातचे वक्तव्य, ना.अजित पवार यांचा ‘भाजप’प्रणित महायुती सरकारमध्ये आता मूड राहिला नाही. आघाडी होण्याबाबत ‘महाविकास’मध्ये स्पष्टपणे वाच्यता होईनासे झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार व अजित पवार गट हे दोन्ही गट एकत्र येणार असल्याबाबतच्या चर्चा यांसारख्या बाबींकडे लक्ष वेधताना सोलापूर महापालिकेच्या आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी अजित पवार गटाचा ‘अब की बार पन्नास पार’ चा नारा खरा ठरणार का? असा सवाल राजकीय वर्तुळातून उपस्थित केला जात आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर, पक्षाने तातडीने बैठका घेत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ताकद दाखवण्याचा निर्धार केला आहे. यामध्ये सर्वधर्मीय उमेदवारांना सोबत घेऊन सत्तेच्या दिशेने वाटचाल करण्याचे धोरण बोलून दाखवण्यात आले आहे. इतर पक्षातील नेते आणि कार्यकर्ते राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करत आहेत. या मंडळींच्या स्वागत समारंभावेळी शहराध्यक्ष संतोष पवार यांनी स्वबळाची भाषा करत पक्षसंघटनेची ताकद दाखवून देणार असल्याचे जणू सुतोवा केले. विशेष म्हणजे, या स्वागत समारंभात ‘अब की बार पन्नास पार मुश्रीफ’चा नारा देण्यात आला. तरी देखील अजित पवार गटाने ‘युती’ची शक्यता फेटाळलेली नाही, सर्व बाजू तपासून पाहू असे विधान केले आहे. मात्र दुसरीकडे भाजपला रोखण्यासाठी एक नवी खेळी करत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढू शकतात. त्याअनुषंगाने दोन्ही राष्ट्रवादीमध्ये खलबते आणि बैठकांचे सत्र सुरु झाले आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास सोलापूर शहर, जिल्ह्यासह राज्याची राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही सांगण्यात येत आहे.

**आज पुण्यात बैठक :** अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सोलापूर सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी आज पुण्यात प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. महापालिकासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि महायुती किंवा दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासंबंधी या बैठकीत चर्चा होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. या नव्या फॉर्मुल्यामुळे राज्याच्या राजकारणात नवीन फेरबदल पहावयास मिळणार असल्याचे भाकीत वर्तवले जात आहे.

#### मंत्री हसन मुश्रीफ यांचा फॉर्म्युला, ‘भाजपा’ची डोकेदुखी





ना.अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या भूखंड घोटाळ्याच्या विषयावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात वादविवाद झाला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने ‘राष्ट्रवादी’कडून हा नवा फॉर्म्युला पुढे आणला जात आहे. दरम्यान, ना.अजित पवार यांचे निकटवर्तीय असणारे राज्याचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी आपल्या कागल विधानसभा मतदारसंघातील चंदगडमध्ये हा नवा फॉर्म्युला वापरून शरद पवार आणि अजित पवार गट एकत्रित निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ‘भाजपा’ची डोकेदुखी वाढणार असल्याचे दिसून येत आहे.

#### पालिकेत सत्ता मिळण्यासाठी प्रयत्नशील



राज्यात राष्ट्रवादी एकत्र आणण्यासाठी नवी यंत्रणा सुरु झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र स्थानिक पातळीवर याबाबत पक्षाचे कोणतेही आदेश नाहीत. सोलापूर शहरातील काही प्रभागांमध्ये ना.अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे प्राबल्य आहे. इतर पक्षातून आलेल्या नेत्यांचे आपापल्या प्रभागात वरचष्मा आहे. माजी नगरसेवक तथा गटनेता किसन जाधव आणि प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या प्रभागातील पूर्ण पॅनल निवडून आणण्याचा इरादा आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष संतोष पवार यांनी सांगितले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२६७

**सकळ तीर्थांचिये धुरे । जिये कां मातापितरे ।**
**तया सेवेशी कीर शरीरे । लोण कीजे**

आम्ही नित्य नियमाप्रमाणे दर गुरुवारी तसेच एकादशीला रात्री भजन करतो आणि दुसरे दिवशी व्दादशीला सकाळी महाप्रसादाचा कार्यक्रम करुन सर्व उपस्थितांना भोजनाचा प्रसाद द्यायचो. पुढे या भोजनाच्या कार्यक्रमाचा खर्च काही लोक एकट्या-एकट्याने करण्यास तयार झाले, अन् आम्ही त्यास आनंदाने मान्यता दिली. एक व्दादशी एका भक्ताकडे आली. त्यांनी ठरल्याप्रमाणे व्दादशीला सुमारे दोनशे लोकांसाठी महाप्रसाद तयार केला. आम्ही सर्व पंगतीला बसू लागलो.



मी म्हणालो, माऊली लवकर देवाला नैवद्य दाखवून या, म्हणजे प्रसाद घेता येईल. त्या माऊलींनी प्रसादाचे ताट भरुन घेतले व मागच्या खोलीत नेले. अवघ्या दोन मिनिटात बाहेर येऊन ते म्हणाले घ्या आता, देवाला नैवद्य दाखवले. आम्ही थोडे विचारात पडलो. ते माऊली खोलीच्या मागच्या दाराने जरी मंदिराला गेले तरी ते मंदिराला एवढ्या कमी वेळात जाऊन परत येणे शक्य नव्हते. म्हणून मीच त्यांना विचारले, ''अहो आत्ताच तर तुम्ही नैवद्याचे ताट भरुन घेतले अन् खोलीत जाऊन बाहेर आलात. मंदिराकडे तर गेल्याचे दिसलेही नाही. मग देवाला नैवद्य दाखवले कसे?'' ते हसत म्हणाले, माऊली या माझ्यासोबत मी दाखवतो तुम्हाला, देवाला नैवद्य दिलेले. मी त्यांच्यासोबत गेलो आणि पाहून आश्चर्यचकीत झालो. त्यांचे वृध्द मातापिता (सगुणरुप) एकमेकांशी बोलत महाप्रसाद सेवन करीत होते. ते नको म्हणत असतांनाही (निर्गुण भक्ती) मला न राहवल्याने मी त्यांची ही सगुण-निर्गुण भक्ती पंगतीतील सर्व भाविकांना मुद्दामहून सांगीतली. याप्रसंगी मला श्री ज्ञानेश्वर माऊलींची, ''**सकल तीर्थांचिये धुरे । जिये कां मातापितरे । तया सेवेशी कीर शरीरे । लोण कीजे** '', **ही ओवी आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा, ''मायबापें केवळ काशी । तेणें न वजावें तीर्थासी ।।, तुका म्हणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरुपें**'' हा अभंग चटकन् आठवला. सर्व तीर्थाहून श्रेष्ठ असणाऱ्या आईवडिलांच्या सेवेसाठी शरीराचे लोण उतरुन टाकणे ही सर्वश्रेष्ठ भक्ती म्हणणाऱ्या माऊलींचा आणि आईवडील हेच काशी असल्याने आईवडिलांची सेवा करणाऱ्यांना तीर्थक्षेत्राला जाण्याची गरज पडत नाही, तसेच आईवडील हेच सर्व देवांचे चालतेबोलते स्वरुप होत, असे सांगणाऱ्या तुकाराम महाराजांचा हा भक्तिमार्ग अवलंबणाऱ्याला ईश्वरभक्ती म्हणून वेगळ्याने काही करण्याची आवश्यकता नाही. जगाला ज्ञान देत फिरणारे किंवा ईश्वराचा शोध घेत फिरणारे किंवा केवळ दगडाधोंड्यात देव पाहणारे बरेच लोक या सोप्या व सरळ भक्तीपासून मात्र कोसो दूर असतात. म्हणूनच त्यांनाही खरे समाधान लाभत नाही आणि त्यांच्या आईवडिलांनाही ते समाधानाने राहू देत नाहीत. अशा लोकांमुळेच वृध्दांच्या समस्येत दिवसेंदिवस भर पडत आहे. वृध्दाश्रमात वृध्दांची संख्या वाढत आहे. काही ठिकाणी मुलं आईवडिलांना सोडून जात आहेत, तर काही ठिकाणी आईवडिलांना घर सोडून जाण्यास भाग पाडत आहेत. अशा लोकांच्या मोठेपणाला, पदाला, श्रीमंतीला किंवा अन्य कशालाही काही अर्थ उरत नाही, कारण यांच्याकडे कर्तव्य व जबाबदारीलाच स्थान नसल्याने यांच्या जीवनालाच अर्थ उरलेला नसतो. असो, आपण या माऊलींप्रमाणे आईवडिलांच्या सगुण व निर्गुण भक्तीच्या, आनंदाच्या डोहात तरंगू या. जय जय राम कृष्ण हरी।.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार
दि. १५ नोव्हेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - कार्तिक कृ. एकादशी (२६.३६)
ऋतु - हेमंत
नक्षत्र- उ. फाल्गुनी (२३.३३)
योग - विष्कंभ (३०.४५)
करण - बव (१३.३९)
....राहू काल....
शनिवार : स. ९ ते १०.३०

दिनविशेष - १९७१: इंटेल कंपनीने पहिले मायक्रोप्रोसेसर चीप ४००४ प्रकाशित केले.
१८८९: सचिन तेंडुलकरचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे पदार्पण.
१९९६: भारतीय शास्त्रज्ञ डॉ. त्रिलोकीनाथ खुशू यांना संयुक्त राष्ट्रांतर्फे सासाकावा पर्यावरण पुरस्कार जाहीर.
१९९९: रेवदंडाचे निरुपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांना प्रा. शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते शिवसनर्थ पुरस्कार प्रदान.

# जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या भरतीमध्ये स्थानिकांना संधी

## ७० टक्के जागा स्थानिक रहिवाशांसाठी ठेवाव्या लागणार राखीव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ नोव्हेंबर-**

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या भरती प्रक्रियेत आता स्थानिक भूमिपुत्रांना मोठी संधी मिळणार आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार, भरती प्रक्रियेतील ७० टक्के जागा स्थानिक रहिवाशांसाठी राखीव असतील.हा निर्णय सध्या सुरू असलेल्या भरती प्रक्रियेलाही लागू होणार आहे. यामुळे स्थानिक उमेदवारांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील.

भरतीची सर्व प्रक्रिया ऑनलाइन होणार असून, राज्यातील ३१ जिल्हा बँकांमध्ये होणारी भरतीची लेखी परीक्षा नियुक्त संस्थांद्वारे ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. लेखी परीक्षेनंतर पात्र उमेदवारांची तोंडी परीक्षा संबंधित बँकेच्या व्यवस्थापन मंडळातर्फे होणार आहे. नेतेमंडळी, संचालकांच्या हस्तक्षेपाला आळा बसणार आहे. भरती प्रक्रिया पारदर्शक होणार असल्याचे म्हटले जात आहे.

सहकार विभागाने घेतलेल्या निर्णयामुळे संबंधित जिल्ह्यातील नेतेमंडळी आणि बँकेच्या संचालकांच्या हस्तक्षेपाला आळा बसेल, असे म्हटले जात आहे. परंतु लेखी परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा ही बँकेचे व्यवस्थापन मंडळच घेणार आहे. त्यामुळे नेतेमंडळी, संचालकांच्या हस्तक्षेपाला आळा बसेल, असे म्हणता येणार नाही.

सहकार आयुक्तांनी दि.३१ ऑक्टोबर रोजी घेतलेला निर्णय भरतीची जाहिरात काढलेल्या बँकांनाही निर्णय लागू होणार आहे.

**जिल्हा सहकारी बँकांतील भरती प्रक्रिया पारदर्शक**

सरकारने प्रस्ताव मंजूर करून जिल्हा बँकांच्या भरती प्रक्रियेत ७०-३० चे प्रमाण मान्य केले आहे. हे प्रमाण सध्या भरती प्रक्रिया सुरू केलेल्या जिल्हा बँकांसाठीही लागू राहील. त्यामुळे जिल्हा सहकारी बँकांमधील भरती प्रक्रिया पारदर्शक होईल.

**नोकर भरतीसाठी तीन संस्था नियुक्त**

नोकर भरतीसाठी राज्य सरकारने आयबीपीएस, टीसीएस, एमकेसीएल या तीन संस्थांची नियुक्ती केली आहे. या संस्था उमेदवारांच्या लेखी परीक्षा घेणार आहे. तोंडी परीक्षा घेण्याचा अधिकार मात्र बँकेच्या व्यवस्थापनाकडेच राहील. लेखी आणि तोंडी परीक्षा नियुक्त संस्थेनेच घ्याव्यात, अशी मागणी होत आहे.

**राज्य सरकारचा उत्तम निर्णय**

राज्य सरकारने नेमलेल्या संस्थांनीच लेखीसह तोंडी परीक्षा घेऊन थेट पात्र उमेदवारांची यादी बँकांना सोपवावी. आता निर्णयानुसार पात्र संस्था केवळ लेखी परीक्षाच घेणार आहे. तोंडी परीक्षा घेण्याचे अधिकार सध्या बँकेकडेच आहे. प्रक्रिया आणखी पारदर्शक करायची असेल तर तोंडी परीक्षा घेण्याचेही अधिकार बँकांना नसावेत. राज्य सरकारी बँकेत भरतीची लेखी व तोंडी परीक्षा आयबीपीएस राबवीत आहे, असे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक ॲड.विद्याधर अनास्कर यांनी सांगितले.

**जिल्ह्यातील बेरोजगारांना मिळणार दिलासा**

सहकार आयुक्तांनी जिल्हा बँकांच्या भरती प्रक्रियेत स्थानिकांसाठी ७० टक्के, तर जिल्ह्याच्या बाहेरील रहिवासी उमेदवारांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्याचा प्रस्ताव सरकारला सादर केला. तो सरकारने मंजूर केला. त्यात ७० टक्के जागा स्थानिक भूमिपुत्रांसाठी राखीव राहील. शासनाचा हा धोरणात्मक निर्णय आहे, असे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रशासक कुंदन भोळे यांनी सांगितले.

## 'लोकमंगल'मध्ये प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ व दीक्षारंभ कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून म हाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन हे लाभले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लोकमंगल कृषीचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे व लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापनचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे हे लाभले होते. कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख अतिथी, सर्व प्राध्यापक आणि प्रथम वर्षातील विद्यार्थी प्रतिनिधींच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती मूर्ती पूजन करून करण्यात आली.



प्रास्ताविक नक्षत्रा कांबळे यांनी मांडले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक बॅग व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मिस फ्रेशर म्हणून सावरी बिराजदार व संघमित्रा शिंदे आणि मिस्टर फ्रेशर म्हणून अमोघवर्ष मोरे व मंदार कऱ्हाडे यांनी मान पटकाविला. सूत्रसंचालन मैथिली कोळी व नक्षत्रा कांबळे यांनी केले.

## सुवर्णा हजारे यांना इतिहास विषयात पीएच.डी पदवी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालय, पंढरपूर येथील इतिहास संशोधन केंद्राच्या विद्यार्थिनी सुवर्णा ज्ञानेश्वर हजारे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून इतिहास विषयातील पीएच. डी पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली आहे. त्यांचा संशोधन विषय 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ व महिला : एक चिकित्सक अभ्यास' असा होता. या संशोधनासाठी त्यांना महाविद्यालयाचे माजी इतिहास विभाग प्रमुख प्रो. डॉ. हणमंत लोंढे यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यापीठात पार पडलेल्या मौखिक परीक्षेच्या अध्यक्षस्थानी प्रो. डॉ. संजय गायकवाड हे होते, तर बाह्य परीक्षक म्हणून डी.आर. माने महाविद्यालय, कागल येथील इतिहास विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष जेठेथोर यांनी काम पाहिले.

या मौखिक परीक्षेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मिकांत दामा, पीएच.डी संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. एम. एस. रोकडे, उपकुलसचिव डॉ. उमराव मेटकरी, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. राजेंद्र वडजे, प्रा. डॉ. दत्तात्रय थोरात, प्रा. डॉ. रविराज कांबळे, प्राचार्य डॉ. तानाजी मगर, प्रो. डॉ. सुवर्णा गुंड, प्रा. डॉ. नागिन सर्वगोड, प्रा. डॉ. धनश्री कापशीकर, प्रा. हर्षश्री वाघमोडे, प्रा. फेमिदा जेठेथोर, प्रा. डॉ. नवनाथ पिसे, प्रा. डॉ. देवेंद्र मदने, प्रा. डॉ. उमेश माने, प्रा. डॉ. अनिल येडगे, डॉ. धनंजय रणदिवे आदींसह चाळीसहून अधिक मान्यवर उपस्थित होते. हजारे यांच्या संशोधन कार्यासाठी डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. शिवाजी वाघमोडे, डॉ. विष्णू वाघमारे, डॉ. सुशीलकुमार शिंदे, डॉ. नारायण लोखंडे, डॉ. दिलीप कोने, डॉ. स्वप्निल बुचडे, राजेश बाणदार, ॲड. अभिमान हाके, रघुराज मेटकरी यांनी सहकार्य केले.

## भगवान बाहुबली भगवंतांचा रविवारी महामस्तकाभिषेक सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

सोलापूर : विजापूर रोडवरील श्री १००८ भगवान बाहुबली दिगंबर जैन मंदिर येथे भगवान बाहुबली भगवंतांचा २२ वा महामस्तकाभिषेक व वार्षिक उत्सव रविवार दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती श्री भगवान बाहुबली जनकल्याण प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधीर पंडित यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मानस्तंभस्थित श्री. १००८ भगवान आदिनाथ, श्री १००८ भगवान मुनिसुव्रतनाथ, श्री १००८ भगवान पार्श्वनाथ आणि श्री. १००८ भगवान बाहुबली स्वामींच्या सातिशय महामूर्तीचा २२ वा महामस्तकाभिषेक आणि वार्षिकोत्सव र आयोजित केला आहे. वर्षातून एकदाच या मूर्तीचा महाम स्तकाभिषेक केला जातो. एरवी फक्त चरणांचाच अभिषेक होतो. रविवारी सकाळी १० वा. मंडप उद्घाटन निकिता व रोहन नितीन पंढरे (आष्टी) यांच्या हस्ते, ध्वजारोहण डॉ. प्रियांका व सूरज व्हसाळे, सोलापूर यांच्या हस्ते, बाहुबली फोटो अनावरण दीपाली व महावीर मोहोळकर सोलापूर यांच्या हस्ते होणार आहे. दीपप्रज्वलन डॉ. मिनल व नितीन पांढरे, सोलापूर यांच्या हस्ते करण्यात येईल. त्यानंतर ११ वाजता जिनबिंबाचा पंचामृत महामस्तकाभिषेक, महाशांतिमंत्र व पंचारती होईल. प्रतिवर्षाप्रमाणे मानाचा शाश्वत महामस्तकाभिषेक ज्योती व सुधीर बाहुबली (पंडित) परिवारातर्फे, मांगलिक कार्यक्रम माणिक उपाध्ये (पंडित) यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. महामस्तकाभिषेकानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमास सकल जैन बांधवांनी वेळेवर उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस अनिल माणिकशेटे, प्रा. डॉ. धीरज पंडित, राजेंद्र पाटील, अरुणकुमार धुमाळ उपस्थित होते.

## सोमवारपासून विज्ञान व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

मराठी विज्ञान परिषद आणि रोटरी क्लब सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ ते २२ नोव्हेंबर दरम्यान रोज सायंकाळी ५:४५ वाजता सोलापुरात गणपती घाटाजवळील सरस्वती मंदिर प्रशाला येथे विज्ञान व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती प्रा. व्यंकटेश गंभीर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दि. १७ नोव्हेंबर रोजी अत्याधुनिक भारतीय शास्त्रास्त्रे : संशोधन ते निर्यात या विषयावर निवृत्त शस्त्रास्त्र संशोधक काशिनाथ देवधर यांचे व्याख्यान होणार आहे. १८ नोव्हेंबर रोजी कोलंबस वाट का चुकला ? या विषयावर मर्चंट नेव्ही ऑफिसर कॅप्टन सुनील सुळे हे व्याख्यान देणार आहे. दि.१९ नोव्हेंबरला प्राध्यापिका डॉ. माधवी ठाकूर देसाई या असला प्रकाश नको रे बाबा या विषयावर मार्गदर्शन करणार आहे. दि.२० नोव्हेंबर रोजी ओएनजीसीचे निवृत्त महाव्यवस्थापक विद्याधर थाळणेकर यांचे भूगर्भातील पेट्रोलियम अन्वेषण ते उत्पादन : तंत्र आणि मंत्र या विषयावर व्याख्यान होणार आहे. दि. २१ नोव्हेंबर रोजी डेअरी आणि अन्नप्रक्रिया उद्योग - व्हॉल्वजच्या नाना तऱ्हा! संशोधन ते निर्यात या विषयावर प्रा. प्रमोद गायकवाड यांचे व्याख्यान होणार आहे. दि. २२ नोव्हेंबर रोजी डॉ. अंबा कुलकर्णी यांचे संस्कृत उपयोगी संगणक की संगणक उपयोगी संस्कृत या विषयावर व्याख्यान होईल.

# विद्यापीठाच्या अभियांत्रिकी व कायदा विभागाचा ठिसूळ कारभार

## नवीन इमारतींना लोकार्पणाचा मुहूर्त मिळेना






**विद्यापीठातून...**
**अजितकुमार संगवे**
**मो. 9881133103**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने राखीव वनक्षेत्र लगतच्या गट क्रमांक ३५६ व ३६५ मध्ये नवीन प्रशासकीय इमारत, भव्य स्मारक व खेलो इंडिया मल्टीपर्पज हॉल ही बांधकामे केली आहेत. परंतु त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने इको सेन्सिटीव्ह झोन सनियंत्रणच्या स्थानिक समितीची परवानगी घेतली नसल्याचे समोर आले. यात विद्यापीठाच्या अभियांत्रिकी व कायदा विभागाचाही ठिसूळ कारभार पुढे आला आहे. जागा ताब्यात मिळाल्यानंतर बांधकाम करण्यापूर्वी सर्व विभागाच्या परवानगी घेणे हे या अभियांत्रिकी विभागाचे काम आहे. तसेच न्यायालयात जाण्यापूर्वी कायदा विभागाने योग्य सल्ला देणे.

याकडे विद्यापीठ प्रशासनाने लक्ष दिले असते तर विद्यापीठावर ही नामुष्की आली नसती. याबाबत विद्यापीठाच्या अभियांत्रिकी, कायदा व वन विभागाकडून सत्यस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता असे कळते की, २००८-०९ या वर्षात विद्यापीठास ही जागा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून हस्तांतरित करण्यात आली. तेव्हा ही क्लिअर टायटल असलेली जागा होती. सातबारावर विद्यापीठाचे नाव होते. २०१९ पासून यावर बांधकाम सुरू झाले. तेव्हापासून या बांधकाम ावरील गट क्रमांक इको सेन्सिटिव्ह झोन असल्याचे वन विभागाने लक्षात आणून दिले. यासाठी सेन्सिटीव्ह झोन सनियंत्रणच्या स्थानिक समितीची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे वनविभागाने सांगितले. परंतु विद्यापीठाने परवानगी न घेता उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. विद्यापीठास मिळालेले प्रस्ताव जागेच्या लगतचे काही गट राखीव वनक्षेत्रातील आहेत. त्यासंदर्भात वनविभाग वनकायद्यानुसार कार्यवाही करेल, असा तत्कालीन सहाय्यक वनसंरक्षकांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात विद्यापीठाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. संबंधित विभागाची कायदेशीर परवानगी घ्यावी, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले. त्यामुळे विद्यापीठाला आता इको सेन्सिटीव्ह झोन सनियंत्रणच्या स्थानिक समितीच्या परवानगीचीच गरज आहे. त्यासाठी विद्यापीठ आता या समितीची परवानगी मिळविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. बांधकाम झालेले असल्यामुळे आता या समितीने राज्य शासनाकडे याचे मार्गदर्शन मागितले आहे. परंतु प्रत्यक्षात ही याचिका दाखल करण्याची जरुरी होती का? यासाठी कायदा विभागाने सल्ला दिला नाही का? अभियांत्रिकी विभागाने इको सेन्सिटीव्ह झोन सनियंत्रण स्थानिक समितीची परवानगी घेणे शक्य नव्हते का? हे तत्कालीन कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या प्रशासनातील अभियांत्रिकी व कायदा विभागाचे काम नव्हते का? हे सर्व प्रश्न अनुत्तरीतच आहेत. विद्यापीठाचे कायदा अधिकारी म्हणतात, परस्पर याचिका दाखल केली. इंजिनियर म्हणतात सातबारावर आमचे नाव असल्यामुळे परवानगीचा प्रश्नच नव्हता.

तत्कालीन कुलगुरू डॉ. फडणवीस यांनी केलेल्या चुकीच्या कामाची दुरुस्ती विद्यमान कुलगुरू प्रा.डॉ.प्रकाश महानवर करीत आहेत. ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. अंतर्गत रस्त्याचे कामही प्रगतीपथावर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते याचे लोकार्पण करण्याचा त्यांचा मानस आहे. यात त्यांना किती यश मिळेल, हे सर्व राज्य शासनाच्या परवानगीवर अवलंबून आहे.

**विद्यापीठाच्या सात इमारती उभारणार**

विद्यापीठाच्या या ४९२ एकर क्षेत्रातील उर्वरीत गट क्रमांक ३६६ व ३५७ मधील बांधकाम करण्यासाठी इको सेन्सिटीव्ह झोन सनियंत्रणच्या स्थानिक समितीने मंजूरी दिली आहे. या ठिकाणी विद्यापीठ सात इमारती उभारणार आहेत. प्रधानमंत्री उच्चतम शिक्षा अभियान अंतर्गत १०० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. पैकी ५५ कोटी रुपयांच्या निधीतून वाणिज्य व व्यवस्थापन, भाषा व वाङमय, ललित कला, जीव विज्ञान, करियर मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षा, महिला वसतिगृह व प्राध्यापक निवास या त्या सात इमारती उभारतील.

# स्पर्धात्मक गुणवत्ता आणि आर्थिक सक्षमता या निकषांवर साखर कारखान्यांचे होणार मूल्यमापन

### राज्य शासनाची सहकारी तसेच खासगी साखर कारखान्यांसाठी योजना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सोलापूर-**

राज्य सरकारने सहकारी तसेच खाजगी साखर कारखान्यांसाठी प्रोत्साहनपर योजना जाहीर केली आहे. याबाबतचा शासन निर्णय बुधवार (दि.१२) जारी करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत स्पर्धात्मक गुणवत्ता आणि आर्थिक सक्षमता या निकषांवर साखर कारखान्यांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. यामध्ये नऊ निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या साखर कारखान्यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने २०२५ आंतरराष्ट्रीय सहकार वर्षे जाहीर केले आहे. तसेच राज्यातील साखर कारखान्यांचा हरिक महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून राज्य सरकारने योजना जाहीर केली आहे. यामध्ये १०० टक्के एफआरपी वेळेवर देणाऱ्या कारखान्यांसह, साखर उतारा, प्रति हेक्टर ऊस उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, कमी कार्बन उत्सर्जन, जास्त कार्बन क्रेडीट्स, शासकीय कर्जाची वेळेवर परतफेड, लेखापरिक्षण व आर्थिक कार्यक्षमता, कर्मचारी व्यवस्थापन व वेतन अंमलबजावणी आदी गुणवत्ता निकष निश्चित करण्यात आले आहेत.

एफआरपीचे १०० टक्के वेळेवर पेमेंट- मागील ३ वर्षांत शेतकऱ्यांना वेळेवर व पूर्ण एफआरपी देणाऱ्या कारखान्यांना १५ गुण देण्यात येणार आहेत. इतर विभागातील कार्यक्षमता- प्रत्येक विभागासाठी २ गुण, एकूण १० गुण आहेत. साखर उतारा- उत्कृष्ट तांत्रिक आणि संचालन क्षमतेसाठी १० गुण आहेत. प्रति हेक्टर ऊस उत्पादन- शेतकऱ्यांच्या सहकार्याने उत्पादन वाढवणाऱ्या कारखान्यांना १० गुण देण्यात येणार आहेत.

तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता वापर- पीक निरीक्षण, उत्पन्न अंदाज, संसाधन व्यवस्थापनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणाऱ्या कारखान्यांना १० गुण निश्चित करण्यात आले आहेत. कमी कार्बन उत्सर्जन व जास्त कार्बन क्रेडिट्स- शाश्वत पद्धतींचा अवलंब करणाऱ्या कारखान्यांना १० गुण देण्यात येणार आहेत. तर शासकीय कर्जाची वळेवर परतफेड - वेळापत्रकाचे पालन करणाऱ्या आर्थिकदृष्ट्या सक्षम कारखान्यांना १० गुण तसेच लेखापरीक्षण आणि आर्थिक कार्यक्षमता- पारदर्शकता व स्वायत्त व्यवस्थापनासाठी ५ गुण आणि कर्मचारी व्यवस्थापन व वेतन अंमलबजावणीसाठी ५ गुण देण्यात येणार आहेत.

प्रोत्साहनपात्र कारखान्यांची निवड दोन स्तरांवरील समित्यांमार्फत केली जाईल, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

## रविवारी गीत संगीत मैफिलीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधून ऑर्केस्ट्रा स्टार म्युझिकल ग्रुपच्या वतीने रविवार दि. १६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सोलापुरातील आदर्श मंगल कार्यालय, डफरीन चौक येथे गीत संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती गायक निशांत तारानाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. या कार्यक्रमात गायक निशांत, मेघा, पिंटो, अविनाश, चैत्राली, अशोक, सुधाकर, नागेश हे जुनी व नवी गाणी सादर करणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल , राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, माजी नगरसेवक तौफिक शेख, प्रमोद भोसले आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या संगीत मैफिलीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तारानाईक यांनी केले.

या पत्रकार परिषदेस चैताली क्षीरसागर, सुधाकर मिरजकर आदी उपस्थित होते

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### वसंतदादा पाटील यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**



सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने माजी मुख्यमंत्री स्व. पद्मभूषण वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त सिव्हिल चौक येथील त्यांच्या पुतळ्यास विभागीय अधिकारी राघवेंद्र गायधनकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कामगार कल्याण जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे,कनिष्ठ अभियंता लायक मंनगोळी आदी मान्यवर उपस्थित होते.



### तालुकास्तरीय लोकनृत्य स्पर्धेत जि.प. शाळा अंत्रोळी द्वितीय

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांच्या वतीने घेण्यात आलेल्या दक्षिण सोलापूर तालुकास्तरीय लोकनृत्य स्पर्धेत जि प शाळा अंत्रोळीने छोट्या गटात द्वितीय क्रमांक मिळवला. विद्यार्थ्यांना कीर्ती जाधव, पुष्पा बनसोडे, मीनाक्षी राठोड यांचे मार्गदर्शन लाभले गटशिक्षण अधिकारी जयश्री सुतार, विस्तार अधिकारी गुरु बाळा सनके, आयुब कलबुर्गी, केंद्रप्रमुख आमसिद्ध म्हेत्रे, मुख्याध्यापक युवराज राठोड, श्रीरंग बनसोडे, नागनाथ म्हमाने यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### वंचित बहुजन आघाडीच्या बैठकीत अकोला पॅटर्न सोलापुरात राबवण्याचा ठराव

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर कमिटीची महत्त्वाची बैठक पार पडली. शहरातील राजकीय परिस्थिती, संघटनात्मक तयारी आणि निवडणूक धोरण यावर या बैठकीत चर्चा झाली. सोलापुरात अकोला पॅटर्न राबवण्याबाबत एकमताने ठराव करण्यात आला. सध्या शहरात या पॅटर्नची मोठी चर्चा असून, या निर्णयामुळे आगामी महापालिका निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीची रणनीती अधिक स्पष्ट होणार आहे. यावेळी शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, महिला अध्यक्ष पल्लवी सुरवसे, युवा अध्यक्ष महेश जाधव, महासचिव विनोद इंगळे, महासचिव संजय हरिजन, युवा महासचिव नरेंद्र शिंदे, युवा नेते अतिश बनसोडे, विक्रांत गायकवाड, श्रीनिवास संगेपाग, शहर संघटक गौतम थापटे, शाहिद शेख, गोटु शिंदे, ज्येष्ठ नेते शिवाजी बनसोडे, रवि थोरात, आशालता आव्हाड, उपाध्यक्ष रोहित लालसरे, विजयानंद उघडे, अमर डुरके, प्रदीप कांबळे, डॅनी सिल्वे उपस्थित होते.



### ठोकळ प्रशाला व महाविद्यालय जिल्हास्तरावरील शिक्षकांचे मार्गदर्शन

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर यांच्या मार्फत दिव्यांग विध्यार्थ्यांसाठी जिल्हा स्तरावरील विशेष शिक्षकांचे मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले. दिव्यांग विद्यार्थ्यांस नानासाहेब सुभाष पाटील जिल्हा समन्वयक समावेशक शिक्षण विभाग विशेष शिक्षक यांनी येथे आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करीत असताना दिव्यांग विद्यार्थ्यांना दिव्यांगाच्या असणारे प्रकार, दिव्यांग विद्यार्थ्यांचे वर्गीकरण कशा प्रकारे केले जाते, दिव्यांग विद्यार्थ्यांना कोणकोणते विशेष गरजा असतात, दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कोणकोणत्या सोयी उपलब्ध करून दिला गेल्या आहेत, शासनाने कोणकोणत्या सोयी आणि योजना या विद्यार्थ्यांसाठी राबवल्या आहेत, दिव्यांग कार्ड काढण्यासाठी काय करावे लागते इत्यादी गोष्टींची सखोल माहिती विद्यार्थ्यांना सरांनी दिली. तसेच विद्यार्थ्यांना असणाऱ्या अडचणी कोणत्या आहेत आणि त्या अडचणी जिल्हा समन्वय मार्फत कसे सोडवता येईल अशा सर्व गोष्टींचे मार्गदर्शन व्याख्यानात करण्यात आले. याविषयी विद्यार्थ्यांची प्रतिसाद घेण्यात आले. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेच्या मार्गदर्शनासाठी प्राचार्य डी. डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ यांनी शाळेचे कौतुक केले.

### भारत मराठी विद्यालयात बालदिन

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

मजरेवाडी परिसरातील भारत मराठी विद्यालयात बालदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यार्थीनी आल्फीया नदाफ होती. प्रारंभी अफान कुरेशी याने प्रास्ताविक करुन प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. यावेळी अब्दुल हिरापुरे, जैन मुजावर, सफवा शेख, फरहीन शेख, शबनम शेख, तमन्ना मकानदार यांनी नेहरुंविषयी मनोगत व्यक्त केले. सहशिक्षिका वाय.एम. देवणगांवकर यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अयान दर्जी याने केले तर आभार आलिशा शेख याने मानले.

# निमगावात 'स्वाभीमानी' ने रोखली ऊस वाहतूक

## ऊसाचे दर जाहीर न केल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १४ नोव्हेंबर-**

ऊस दरावरून माळशिरस तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली असुन कारखान्यांनी ऊसाच दर जाहीर करावा यासाठी तालुकाध्यक्ष अजित बोरकर यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या कार्यकर्त्यांनी १३ नोव्हेंबर रोजी दुपारी बारा वाजता पुणे-पंढरपूर व पिलीव-निमगाव या मार्गावरील ऊस वाहतुक अडवून वाहतूक बंद पाडली. जोपर्यंत साखर कारखाने ऊस दर जाहीर करीत नाहीत तोपर्यंत कारखान्याकडे ऊस वाहतूक होऊ देणार नसल्याचा इशारा यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने देण्यात आला.

माळशिरस तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी यंदाच्या गळीत हंगामात ऊस दर जाहीर न करताच कारखाने सुरू केले आहेत. ऊस दर जाहीर करुनच साखर कारखाने सुरू करावेत असे निवेदन स्वाभिमानी शेतकरी संघटनेने तालुक्यातील सर्व कारखान्यांस दिले होते. परंतू एकाही कारखान्याने ऊस दर जाहीर केला नाही. उलट चांगला दर देणार असे म्हणत शेतकऱ्यांची फसवणूक करीत गळीत हंगाम नेटाने सुरू केला आहे. त्यामुळे आंदोलन करत संघटनेने कारखान्याकडे जाणारी ऊस वाहतूक रोखून धरली.



पुणे-पंढरपूर व पिलीव-निमगाव दोन्ही रस्त्यांवर वाहतुकीची मोठी कोंडी झाली होती. राज्यातील सोलापूर जिल्हा सोडुन पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली या लगतच्या जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी पहीला हप्ता जाहीर करुनच गळीत हंगाम सुरू केला आहे. पण ज्या सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक ३८ साखर कारखाने आहेत. त्यापैकी एकाही कारखान्याने ऊस दर जाहीर केलाच नाही.

माळशिरस तालुक्यातील साखर कारखानदारांनी ताबडतोब ऊस दर जाहीर करावा अन्यथा ऊस वाहतूक तर रोखुच पण कारखान्याचे प्रवेशद्वारच बंद करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहु नये.

> सोलापूर जिल्ह्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांमुळेच सहकार चळवळ मोठी झाली आहे.या जिल्ह्यात कारखानदारीच्या जिवावर राजकारण सुरू आहे. कारखान्याच्या जीवावरच राजकारण सुरू आहे. इतर जिल्ह्यात कोणतेही प्रकल्प नसताना चांगला दर देतात मात्र या जिल्ह्यात खुप जुने कारखानदार सुद्धा चांगला दर देत नाहीत. या जिल्ह्यातील कारखानदारांनी ऊसाला ४ हजाराचा दर द्यायलाच पाहीजे.
>
> **-अजित बोरकर,**
> तालुका अध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना, माळशिरस.

## माढ्यातील चार तहसीलदार सुपुत्रांची उपजिल्हाधिकारीपदी नियुक्ती; अभिनंदनाचा वर्षाव

**तभा वृत्तसेवा,**
**माढा,दि.१४ नोव्हेंबर-**


प्रदिप उबाळे


किरण सुरवसे


गणेश शिंदे


गणेश मोरे

माढा तालुक्यातील चार सुपुत्रांची एकाच वेळी तहसीलदार ते उपजिल्हाधिकारीपदी नियुक्ती झाली आहे. त्यामुळे तालुक्यासाठी ही अभिमानाची बाब आहे. त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शासनाने नुकतीच तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना उपजिल्हाधिकारी पदावर पदोन्नती दिली आहे. त्यामध्ये तालुक्यातील चार सुपुत्रांना पदोन्नती मिळत ते उपजिल्हाधिकारीपदी नियुक्त झाले आहेत.

यामध्ये वेताळवाडीचे सुपुत्र तथा हवेली येथे तहसीलदार म्हणून कार्यरत असलेले किरण सुरवसे यांची पदोन्नतीने सोलापूर येथे उपजिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. ते २००४ साली नायब तहसीलदार म्हणून प्रशासनात रूजू झाले. त्यांनी आतापर्यंत रायगड, ठाणे व पुणे जिल्ह्यात सेवा बजावली आहे. तर दारफळ सीना येथील सुपूत्र प्रदीप उबाळे, जे कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात तहसीलदार म्हणून कार्यरत होते, त्यांची नागपूर येथे भूसंपादन उपजिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते २०१४ साली राज्यसेवेतून तहसीलदार म्हणून उत्तीर्ण झाले. बारामती येथे तहसीलदार म्हणून कार्यरत निमगाव (टे) चे सुपुत्र गणेश शिंदे यांची धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथे प्रांतधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यांनी २००७ साली राज्यसेवेत नायब तहसीलदार म्हणून प्रवेश केला होता आणि विदर्भ, सांगली, बारामती या ठिकाणी उल्लेखनीय सेवा बजावली आहे. तर लऊळ गावाचे सुपुत्र तथा गगनबावडा येथे तहसीलदार म्हणून कार्यरत गणेश गोरे यांची पालघर येथे निवडणूक उपजिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते २००३ साली नायब तहसीलदार म्हणून सेवेत रुजू झाले.



## संघप्रचारक तात्या जोगळेकर व भाऊराव पाटील यांच्या 'पत्थर पायातील' पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ नोव्हेंबर-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक तात्या जोगळेकर व भाऊराव पाटील या प्रचारकांनी सोशल मिडीयावर प्रसारीत केलेल्या पत्थर पायातील या गोमंतक संवर्धन संस्था व प्रबोधन शिक्षण संस्थेने तयार केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर व गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.

पर्वरी (गोवा) येथे हा कार्यक्रम थाटात संपन्न झाला. पद्मश्री रमेश पतंगे यांनी पुस्तकाचा परिचय करून दिला. ज्येष्ठ प्रचारक श्री.जोगळेकर व श्री. पाटील यांनी गेले वर्षभर (५० आठवडे) दर सोमवारी व गुरुवारी युट्युबवर मीडिया विद्याच्या माध्यमातून 'संघव्रती कार्यकर्त्यांची जीवनगाथा, शंभर प्रचारकांची जीवने, पत्थर पायातील' याचे प्रसारण केले होते. त्याचे पुस्तक तयार करण्यात आले. या पुस्तकाचे थाटात प्रकाशन झाले. ही पुस्तके प्रकाशनासाठी पालखीतून दिंडीद्वारे आणण्यात आली. आगळ्यावेगळ्या व नेहमीसाठी लक्षात राहील अशा पद्धतीने पुस्तकाचे विमोचन झाले.

### दारू अड्डयावर झोपला तो उठलाच नाही

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

शितल नगर येथील रवी साळुंखे याच्या दारू अड्डयावर झोपलेल्या एका तरुणाचा मृत्यू झाला. रामू उच्चप्पा कांबळे (वय-३३, रा.अमर नगर, सोरेगाव, सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे.

१४ नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास रामू कांबळे हा शितल नगर येथील रवी साळुंखे याच्या दारू अड्डयावर झोपला होता. नातेवाईकांनी दुपारी त्यास उठविण्याचा प्रयत्न केला असता तो उठलाच नाही. बेशुध्दावस्थेत उपचारासाठी त्यास शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉ. अक्षय इमडे यांनी रामू यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## शहरातील विविध २० भागांत आजोरा हटाव मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिकेच्या वतीने शहरातील २० ठिकाणी रस्त्यावर पडलेला आजोरा व बांधकाम अवशेष हटविण्याची मोठी मोहीम राबविण्यात आली. १० जेसीबी, १२ डंपर अशी मोठी यंत्रसामग्री वापरण्यात आली. दिवसभरात एकूण ७३ खेपा करून आजोरा व कचरा हटविण्यात आला.

सोलापूर सुंदर सोलापूर मोहिमेअंतर्गत सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार व अतिरिक्त आयुक्त विणा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आज शहरातील अनेक भागांत रस्त्यावर पडलेला आजोरा व बांधकाम अवशेष हटविण्याची मोठी मोहीम राबविण्यात आली.



या मोहिमेत बोरामणी नाका, दयानंद महाविद्यालय परिसर, होमकर नगर, हिप्परगा, हवामान केंद्र, शांती नगर, मौलाना आझाद चौक, आयएमएस शाळा रोड, कुमठेकर हॉस्पिटल बंधनल मठ मार्ग, धर्मवीर संभाजी महाराज तलाव (कंबर) मैदान, अशोक नगर, शासकीय मैदान परिसर, अमृतनगर बेघर सोसायटी, सोशल कॉलेज रोड, डॉ. फडकुले सभागृह, मसीहा चौक ,वांगी रोड व शानदार चौक लेप्रसी कॉलनी रोड या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आजोरा उचलण्यात आला. या कामासाठी महानगरपालिकेकडून १० जेसीबी, १२ डंपर अशी मोठी यंत्रसामग्री वापरण्यात आली. दिवसभरात एकूण ७३ खेपा करून मोठ्या प्रमाणात आजोरा व कचरा हटविण्यात आला.

> **सार्वजनिक जागेत आजोरा, बांधकाम कचरा टाकू नये : वीणा पवार**
>
> या उपक्रमामुळे संबंधित परिसरांतील रस्ते व सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ झाली असून नागरिकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले. महानगरपालिकेने नागरिकांना सार्वजनिक जागेत आजोरा किंवा बांधकाम कचरा न टाकण्याचे आवाहन महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी केले आहे.

## जीवनात मानवतेशिवाय काहीच होऊ शकत नाही याची प्रचिती रामेश्वरमध्ये आली : सुनील शास्त्री

### विश्वधर्मी रामेश्वर (रूई) येथे 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना'चे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १४ नोव्हेंबर-**

जीवनात मानवतेशिवाय काहीच होऊ शकत नाही याची प्रचिती आपल्याला विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांचे मानवतेसंबंधीचे महान कार्य पाहून रामेश्वरमध्ये आली, असे प्रतिपादन भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांचे सुपूत्र, माजी खासदार सुनील शास्त्री यांनी केले. जगाला एका सूत्रात ठेवायचे असेल तर मानवता आवश्यक आहे. प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या रुपाने मानवतेची ज्योत पेटविण्यात आली असून ती संपूर्ण जगाच्या कल्याणासाठीची असल्याचे विचारही त्यांनी व्यक्त केले.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर (रूई) यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनाचे' लोकर्पण लातूर जिल्ह्यातील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रूई) या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुनील शास्त्री बोलत होते. सत्य, शांती, अहिंसा, प्रेम आणि मानवतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या, मानवी इतिहासातील काही उत्तुंग व पथदर्शी व्यक्तिमत्वांच्या चैतन्यदायी प्रतिकांची या ठिकाणी प्रतिष्ठापना, पूजन आणि कोनशिलेचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मानवतेची ज्योत प्रज्वलत ठेवणारे डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचा विशेष सत्कार जपान येथून आलेले इसो कोईतोमियो व पेजावर मठाच्या वतीने करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर होते. तसेच या वास्तूचे संकल्पक, संरचना, नियोजक व निर्मितीकार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, रॅम मंदिर न्यासाचे माजी कार्याध्यक्ष आचार्य डॉ. रामविलास वेदांती हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आमदार रमेश कराड, माईर्स एमआयटीचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल वि. कराड, डॉ. मंगेश तु. कराड, हभप तुळशीराम दा. कराड, प्रगतिशील शेतकरी हभप काशीराम दा. कराड, रामेश्वर (रूई) चे सरपंच सचिन कराड व राजेश कराड यांचीही यावेळी उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप डॉ.विजय भटकर यांनी केले. आपल्या भावना व्यक्त करताना प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, संपूर्ण जगाला विश्वशांती आणि विश्व कल्याणाचा संदेश विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनातून जाईल. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत देशाचे खरे रुप रामेश्वर येथे दिसून येते आहे. हा मानवता भवनच संपूर्ण जगाची दिशा दर्शविणारा आहे. येथून भारतीय चिंतन, परंपरेचा संदेश विश्वात पोहचणार असून सर्वांनी त्याचे अनुकरण करावे. भगवान गौतम बुद्धांचे पंचशील आणि संत ज्ञानेश्वर माऊली यांचे पसायदान हे मानव उध्दारासाठी आहे. डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांनी संस्थेच्या माध्यमातून डॉ. वि.दा. कराड यांनी माइलस्टोन कार्य केले आहे. विश्व शांती हेच या संस्थेचे लक्ष्य असून त्या आधारेच मानवतातीर्थ भवनाची निर्मिती झाली. या भवनातूनच संपूर्ण जगात लोकशाही बळकट करणे, अध्यात्म आणि खिलाडूवृत्ती रूजविणे या तीन गोष्टीं साकार होतील, असे सांगितले. यावेळी फादर फेलिक्स मचाडो, राहुल भन्ते बोधी, एडीसन सामराज, डॉ. मेहर मास्टर मूस, इझिकेल मळेकर, सरदार सुरजीत सिंह खालसा, डॉ. फिरोज बख्त अहमद, डॉ. लेसन आझादी, योगी अमरनाथ, मौलाना अन्सारी चतुर्वेदी, महंत रामदास, बि.के. बिन्नी सरीन, कमलाताई गवई, पुष्पा बोंडे, मायकेल गनेल, इंद्रजीत भालेराव या सर्वांनी डॉ. कराड यांच्या विश्वशांती कार्याला हातभार लावण्याचे आश्वासन दिले. माजी केंद्रीय मंत्री डॉ. करण सिंग, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर आणि अमेरिकेतून डॉ. अशोक जोशी यांनी व्हिडीओच्या माध्यमातून संदेश दिला. यावेळी लेखक लक्ष्मण घुगे लिखित विश्वशांतीची महागाथा या कादंबरीचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते झाले. तसेच वास्तू रचनाकार विभीषण शेप यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. मिलिंद पात्रे यांनी ओमकार ध्यान साधना केली. डॉ. मंगेश तु. कराड यांनी स्वागतपर भाषण केले. डॉ. गौतम बापट व प्रा.अतुल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. सुचित्रा कराड-नागरे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

> **डॉ. विश्वनाथ कराडांना 'भारतरत्न' ने सन्मानित केले जावे : आचार्य डॉ. रामविलास वेदांती**
>
> या सोहळ्यात आपले मनोगत व्यक्त करताना राम मंदिर न्यासाचे माजी कार्याध्यक्ष आचार्य डॉ. रामविलास वेदांती यांनी संपूर्ण जगात मानवतेसाठी एवढे महान कार्य डॉ. विश्वनाथ कराडांशिवाय अन्य कोणीही केले नसल्याचे सांगितले. समाजातील सर्व जाती - धर्म - पंथांच्या मंडळींना एकत्रित आणण्याचे काम त्यांनी अतिशय लिलया केले आहे. सर्वधर्मियांना एकत्रित आणणारा हा महात्मा असल्याचे सांगून अशा महात्म्यास भारत सरकारने ' भारतरत्न ' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करावे, अशी अपेक्षाही आचार्य डॉ. रामविलास वेदांती यांनी वयकत केली. शिक्षण क्षेत्रात एमआयटीसारखे विद्यापीठ देशात दुसरे नाही. जे चित्र आपल्याला दि. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत पाहायला मिळाले , तेच चित्र आज लातूर जिल्ह्यातील रामेश्वर येथे पाहायला मिळाल्याचे त्यांनी बोलून दाखविले. संपूर्ण जगात असे कार्य कोणीही केले नाही ते डॉ. कराडांनी केले आहे.समाजाच्या प्रत्येक धर्माच्या दिग्गजांना एकत्रित आणण्याचे कार्य कराड यांनी केले आहे. सामाजिक सदभावनेचे , एकतेचे दृश्य येथे पाहायला मिळाले. अयोध्येतही हेच चित्र पाहायला मिळायचे. पंतप्रधान मोदींनी राम मंदिराची निर्मिती केली, त्याप्रमाणे डॉ. विश्वनाथ कराड यांनी मानवता तीर्थाची निर्मिती केली आहे. त्यामुळे देशातील संपूर्ण महात्म्यांच्या, सर्व संप्रदायाच्या वतीने आपण डॉ. विश्वनाथ कराड यांना धन्यवाद देतो,असेही डॉ. वेदांती यांनी बोलून दाखविले.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सांगोला नगरपरिषद; शुक्रवारी १७ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १४ नोव्हेंबर-**

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ साठी सोमवार दि.१० नोव्हेंबर पासून नाम निर्देशन पत्रे स्वीकारण्यासाठी सुरुवात झाली असून शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर अखेर अध्यक्षपदासाठी एकही नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले नाही.

परंतु सदस्यपदासाठी ७ प्रभागातून १७ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी दिली. शुक्रवारी सदस्यपदासाठी प्राप्त नामनिर्देशनपत्र यामध्ये प्रभाग क्र.२ अ-(अनू.जाती) २ अर्ज, प्रभाग क्र.३ अ- (अनु.जाती.महिला) २ अर्ज, प्रभाग क्र.४ अ-(सर्व.महिला) ३ अर्ज, ४ ब-(सर्वसाधारण) ३ अर्ज, प्रभाग क्र.६ ब-(सर्वसाधारण) २ अर्ज, प्रभाग क्र.७ अ-(ना.मा.प्र) १ अर्ज, ७ ब-(सर्वसाधारण महिला) १ अर्ज, प्रभाग क्र.८ ब-( सर्वसाधारण) १ अर्ज, प्रभाग क्र.९ अ-(ना.मा.प्र) २ अर्ज दाखल करण्यात आले असून यामध्ये एकूण ११ पुरुष उमेदवार व ६ महिला उमेदवार यांनी अर्ज दाखल केला आहे अशी माहिती सहा.निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी दिली.



### महत्त्वाचे



## मंगळवेढा नगरपालिका केंद्राच्या केंद्र समन्वयकपदी गंगाधर कोळी

**मंगळवेढा दि. १४ नोव्हेंबर-**

नगरपालिका शिक्षण मंडळ, मंगळवेढा संचलित कै. नानासाहेब नागणे प्रशाला न.पा. मुला-मुलींची शाळा नं. ४ नागणेवाडी, मंगळवेढाचे पदसिद्ध मुख्याध्यापक गंगाधर कोळी यांची मंगळवेढा नगरपालिका केंद्राच्या केंद्रसमन्वयकपदी निवड करण्यात आली. मंगळवेढा नगरपालिका केंद्रामध्ये नगरपालिका, खासगी, अनुदानित, विनाअनुदानित तसेच स्वयंअर्थसहायता अशा शाळांचा समावेश होतो. या सर्व शाळा व प्रशासन यांचा उत्तम समन्वय साधण्याच्या दृष्टीने मंगळवेढा नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी बिभीषण रणदिवे यांनी गंगाधर कोळी यांची केंद्रसमन्वयकपदी नियुक्ती केल्याचे पत्र कार्यालयामार्फत पाठवण्यात आले.




## चाँद तारा उर्दू शाळेत बालदिवस साजरा

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

फिरदोस महिला शिक्षण व समाज सेवा संस्था संचलित चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळा सोलापूर या शाळेत भारताचे प्रथम पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बाल दिवस साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीचे संचालक मो. इक्बाल बागबान होते तर अध्यक्षस्थानी डॉ. जन्नत बागबान व प्रमुख उपस्थिती म्हणून हाजी बशीर अहमद बागबान उपस्थित होते तसेच आज संस्थेच्या अध्यक्षा डॉ. जन्नत बागबान यांचाही वाढदिवस होता म्हणून सर्व शिक्षकांतर्फे त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात डॉ. जन्नत बागबान यांनी विद्यार्थ्यांना बालदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व शिक्षकांना आपल्या शाळेत चांगल्या शिक्षणाबरोबर ऐतेहासिक थोर व्यक्तींचेही माहिती विद्यार्थ्यांना सांगावे असे आवाहन केले व चांगल्या प्रकारे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण केल्याबद्दल अभिनंदन केले. यावेळी शाळेच्यावतीने बालदिवसानिमित्त वेगवेगळे सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी समूह गीत, वक्तृत्व स्पर्धा व गांधी परिवारातील सर्व सदस्यांचे पोषख परिधान करून गांधी परिवाराची ओळख विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बागबान नाहिद सुल्ताना व चौधरी यास्मीन या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाफिया शेख व आभार खतिब उम्मे हबीबा यांनी मानले.



## एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये बालदिन साजरा

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका रेखा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बालदिनानिमित्त शाळेत विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात गाणी, नृत्य आणि मनोरंजक खेळांनी झाली. विद्यार्थ्यांनी प्रत्येक उपक्रमात उत्साहाने सहभाग घेत आपली कलागुणांची चमक दाखवली. कथाकथन सत्रे आणि वर्गनिहाय उपक्रमांनी विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला. प्राथमिकच्या विद्यार्थ्यांचा फॅन्सी ड्रेस शो कार्यक्रमाचे खास आकर्षण होते. अनेक विद्यार्थी कार्टून पात्रे, परी, राण्या, रंगीबेरंगी काल्पनिक पात्रे आणि विविध थीमवरील पोशाखात सजून आले होते. प्रत्येक विद्यार्थ्याने आपले पात्र सादर करत आत्म विश्वासाने अभिनय केला. त्यांच्या वेशभूषा आणि शिक्षकांनी नृत्य सादर करत कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

## खेळताना गरम पाण्याच्या बादलीत पडून २ वर्षाचा बालक जखमी

**सोलापूर, दि. १४ नोव्हेंबर-**

घरी खेळताना गरम पाण्याच्या बादलीत पडून २ वर्षाचा बालक जखमी झाला. मु. यजदान इम्तियाज शेख (रा.चाँदतारा मस्जिद, २ नंबर झोपडपट्टी, विजापूर नाका, सोलापूर) असे जखमी बालकाचे नाव आहे. १४ नोव्हेंबर रोजी तो सकाळी घरी खेळत असताना गरम पाण्याने भरलेल्या बादलीमध्ये पडल्याने त्याच्या हातास भाजून जखमी झाला. त्यामुळे त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# पंढरपुरात एक हजार ४२५ दुबार मतदार; दुबार मतदारांना द्यावे लागणार हमीपत्र

- सहाय्यक निवडणूक अधिकारी महेश रोकडे
- पंढरपूर न.पा. क्षेत्रातील दुबार मतदारांचे हमीपत्र घेण्याची कार्यवाही सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी मतदार याद्यांमधील दुबार नावांची तपासणी करून योग्य ती दक्षता घेवून कार्यवाही करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.



पंढरपूर नगरपालिका क्षेत्रात एक हजार ३७९ दुबार मतदार तर ४६ तिबार मतदार असे एक हजार ४२५ दुबार/तिबार मतदार असून, निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार या सर्व मतदारांकडून कोणत्या प्रभागातील मतदान केंद्रांवर मतदान करणार याबाबतचे हमी पत्र घेण्यात येणार आहे. अशी माहिती सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली. पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता दि.३१ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या मतदार यादीमध्ये १८ प्रभागातील दोन हजार ८२७ ठिकाणी एक हजार ४२५ दुबार / तिबार मतदार नोंद झालेली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये एकापेक्षा जास्त वेळा नाव असलेला मतदार हा प्रत्यक्षात एकच व्यक्ती आहे. याची खात्री झाल्यानंतर त्या मतदाराकडून तो नेमका कोणत्या प्रभागातील मतदार केंद्रावर मतदान करणार आहे. या बाबतचे हमीपत्र मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेकडून घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

**दुबार मतदारांना एकाच प्रभागात मतदार करता येणार :** दुबार मतदारांना विचारात घेऊन त्यांच्या पसंतीने एकाच प्रभागात मतदान करता येणार आहे. दुबार मतदार नोंदीची माहिती प्रत्येक मतदान केंद्रावर उपलब्ध केली जाणार आहे. संबंधित मतदार एकापेक्षा अधिक मतदान केंद्रावर मतदान करणार नाही, याची काळजी घेण्यात येणार आहे. संभाव्य दुबार नाव असलेल्या मतदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यास असा मतदार मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी आल्यास त्या मतदाराकडून त्याचे नाव असलेल्या इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात येईल. अशा मतदाराची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच त्याला मतदान करण्याची मुभा देण्यात येईल असेही सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

## भाजपने निष्ठावंतांना उमेदवारी न दिल्यास बंडखोरी करणार

### निष्ठावतांच्या उमेदवारी बाबत आ. समाधान आवताडेंनी पक्षाकडे मागणी करण्याचा दिला शब्द

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ नोव्हेंबर -**

येत्या नगरपालिका निवडणूकी मध्ये भाजपा मधून जुन्या निष्ठावंतांना उमेदवारी मिळावी अशी आग्रही मागणी जुन्या भाजपा मधील निष्ठावंतांकडून करण्यात आली आहे. या संदर्भात गुरुवारी या मंडळींनी बैठक आयोजित केलेली होती. या बैठकीस आमदार समाधान आवताडे यांनी देखील उपस्थिती लावलेली होती. दरम्यान जर भाजपाकडून जुन्या निष्ठावतांना उमेदवारी डावलली गेली तर बंडखोरी करण्याचा इशारा देखील या मंडळींकडून देण्यात आला आहे.

पंढरपूर नगरपालिका निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने भाजपच्या जुन्या प्रमुख निष्ठावंत कार्यकर्त्यांची बैठक गुरुवारी (ता.१३) येथील बाबासाहेब बडवे यांच्या निवासस्थानी पार पडली. यामध्ये मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीस पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे विद्यमान आमदार समाधान आवताडे यांच्या






प्रमुख उपस्थितीत पंढरपूर शहरासाठी एकूण १५ कार्यकर्त्यांनी उमेदवारीसाठी अधिकृत पक्षाच्या चिन्हावर (कमळ) निवडणूक लढविण्यासाठी रितसर मागणी केली.

दरम्यान या बैठकीत आमदार समाधान आवताडे यांनी आपली भूमिका पक्षासमोर ठेवून जास्तीत जास्त उमेदवारांना (जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना) उमेदवारीसाठी पक्ष नेतृत्वाकड आग्रही मागणी करून प्रयत्न करू असा ठाम विश्वास या बैठकीत व्यक्त केला. जर निष्ठावंतांना उमेदवारी मिळाली नाही तर बंडखोरी करण्याचा इशारा यावेळी अनेकांनी व्यक्त केला. बैठकीस पंढरपूर शहरातील जुने निष्ठावंत कार्यकर्ते माजी शहराध्यक्ष दत्तासिंह राजपूत, उमेश वाघोलीकर, बाबासाहेब बडवे, काशिनाथ थिटे, सुरेशराव खिस्ते, शिरीष कटेकर, वालचंद जामदार-गुजराथी, शाम तापडिया, शकुंतला नडगिरे, रेखाताई कुलकर्णी, अपर्णा तारके, शशिकांत सुगंधी, विदुल अधटराव, आदित्य जोशी, आण्णा धोत्रे, अनुप देवधर, गिरीष आराध्ये, सुरेंद्र कवठेकर, डॉ. शशिकांत धायतडक, विकास शिंदे, अरूण पिंपळनेरकर, संजय पालकर, नितीन करंडे, कैलास कारंडे, बापू लिगाडे, सौरभ थिटे, धनंजय बडवे, वरदसिंह राजपूत, गोलू लखेरी यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## पंढरपूर नगरपरिषदेसाठी शुक्रवारी दहा अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ नोव्हेंबर -**

पंढरपूर नगरपरिषदेसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या पाचव्या दिवशी गुरुवारी दहा अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

शुक्रवारी (दि.१४) प्रभाग ११ अ मधुन आरती बळीराम बनसोडे, प्रभाग ८ ब मधुन नितीन पद्मकुमार गांधी, प्रभाग १६ ब मधुन प्रमिला अरुण कबाडे (राष्ट्रवादी श.प.), प्रभाग १० ब मधुन वैभव शहाजी भोसले, प्रभाग १३ ब मधुन शाम प्रभु गोगाव (तिर्थक्षेत्र विकास आघाडी), प्रभाग १ अ मधुन अर्जुन संतोष धोत्रे, प्रभाग १ ब मधुन सुरेखा भारत धोत्रे, प्रभाग १ ब मधुन सुरेखा भारत धोत्रे (भाजपा), प्रभाग १७ ब मधुन प्रिती विशाल कदम, प्रभाग ३ ब मधुन संदीप अशोक शिंदे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी) असे एकुण १० नामनिर्देशन पत्र दाखल झाले आहेत. १७ नोव्हेंबर पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. दरम्यान गुरुवार पर्यंत आदित्य चंद्रकलेश्वर फत्तेपूरकर, रुक्मिणी धनाजी धोत्रे, प्रभाग क्रमांक २ अ मधून अमित अशोक डोंबे, व २ ब मधून अदिती अमित डोंबे, प्रभाग ११ ब मधुन गौतम काशिनाथ गाजरे, प्रभाग ११ ब मधुन प्रशांत शिवाजी मलपे असे गुरुवारपर्यंत सहा तर एकुण १६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

## मंगळवेढ्यात आठ अर्ज दाखल; नगराध्यक्षपदासाठी एकच अर्ज

### मतदारांमध्ये उत्सुकता वाढली

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १४ नोव्हेंबर-**

मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीत अर्ज दाखल करण्याच्या पाचव्या दिवशी नगरसेवकपदासाठी ८ तर नगराध्यक्षपदासाठी एकच अर्ज दाखल झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.

मंगळवेढ्यात २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी १७ नोव्हेंबर अखेर उमेदवारांना अर्ज दाखल करता येणार असून, २६ नोव्हेंबर अर्ज माघारीची तारीख आहे. नगराध्यक्षपदासाठी राजश्री राजकुमार चेळेकर यांनी अपक्ष अर्ज भरला आहे. सोमवारपासून (१० नोव्हेंबर) अर्ज दाखल करण्यास सुरूवात झाली. मात्र, आमदार समाधान आवताडे, अनिल सावंत, राहुल शहा, समविचारी आघाडी आदी पक्षगटांमध्ये उमेदवारांबाबत अंतिम निर्णय न झाल्याने पहिल्या दोन दिवसांत (१० व ११ नोव्हेंबर) अर्ज दाखल प्रक्रियेला प्रतिसाद मिळाला नाही. तिसऱ्या दिवशी काही उमेदवारांनी अर्ज सादर केले. आज नगराध्यक्षपदासाठी एक अर्ज दाखल झाला तर नगरसेवक पदासाठी ८ अर्ज दाखल झाले. नगरसेवकपदासाठी शरद पवार गट राष्ट्रवादी वतीने प्रभाग १ मधून संतोष रामदास नागणे, भाजप कडून प्रभाग २ मधून समाधान दत्तात्रय हेंबाडे व प्रभाग ८ मधून शोभा शरद हजारे यांनी तर प्रभाग ५ मधून अनुपमा कपिल हजारे यांनी अर्ज दाखल केला आहे. तर अपक्ष म्हणून निकिता प्रतीक खंदारे व रेखा प्रकाश खंदारे यांनी प्रभाग ३ मधून अर्ज दाखल केला आहे. दुसरीकडे प्रभाग ७ मधून सोमनाथ महादेव माळी व प्रभाग १० मधून सीमा सोमनाथ बुरजे यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. राज्य निवडणूक आयोगाने शनिवारी उमेदवारांना अर्ज दाखल करण्यास परवानगी दिलेली आहे. यामुळे आता शनिवार (१५ नाव्हेंबर) आणि सोमवार (१७ नोव्हेंबर) असे दोन दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे या दोन दिवसांत उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे.

## श्रीपूरच्या कर्मयोगी कारखान्यातील १ लाख १११व्या साखर पोत्याचे पूजन

### प्रशिक्षणार्थी १२ आय.ए.एस. अधिकाऱ्यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.१४ नोव्हेंबर-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या चालु गळीत हंगामातील उत्पादीत १ लाख १११ व्या साखर पोत्याचे पूजन चेअरमन प्रशांत परिचारक यांच्या हस्ते झाले. यावेळी व्हा. चेअरमन कैलासराव खुळे, सर्व संचालक व कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी याचबरोबर विविध राज्यातील प्रशिक्षणार्थी १२ आय.ए.एस. अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रशिक्षणार्थी आय.ए.एस. अधिकाऱ्यांचा कारखान्यातर्फे चेअरमन श्री.परिचारक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी परिचारक म्हणाले, प्रतिदिन दहा हजार मे.टन गाळप करणार असून ऊस तोडणी वेळेकर मिळणार आहे. या हंगामान कारखान्याने १२ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून ते पूर्ण होईल असा विश्वास व्यक्त करून कारखान्याने नेहमीच शेतकरी व कामगारांचे हित डोळ्यासमोर



ठेवून वाटचाल केली असल्याचे सांगितले. कार्यकारी संचालक डॉ. कुलकर्णी म्हणाले, कारखान्याच्या गाळप क्षमतेत वाढ झालेने १२ दिवसात कारखान्याने १ लाख १५ हजार ४८४ मे.टन गाळप केले असून १ लाख १११ साखर पोती उत्पादन झाली आहेत तर सरासरी साखर उतारा ९.३२ टक्के मिळाला आहे. आसवानी प्रकल्पामधून ८ लाख ६४ हजार २८२ लि.इथेनॉल उत्पादन झाले आहे. को-जन प्रकल्पामधून ८५.५२ लाख युनिट वीज निर्मीती झाली असून ४६.७० लाख युनिट वीज एक्स्पोर्ट केली असल्याचे सांगितले. यावेळी संचालक दिनकरराव मोरे, उमेशराव परिचारक, दिलीपराव चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, हणमंत कदम सुदाम मोरे विजय जाधव, किसन सरवदे, शामराव साळुंखे, राणू पाटील, तज्ञ संचालक दाजी पाटील, दिलीप गुरव आदी उपस्थित होते.

**१२ आयएआय प्रशिक्षणार्थींची भेट**

आयएएस पास झालेले विविध राज्यातील प्रशिक्षणार्थींनी कारखान्यास भेट दिली. त्याचवेळी १ लाख १११ साखर पोतीपूजन कार्यक्रम होता. चेअरमन परिचारक यांनी त्यांचा सत्कार केला. तर कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी कारखान्यातील प्रकल्पांची माहिती तसेच देश व आंतरराष्ट्रीय पातळीवरील साखर उद्योगाची सद्य स्थितीची माहिती देवून त्यांना अवगत केले.

## बिहार विधानसभेच्या निकालानंतर पंढरपुरात भाजपाच्यावतीने जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ नोव्हेंबर-**

बिहार राज्याच्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप आणि आघाडीने घेतलेल्या घवघवीत यशा नंतर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये भारतीय जनता पार्टीचे वतीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

बिहार विधानसभा निकालाचा येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकी मध्ये आम्हाला चांगला फायदा होवून पंढरपूरसह राज्यात सर्वत्र भाजपाला घवघवीत यश मिळेल असा विश्वास भाजपाचे सोलापूर जिल्हाउपाध्यक्ष तथा पंढरपूर पालिका निवडणूकीचे प्रभारी प्रणव परिचारक यांनी व्यक्त केला. बिहार विधानसभा निवडणूकीच्या दोन




टप्प्यानंतर गुरुवारी (ता.१४) सकाळ पासून प्रत्यक्ष मतमोजणीस प्रारंभ झाला. सुरुवाती पासूनच भाजपा प्रणित एनडीएने निकाला मध्ये आघाडी घेण्यास सुरुवात केलेली होती. दरम्यान दुपार पर्यंत निकालाचे स्पष्ट कल हाती येऊ लागल्या नंतर येथील भाजपाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा करण्यास सुरुवात केली. शहरातील मध्यवर्ती असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौका मध्ये भाजपाच्या वतीने पेढे आणि साखर वाटून भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी प्रणव परिचारक यांच्या नेतृत्वाखाली यांनी आनंद उत्सव साजरा केला. यावेळी भाजप शहराध्यक्ष रोहित लाला पानकर, तालुकाध्यक्ष सुभाष मस्के,भाजपा किसानसेलचे माऊली हळणवर आदी प्रमुख भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातही भाजपलाच घवघवीत यश मिळेल असा विश्वास देखील या निमित्ताने भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रणव परिचारक यांनी व्यक्त केला. यावेळी शहर आणि तालुक्यातील भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.